१६८५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२६६

…हा जन्मसिध्द हक्क आहे.

स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे.

# महाराष्ट्राचा महापुरुष



— द. न. शिखरे

REFBK-0014452

स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे.

स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे

अ.शा.
~~११९~~
१२६६
१२६६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १४४५२

# महाराष्ट्राचा महापुरुष

## लोकमान्य टिळक

REFBK-0014452

लेखक
श्री. दामोदर नरहर शिखरे,
एम्. ए.

किंमत
दोन रुपये व पन्नास पैसे

प्रकाशक :
न. शं. कुलकर्णी,
जयन्त आणि कंपनी,
स. नं. ७२० चा २०,
नवी पेठ, पुणें ९.

☆ ☆ ☆

प्रथमावृत्ति : १९५६
पुनर्मुद्रण : १९६५

☆ ☆ ☆

दिनांक ३० ऑगस्ट १९६५
गणेश चतुर्थी, शके १८८७

☆ ☆ ☆

मुद्रक :
न. शं. कुलकर्णी,
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
स. नं. ७२० चा २०,
नवी पेठ, पुणें ९.

नों. दि. २८·१२·६

# कां लिहिलें मीं हें चरित्र ?

लो. टिळकांना जन्मून यंदा एक शतक पूर्ण झालें म्हणून.

शतक लोटलें, स्वातंत्र्य लाभलें, तरी त्यांचे अलौकिक गुण आजहि आपल्या डोळ्यांपुढें, दीपस्तंभाप्रमाणें, हवेत म्हणून.

लो. टिळक महाराष्ट्र-भूमीचे सुपुत्र, म्हणून या पुस्तकाचें नांव 'महाराष्ट्राचा महापुरुष.' पण त्यांची कृति भारतभर पसरलेली होती आणि कीर्ति तर जगभर दरवळत होती–अजून आहे.

त्यांचीं चरित्रें अनेकानेक झालीं आहेत. खुद्द मींच दोन लहान-मोठीं चरित्रें लिहिलीं आहेत ना! एक 'राष्ट्रजनक टिळक' व दुसरें 'महाराष्ट्राचे संजीवक'. शिवाय 'आठ साल' नांवाचें नाटक–ब्रिटिश सरकारनें जप्त केलेलें व काँग्रेस सरकारनें मुक्त केलेलें.

तरी, दहा ते अठरा वयाच्या मुलांना सहज समजेल व चटकदार वाटेल अशा चरित्राची गरज आहे असें मला वाटलें, म्हणून मीं हें चरित्र लिहिलें. तें प्रौढ साक्षरांनाहि सुगम वाटेल. टिळक-चरित्रांतील उदात्त प्रसंग वेचून ते मीं लघुकथेच्या कोंदणांत बसविले.

लघुकथेचें कोंदण जोडलें, म्हणून कल्पित कथा या चरित्रांत मीं रंगविल्या, असें मात्र नव्हे. सर्व प्रसंग पूर्ण सत्य आहेत. कांहीं तर अगदीं नवीन वाटतील, पण तेहि साधारच आहेत.

लो. टिळकांच्या गुणविशेषाचा ठसा उमलत्या पिढीच्या कोमल मनावर उमटावा, हा माझा हेतु; तो कितपत साधला, हें पालक-शिक्षक मला कळवितील काय?

'महात्मा मासिक' कार्यालय,
नातूबाग, पुणें २
२३ जुलै १९५६

—द्रा. न. शिखरे

## धन्यवाद !

या पुस्तकाचें पुनर्मुद्रण काढण्याचा सुयोग आणून दिल्याबद्दल मराठी वाचकांना धन्यवाद !

दिनांक ३०-८-६५

—द्रा. न. शिखरे

## महापुरुष

उदंड मुलें नानापरी ।
वडिलांचें मन अवघ्यांवरी ॥
तैसी अवघ्यांची चिंता करी ।
महापुरुष ॥१॥

बहुत जन वास पाहे ।
वेळेसीं तत्काळ उभा राहे ॥
उणें कोणाचें न साहे ।
तया पुरुषासी ॥२॥

जो मानला बहुतांसी ।
कोणी बोलों न शके त्यासी ॥
धगधगीत पुण्यराशी ।
महापुरुष ॥३॥

—श्रीसमर्थ रामदास

क्रमांक ६९ ...... नों दि: २८:१२-८८
१२८८

# टिळक - सूक्ति

" एखाद्या तळ्यांत सभोंवारच्या वस्तूंचें जसें प्रतिबिंब पडतें; त्याप्रमाणें प्रत्येक देशांतील लोकांच्या आचारविचारांचें, धर्माचें, नीतीचें, तत्त्वज्ञानाचें, व्यापाराचें व समाजस्थितीचें चित्र त्यांच्या भाषेंत उतरलेलें असतें. "

" उद्योग व निश्चय हीं परमेश्वर–प्राप्तीचीं दोन चाकें आहेत. दैव हें तिसरें चाक कोणी म्हणतात; पण तें मला आजपर्यंत आढळलें नाहीं. "

" जेथें जोम व नेट आहे, जेथें जूट आहे आणि राष्ट्रांतील प्रत्येक स्त्रीपुरुष देशासाठीं परमावधीचा स्वार्थत्याग करण्यास तयार आहेत; ' तत्र श्रीर्विजयो भूतिः ' असें आमचेंच काय पण परमेश्वराचेंहि सांगणें आहे. "

" राजकारणी माणसाच्या अंगांत दोन गुण असले पाहिजेत. एक तर त्याच्या हृदयांत प्रखर आग पेटलेली पाहिजे आणि दुसरा म्हणजे त्या हृदयाच्या वरच्या बाजूस डोकें बर्फासारखें थंड असलें पाहिजे. "

" कर्तव्य करीत असतांना कोठेंहि आणि केव्हांहि मृत्यु आला तरी तो काशी क्षेत्रांतील मरणाप्रमाणें मोक्षप्रदच होतो. "

" परमेश्वर प्रयत्नांतीं असतो, वाचान्तीं नव्हे. "

" आशेवांचून आयुष्य अळणी असतें. "

☆ ☆ ☆

# अ नु क्र म


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| ☆ टिळक–सूक्ति | ... | ५ |
| ☆ भवितव्यता बोलली | ... | ७ |
| ☆ देणें ईश्वराचें | ... | ८ |
| ★ छंद लागला विद्येचा | ... | ९ |
| ★ मित्रांनीं व्रत घेतलें | ... | १५ |
| ★ शिवरायाचा आठवावा प्रताप | ... | २५ |
| ★ दोन उत्सव गाजले | ... | ३५ |
| ★ सेवेला देह वाहिला | ... | ४७ |
| ★ समतेचा ध्वज उंच धरा रे ! | ... | ६० |
| ★ अवतरे युग हें नवें ! | ... | ७० |
| ★ स्वराज्याचा सुकाळ करी | ... | ८० |
| ★ मेळविलों जन्मफळां | ... | ८९ |
| ☆ गौरवांजलि | ... | ९५ |
| ☆ अधिक वाचन | ... | ९६ |


☆ ☆ ☆

# भवितव्यता बोलली



समुद्र फेसाळत होता,
वारा खिदळत होता,
सूर्य झळकत होता,
अशा वेळीं, रत्नागिरीच्या वेशीबाहेर
वाळूचे कण लोळत होते व त्यावर
कोंकणचीं पोरें खेळत होतीं,
पोवळ्यासारखे शंख नि मोत्यासारखे शिंपले वेचीत होतीं,
वाळूचीं घरें बांधीत होतीं.

' अरे, घर काय बांधतोस? किल्ला बांध किल्ला ! ' एक तरतरीत गोरेंपान मूल ओरडलें.

' आपल्या या समुद्रांतील किल्ल्याएवढा बांध रे बाळ.'

' बांधतों ! बांधतों ! आपल्या घरापेक्षां मोठें, आपल्या किल्ल्यापेक्षां मोठें, आपल्या देशाएवढें मोठें, नवें सुंदर घर मी बांधतों पहा ! ' टिळकांच्या बाळानें अभिमानानें उत्तर दिलें.

आणि भवितव्यता बोलली—

तथास्तु !

## ' देणें ईश्वराचें '

सूर्य-प्रकाशाच्या लाटा मस्तकावर आदळत आहेत,
वायूच्या लाटा सर्वांगाला झोंबत आहेत,
सागराच्या लाटा पायावर आपटत आहेत,
तरी तो महापुरुष अढळ व अचल उभा आहे.

मुंबई येथील चौपाटीच्या वाळवंटावर तो पुतळा उभा आहे.

सूर्यानें स्तिमित न होतां, समीरानें चलित न होतां, समुद्रानें खंडित न होतां, तो धैर्याचा, त्यागाचा, विद्वत्तेचा, चारित्र्याचा व देशभक्तीचा पुतळा, अष्टौप्रहर, गांभीर्यानें व प्रतिष्ठितपणें उभा आहे, आपण जन्मभर चिंतिलेल्या व आराधिलेल्या भारतीय स्वातंत्र्यावर नजर ठेवीत आहे आणि नव्यानव्या पिढ्यांना उज्ज्वल ध्येयवादाची स्फूर्ति देत आहे.

जिवंतपणीं त्याच्या मस्तकांतून सूर्यप्रकाशाइतके तेजस्वी विचार प्रगट होत होते. त्याच्या श्वासोच्छ्वासांतून निष्काम कर्मयोगाच्या वायु-लहरी बाहेर पडत होत्या आणि त्याच्या मुखांतून स्वराज्याची गर्जना सागरांच्या गंभीरतेनें सदैव होत होती.

अर्वाचीन महाराष्ट्राचीं आराध्य-दैवतें दोन—एक छत्रपति श्रीशिवाजीमहाराज व दुसरें लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. दोघांनींहि ' देशासाठीं फकिरी ' घेतलेली, दोघांचेंहि जीवन धुतल्या तांदुळासारखें स्वच्छ आणि दोघांनींहि आपल्या मायभूमीला पारतंत्र्याच्या मगरमिठींतून मुक्त केलेलें. सतराव्या-शतकांत मुसलमानी सत्तेला जर्जर करून सोडण्यांत जे शौर्य-चातुर्यादि लोकोत्तर गुण छत्रपतींनीं प्रगट केले,तेच विसाव्या शतकांत ब्रिटिश साम्राज्यशाहीला नामोहरम करण्यांत लोकमान्यांनीं दाखविले.

परिस्थिति भिन्न, म्हणून साधनें भिन्न; पण पिंड एकच. छत्रपतींची भवानी तलवारच लोकमान्यांचे हातीं केसरीची लेखणी बनून राहिली. लंगोट्याघोंगड्या मावळ्यांच्या बळावर छत्रपतींनीं जसा पराक्रम केला, तसाच ' तेल्यातांबोळ्यां'च्या आधारावर लोकमान्यांनीं जन्मसिद्ध स्वराज्याचा लढा चालविला.

दोघांच्याहि ' उत्तम गुणांसि नाहीं सीमा. '

☆ ☆ ☆

## महाराष्ट्राचा महा-पुरुष-



- लोकमान्य टिळक

# लो. टिळकांचा चरित्र-पट

१८५६ जन्म, रत्नागिरी येथें ता. २३ जुलै रोजीं.
१८६४ ( आषाढ वद्य ६, शके १७७८ )
१८६४ मुंज
१८६६ आईचा मृत्यु, पुणें येथें आगमन.
१८६९ इंग्रजी शाळेंत प्रवेश.
१८७१ लग्न, चिखलगांवीं, सत्यभामाबाईशीं.
१८७२ मॅट्रिक उत्तीर्ण—वडिलांचा मृत्यु.
१८७६ बी. ए.–पहिल्या वर्गांत.
१८७९ एल्‌एल्. बी.
१८८० न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना.
१८८१ केसरी–मराठा वृत्तपत्रें सुरू.
१८८२ डोंगरीच्या तुरुंगांत. ( १०१ दिवस कैद. )
१८८५ फर्ग्युसन् कॉलेजचा प्रारंभ.
१८८७ केसरीचे संपादक ता. २२ ऑक्टोबरपासून.
१८९० शिक्षण-संस्थेचा राजीनामा. ( १८९१–१९०० लॉ क्लास चालविला. )
१८९१ मराठाचे संपादक ता. ३ सप्टेंबरपासून.
१८९४ सार्वजनिक गणेशोत्सव सुरू
१८९५ पुणें म्युनिसिपालिटीचे सभासद. ( मुंबई विधिमंडळाचे सदस्य. )
१८९६ रायगडावर शिवाजी-उत्सव.
१८९७ राजद्रोहाच्या आरोपावरून १८ महिने सक्तमजुरीची शिक्षा.
(येरवड्याच्या तुरुंगांत. सुटका ता. ६–९–१८९८ रोजीं.)
१८९९ सीलोन–ब्रह्मदेशचा प्रवास.
१९०३ मुलगा विश्वनाथ याचा प्लेगनें मृत्यु.
१९०७ सुरत येथें कॉंग्रेस दुभंगली.
१९०८ राजद्रोहासाठीं ६ वर्षें काळेपाण्याची शिक्षा-मंडालें येथें. गीता रहस्याचें लेखन.
१९१२ पत्नीचा पुणें येथें ता. ६ जून रोजीं मृत्यु.
१९१६ पुणें येथें साठी-समारंभ, लाख रुपयांची थैली अर्पण. होमरूल लीगची चळवळ.
१९१८ वऱ्हाडांतील स्वराज्याची मोहीम. मुंबई येथें गव्हर्नराच्या युद्ध–परिषदेंत सभा–त्याग. इंग्लंडला प्रयाण–स्वराज्याच्या शिष्टाईसाठीं व चिरोलवर खटला भरण्यासाठीं. तेथें तेरा महिने मुक्काम.
१९२० तीन लाखांची थैली लोकांनीं लोकमान्यांना अर्पण. स्वर्गवास–मुंबई येथें ता. ३१ जुलै १९२० रोजीं रात्रीं १२ वाजून ४० मिनिटांनीं.

☆ ☆ ☆

# ‘छंद लागला विद्येचा’

‘बाळ! अरे बाळ! इकडे ये पाहूं.’

‘आलोंच, आई आलोंच.’ अशी आरोळी आली—आणि तिच्या पाठोपाठ आली बाळाची बटु मूर्ति! नुकतीच मुंज झालेली असल्यानें बाळाच्या खांद्यावर जानवें रुळत होतें. अंगांत एक सदरा नि लंगोटी. दोन्ही हातांत एका नारळाचीं दोन शकलें.

‘अरे, तिकडे परसांत काय करीत होतास?’ त्या नारळावर नजर रोखून आईनें विचारलें.

‘अग, तूं पहांटे म्हणालीस ना, आज भाजी कांहीं नाहीं. म्हणून गेलों मी परसांत. सपासपा आळू कापलें. अन् मनांत आलें, एक नारळहि काढावा. चढलों—भरभर झाडावर चढलों—अगदीं थेट शेंड्यावर जाऊन पोंचलों.’

‘माकडच कीं नाहींस तूं!’ पार्वतीबाई आपल्या मुलाकडे अभिमानानें पाहात उद्गारल्या.

‘आणि आई, हा बघ तो नारळ—झाडावरून काढला नि जमिनीवर ठेवून या हातानं—अग, एका बुक्कीनं—मीं फोडला! कोण आहे माझ्यासारखा पराक्रमी?’

‘केवढा पराक्रमी माझा बाळ! बलभीमच तूं.’

‘पुरे, पुरे आपल्या बाळाचं कौतुक. नुसत्या उड्या मारून काय होतंय्?’ गंगाधरशास्त्री माजघरांत येत येत म्हणाले. डोक्यावर लाल पगडी, अंगावर हिरवी शालजोडी—अशा वेषांत ते बाहेर निघाले होते. तो माय-लेकांचा संवाद त्यांचे कानीं पडला. म्हणून ते आंत आले नि म्हणाले,

‘विद्येचा छंद धरा, विद्येचा. आपल्या पूर्वजांचं नांव निघेल असं कांहीं करा. आमचे धोंडोपंत तर पानिपतच्या रणांगणावर जाऊन लढले; अन् रामचंद्रपंतांनीं आपल्या आयुष्याची अखेर पेशव्यांच्या पायापाशीं साधली. अरे बाळ, तुझे पणजोबा केशवराव केवढे उद्योगी!’

पार्वतीबाई–म्हणून तर तुझं नांव ठेवलं केशव.

गंगाधरशास्त्री–पण तें स्वारीनं कुठं टिकवून धरलं? ‘बाळ’ ‘बाळ’ म्हणतां म्हणतां हे राजेश्री बाळच झाले. जन्मभर बाळच राहतात कीं काय कोण जाणे! पण बाळ, लक्षांत ठेव, तुझे पणजोबा केशवराव खोत होते.

पार्वतीबाई–आमच्याच गांवीं, चिखलगांवीं.

बाळ–खोत म्हणजे ग काय आई?

गंगाधरशास्त्री–खोत म्हणजे जमिनीचे मालक. तेव्हां पेशवाई होती.

बाळ–पेशवाई म्हणजे हो काय दादा?

गंगाधरशास्त्री–पेशवाई म्हणजे पेशव्यांचें राज्य–आपल्या लोकांचें राज्य. त्या स्वराज्यांत आमचे आजोबा मामलतदारीपर्यंत चढले. असं कांहीं कर्तृत्व करून दाखवा. तलवारीचं नसलं तरी बुद्धीचं पाणी तरी दाखवा. याच कोंकणांतलीं पोरं पूर्वी पुण्यास गेलीं आणि राजे बनलीं–पानिपतावर लढलीं–दिल्लीचं तख्त फोडूं लागलीं. आणि तुम्ही मात्र इथं राहून बुक्कीनं नुसते नारळ फोडीत बसले आहांत.

बाळ–मोठा झालों म्हणजे मी पण दिल्लीचं तख्त फोडीन कीं! हो कीं ग नाहीं आई?


पार्वतीबाई–तर काय? बाळाचा अभ्यास चांगलाच आहे. सारी संध्या त्याला पाठ आहे अन् रामरक्षा तर कसा तो घडाघडा म्हणतो. ‘एक श्लोक पाठ केलास तर एक पै देईन’ असा करार आपण केला आहे ना? आतां त्यानं चांगला सव्वा रुपया जमविला आहेन् कीं!

बाळ–पण त्याबरोबर पाठीवर धम्मक लाडू पण खाल्ले आहेत ना मीं! ज्या दिवशीं श्लोक पाठ झाला नसेल, त्या दिवशीं झालीच कंबक्ती.

पार्वतीबाई–अन् ती टाळण्यासाठीं तूं बसायचास अंगांत सारे सदरे नि कोट घालून; होय ना? कसं कां होईना, पण माझा बाळ संस्कृत श्लोक छान म्हणतो हो!

गंगाधरशास्त्री–त्यांत काय आहे? पाळण्यांतील पोरंसुद्धां तें म्हणतात. आतां हा दहा वर्षांचा होत आला. अजून याला पंचतंत्र वाचतां येत नाहीं कीं रघु लावतां येत नाहीं, मग बाणाची कादंबरी तर दूरच.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ८००-५ वि: चरित्र
क्रमांक ६२६ नों. दि:

वडिलांचा हा बाण बाळाच्या वर्मी लागला. असाध्य असें त्याच्या बाल-बुद्धीला कांहींच वाटत नसे. स्वाभिमानानें तरारून त्यानें वडिलांचें आव्हान स्वीकारलें व म्हटलें, 'द्या, मला ती बाणाची कादंबरी द्या. एका दिवसांत मी ती सारी वाचून टाकतों.'

गंगाधरशास्त्री गालांतल्या गालांत हंसले आणि कौतुकाच्या नजरेनें आपल्या महत्त्वाकांक्षी मुलाकडे पाहात म्हणाले, 'ठीक, ठीक ! अशी हिंमत धर. शास्त्र्याचा मुलगा सवाई शास्त्री झाला पाहिजे. पण बाणाची कादंबरी वाचायला अजून तुला अवकाश आहे.'

'कां ? अवकाश कां ? मी आतांच तयार आहें.' बाल-हट्ट उसळला.

'अरे बाळ, बाणाची कादंबरी म्हणजे हितोपदेश नव्हे. त्यांत एकामागून एक समासाची गुंतागुंत इतकी निबिड आहे कीं, भल्या-भल्यांनाहि तेथें हात टेकावे लागतात. ते समास फोडणें म्हणजे परसांतला नारळ फोडणें नव्हे.'

'पण मी दोन्हीहि फोडतों ना. सारें समासचक्र मीं पाठ केलें आहे दादा.' बाळ गुरगुरला.

'तें आहे मला माहीत.' मान डोलावीत गंगाधरशास्त्री म्हणाले,

'पण बाणाचे शब्द-भांडारहि केवढें प्रचंड ! एका वस्तूसाठीं वीस-वीस, पंचवीस-पंचवीस शब्दांचा पाऊस पाडतो तो.'

'पण दादा, मला काय त्याची भीति ? निम्मा अमरकोश तुम्हींच ना माझ्याकडून पाठ करून घेतला ? तें कांहीं नाहीं. मी तुमच्याप्रमाणं आतां बाणाची कादंबरीच वाचणार. द्या मला तें पुस्तक. कुठं आहे तें ?'

'थांब, थांब. मी तुला ती कादंबरी देतों–बक्षीससुद्धां देतों. पण एका अटीवर.'

'कोणती ती अट ? सांगा कीं लगेच पुरी करतों.' बाळानें अधीरतेनें विचारलें. त्याच्या आवाजांत आत्मविश्वास रसरसलेला होता.

'अट एवढीच कीं, मी तुला एक उदाहरण घालतों, तें तूं सोडविलंस तर तुला ती कादंबरी मी कायमची बक्षीस देईन.'

बाळ धांवतच गेला नि पळत आला. येतांना त्यानें पाटी-पेन्सिल आणली. जमिनीवर मांडी घालून, हातांत पाटी घेऊन, बाळ आपल्या वडिलांकडे टक लावून पाहूं लागला–त्यांच्या तोंडून येतील ते आंकडे टिपून घेऊं लागला.

आई स्वयंपाकास लागली. वडील दुसऱ्या शास्त्रीपंडितांशीं चर्चा करण्यासाठीं बाहेर गेले; पण बाळ तिथें मांडी ठोकून बसला–हूं का चूं न करतां, इकडे का तिकडे न हालतां, एकाग्रतेनें, तन्मयतेनें तो तें उदाहरण सोडवीत बसला. तब्बल तास निघून गेला आणि–

'सुटलं, दादा, उदाहरण सुटलं.' असें म्हणून बाळ साऱ्या घरभर भिरभिर फिरला. आईनें त्याला लाडू दिला. इतक्यांत गंगाधरशास्त्री बाहेरून परत आले. त्यांनीं आनंदानें बाळाची पाठ थोपटली आणि त्याला बाणाची कादंबरी बक्षीस दिली.

ही जशी संस्कृतांत गति, तशीच बाळाची गणितांतहि प्रगति. इंग्रजी शाळेंत जाण्यापूर्वींच बाळानें अंकगणित अंकित केलें होतें, बीजगणिताचें बीज जाणलें होतें व भूमितीची भूमीहि हस्तगत केली होती.

संस्कृत व गणित हे दोन विषय गंगाधरशास्त्र्यांचे मोठे आवडते. त्यांनीं लघुव्याकरण, अंकगणित, इतिहास वगैरे शालोपयोगी पुस्तकें

लिहिलीं होतीं. ते आरंभीं मराठी शाळेंत, लहान वयांत, फक्त पांच रुपये पगारावर, शिक्षक म्हणून नोकरीस लागले. पण पुढें आपल्या गुणांनीं असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर झाले. शाळांची तपासणी करण्याचें मानाचें काम त्यांना मिळालें. पगारहि वाढला. पांचसात हजार रुपये शिलकेंत पडले. तरी त्यांचा विद्याव्यासंग कांहीं थांबला नाहीं. संस्कृत नाहीं तर गणित–यांपैकीं कोणत्या तरी विषयाचें पुस्तक त्यांच्या हातांत किंवा डोक्यांत सदैव असे. विद्येचा विलक्षण छंदच त्यांना. तो आपल्या मुलालाहि जडावा, अशी त्यांची तीव्र इच्छा. ती बाळानें पुरेपूर पूर्ण केली.

बाळाचा जन्म रत्नागिरी येथें १८५६ सालीं, ता. २३ जुलै रोजीं, सूर्योदयानंतर दोन घटकांनीं झाला. वयाच्या आठव्या वर्षीं त्याची मुंज झाली व पंधराव्या वर्षीं लग्न झालें. लग्नानंतर आषाढ महिना आला. आषाढपाटी देण्याची वहिवाट तेव्हां होती; पण बाळानें सांगितलें, “ त्या आषाढपाटीऐवजीं मला आपलीं अभ्यासाचीं पुस्तकेंच द्या.” विद्येचा अखंड छंद बाळाला बाळपणापासूनच लागलेला होता.

इतरांपेक्षां आपण कांहीं वेगळें करून दाखवावें, अशी लालसा बाळाच्या चित्तांत सदैव खेळत असे. एकदां प्राथमिक शाळेंत एका शिक्षकानें शुद्धलेखन घातलें. त्यांत ‘संत’ हा शब्द तीन वेळां आला. प्रत्येक वेळीं बाळानें तो निराळ्या रीतीनें लिहिला :

**संत, सन्त, सन्‌त.**

बुद्धीची ही चमक, नावीन्याची ही ओढ, असामान्यत्वाची ही खूण ! ती ओळखण्याची पात्रता त्या खेड्यांतील शिक्षकाला कोठून येणार? त्यानें शेवटचे दोन शब्द चूक धरले. बाळानें हेडमास्तरांकडे तक्रार केली. त्यांनीं तिन्ही शब्द बरोबर धरले व बाळाच्या स्वतंत्र प्रज्ञेचें कौतुक केलें.

योगायोग असा कीं, १८६६ सालीं गंगाधरशास्त्र्यांची बदली पुण्यास झाली. पुणें हें विद्येचें माहेरघर. तेथील इमारती इतिहास बोलतात, तेथील वारे देशभक्ति शिकवितात आणि तेथील पाण्यांतून विद्वत्ता वाहते. शिवाजीचें शौर्य, पेशव्यांचा पराक्रम, नाना फडणविसांचें चातुर्य–यांच्या साक्षी व स्मारकें पुण्याच्या रस्त्यारस्त्यावर आढळतात.

वयाच्या तेराव्या वर्षीं बाळाला पुण्यांतील सरकारी हायस्कूलमध्यें प्रवेश मिळाला. त्या वेळीं त्याला केवढी धन्यता वाटली ! गरुडाला उड्डाण करावयास सारें आकाश मोकळें मिळावें किंवा नाविकास आपलें गलबत हांकारण्यास अफाट सागर डोळ्यांपुढें दिसावा, तशी स्थिति बाळाची झाली. त्यानें अभ्यासांत भराभर प्रगति करून दाखविली आणि पुण्याच्या विद्यार्थ्यांनाच काय पण शिक्षकांनाहि चकित करून सोडलें. १८७२ सालीं, वयाच्या सोळाव्या वर्षीं, मॅट्रिकची परीक्षा बाळ लीलेनें उत्तीर्ण झाला.

त्याच वर्षीं, वयाच्या अवघ्या बावन्नाव्या वर्षीं, बाळाचे वडील गंगाधरशास्त्री मृत्यु पावले. आईचा वियोग तर बाळाला दहाव्या वर्षींच सोसावा लागला होता. आतां पित्याचें छत्रहि डोक्यावरून उडालें. बाळाचा मोठा आधार सुटला. पिता हा त्याचा केवळ पिता नव्हता, गुरूहि होता.

गंगाधरशास्त्र्यांची योग्यता किती मोठी होती, याचें वर्णन एका फार मोठ्या विद्वानानें केलें आहे. ते विद्वान् म्हणजे डॉ. भांडारकर. गंगाधरशास्त्र्यांची बदली रत्नागिरीहून पुण्यास झाली. त्या वेळीं त्यांच्या चहात्यांनीं त्यांना पानसुपारी केली. तेव्हां भाषण करतांना भांडारकर म्हणाले, 'गंगाधरपंतांची विद्वत्ता, सदयता, कल्पकता, निःस्पृहता व निरलस वागणूक हे गुण अर्वाचीनांनीं कित्ता घेण्यासारखे आहेत. आज आपल्या हातांतला ठेवा, व्याकरणाचा सांठा, मराठी भाषेचा समुच्चय, गुरु-शिष्य-भक्तीचें दुर्मिळ होत चाललेलें भांडार आपण सोडीत आहोंत असें मला वाटतें.'

अशा विद्या-संपन्न, चारित्र्य-संपन्न व कीर्ति-संपन्न पित्याचा लौकिक संभाळण्याची इच्छा व ईर्षा बाळ गंगाधर यांच्या मनांत अखंड खेळत असे.

# मित्रांनीं व्रत घेतलें

बळवंतरांनीं दारावर टक्टक् केलें, पण दार कांहीं उघडलें नाहीं.

बळवंतरावांनीं सुपारीचें खांड तोंडांत टाकलें व ते आपल्या अड-कित्यानेंच दार जोरानें ठोठावूं लागले.

'या, या' असें म्हणत गोपाळरावांनीं दार उघडलें आणि बळवंत-रावांना आंत घेतलें. खोलींत रॉकेलचा दिवा जळत होता. आसपास दहा-बारा इंग्रजी पुस्तकें पडलेलीं होतीं—कांहीं उघडलेलीं, तर कांहीं कागदाचे तुकडे खुणेदाखल घातलेलीं. श्रीमंती थाटाच्या डेक्कन कॉलेजांतील ती खोली! पण तेथें पलंग नव्हता, आरसा नव्हता, उंचीउंची कपडे नव्हते. कसे असणार?

अठराविश्वे दारिद्र्यांतून वर आलेल्या गोपाळरावांची ती खोली! शिक्षणासाठीं, वयाच्या तेराव्या वर्षी, कऱ्हाडहून रत्नागिरीस दीडशें मैल पायीं जाणाऱ्या गोपाळरावांची ती खोली! रत्नागिरीहून थेट अकोला आणि अकोल्याहून पुणें व तेथून परत अकोला—अशी त्रिस्थळी यात्रा करणाऱ्या त्या विद्येच्या वारकऱ्याची ती खोली! 'मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार.' अशी आपली भीष्म-प्रतिज्ञा आपल्या आईला, आपण पदवीधर होतांच, कळविणाऱ्या गोपाळराव आगरकरांची ती खोली!

एका सदऱ्यावर दिवस काढणारे गोपाळराव आगरकर आतां बी. ए. होऊन पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत आले होते, एम्. ए. चा अभ्यास करीत होते, फेलो म्हणून दरमहा पाऊणशें रुपये कमावीत होते, तरी त्या खोलींत चैनीच्या वस्तु कोठल्या? ऐषआरामाच्या जिनसा कोठल्या? आणि थाटमाट तरी कोठला? 'साधी रहाणी, उच्च विचारसरणी आणि परोपकाराची करणी.' हाच त्यांचा बाणा!

योगायोग असा कीं, गोपाळराव व बळवंतराव या दोघांचा जन्म

एकाच वर्षी–१८५६ सालीं–झालेला. १८७९ मध्यें गोपाळराव हे एम्. ए. च्या पहिल्या वर्षासाठीं आणि बळवंतराव हे एल्एल्. बी. च्या दुसऱ्या वर्षासाठीं डेक्कन कॉलेजांत दाखल झाले–एकत्र राहूं लागले–आपल्या आयुष्याच्या व राष्ट्राच्या भवितव्याविषयीं वाटाघाटी करूं लागले. एक दिवस गांठ पडली नाहीं किंवा चर्चा झाली नाहीं कीं दोघांनाहि चुकल्या-चुकल्यासारखें होई.

आजचा दिवस तसाच होता. सबंध दिवसांत या 'बाळ–गोपाळां'च्या गप्पासप्पा झडल्या नव्हत्या. फेलो म्हणून आगरकर रात्रंदिवस कसून अभ्यास करीत; पण टिळकांचा खाक्या निराळा. त्यांची प्रकृति दणकट. खेळ खेळण्यांत व व्यायाम करण्यांत त्यांना मोठा आनंद. मुळा-मुठेच्या संगमांत पोहण्याची त्यांना भारी हौस. हातांत लोणी-भाकरी घेऊन ती खातखात पाण्यांत पोहण्यांत ते पटाईत. स्वतः वल्हवून नावेंतून दूरवर जाण्याची त्यांना संवय. नाजूक विद्यार्थ्यांच्या खोलींत भिंत चढून प्रवेश करण्याचा व त्यांच्या औषधांच्या बाटल्या फेंकून देण्याचा त्यांना चाळा. आणि मध्यरात्र उलटली कीं, एकलव्याच्या एकतानतेनें, आपला अभ्यास पुरा करण्याची त्यांची युक्ति.

रात्रीचें जेवण झालें, तेव्हां अडकित्यानें सुपारी कातरीत कातरीत, उघडया अंगानेंच बळवंतरावांची स्वारी गोपाळरावांच्या खोलीपाशीं आली आणि दारावर टक्टक् करूं लागली. गोपाळरावांनीं दार उघडून त्यांना आंत घेतांच बळवंतरावांनीं त्यांचीं सारीं उघडीं पडलेलीं पुस्तकें मिटलीं आणि सूचना केली, 'चला, आपण टेकडीवर जाऊं या. माझ्या डोक्यांत एक नवाच विचार आज सकाळपासून थैमान घालीत आहे. त्याचा खल आपण करूं या.'

निघाले–तेवीस वर्षांचे ते दोन तरुण डेक्कन कॉलेजांतून तसेच निघाले–आणि टेकडीवर जाऊन बसले. वेळ रात्रीची होती. सर्वत्र सामसूम होतें–अंधाराचें साम्राज्य होतें. गार वारे सुटले होते. आकाशांतील तारका डोकावून खालीं पाहात होत्या–या ध्येयवादी तरुणांचा राष्ट्रवादी संवाद कान टवकारून ऐकत होत्या.

'बोला बळवंतराव, काय आहे तुमचा नवा विचार?' गोपाळरावांनीं उत्सुकतेनें विचारलें.

जमिनीवरील एक दगड जोरानें फेकीत बळवंतराव म्हणाले, 'विचार नेहमींचाच आहे, पण त्याला आज नवी दिशा लागली आहे–निश्चित दिशा लागली आहे.'

'वा:! मग फारच आनंदाची गोष्ट.' गोपाळराव हंसऱ्या स्वरांत म्हणाले, 'या अंधारांतच मी चांचपडत आहें, त्यांत प्रकाशाचा किरण तुम्ही आज टाकणार म्हणायचें.'

'तें आतां आपल्याला ठरवायचं आहे. आतांपर्यंत माझ्या मस्तकांत विचारांचं नुसतं वादळ माजलेलं असायचं. 'करायचं–देशासाठीं कांहीं तरी करायचं' याच एका विचाराचं तुफान माझ्या मनांत रात्रंदिवस सुटलेलं असायचं. त्यामुळं माझं मन जेवणांत नसे, खाण्यांत नसे, अभ्यासांतहि नसे.'

'हीच–अगदीं हीच माझी स्थिति झाली आहे, बळवंतराव!' असे आवेगाचे उद्‌गार काढून गोपाळरावांनीं बळवंतरावांचे दोन्ही हात प्रेमानें



घट्ट धरले. बळवंतराव, स्फूर्ति आल्याप्रमाणें, समोरच्या ताऱ्याकडे पाहात बोलूं लागले.

'एक नव्हे, दोन नव्हे, सतत सहा वर्षं मी या विचारानं हैराण

झालों आहें. तो दिवस, गोपाळराव, मला अजून आठवतो. १८७३ सालचा फेब्रुवारी महिना होता तो. मी नुकताच या कॉलेजांत दाखल झालों होतों. बातमी कळली कीं, रावसाहेबांचं–'

'म्हणजे रानडयांचं ना ?'

'हो ! त्यांचं स्वदेशीवर व्याख्यान आहे. गेलों. तरुणांची ही गर्दी ! बृहस्पतीप्रमाणं त्यांचं भाषण चाललं होतं. ते म्हणाले, 'तुम्ही तरुण लोक सुखाच्या नि ऐषआरामाच्या वस्तु वापरतां–वापरा, वयच आहे तुमचं तसं वागण्याचं; पण त्या वस्तु आपल्या देशांत निर्माण कां होत नाहींत याचा विचार करा. पराधीन होऊं नका, निःसत्त्व बनूं नका. स्वदेशांत तयार झालेलीच वस्तु वापरा.' गंगेच्या ओघाप्रमाणं झालेलं तें भाषण–अजून माझ्या कानांत घुमत आहे.'

'काय हो, पण कांहीं परिणाम झाला का त्या भाषणाचा श्रोत्यांवर ?'

'वा: गोपाळराव, परिणाम म्हणून काय विचारतां ? वासुदेव बळवंत नि गणेश वासुदेव या तरुण-वृद्धांनीं लगेच विदेशी वस्तूंचा त्याग केला ना ! पुढल्या सालीं शास्त्रीबोवांची 'निबंधमाला' निघाली. स्वदेशासाठीं कांहीं ना कांहीं करावं, अशी जाणीव सर्वांना झाली.' बळवंतराव समाधानानें म्हणाले.

गोपाळरावांच्या डोळ्यांपुढें त्या अंधारांत विष्णुशास्त्र्यांची तेजस्वी मूर्ति दिसूं लागली. ते गंभीर आवाजांत म्हणाले,

'मीहि भेटलों होतों शास्त्रीबुवांना; माहीत आहे तुम्हांला बळवंतराव ?'

'नाहीं बुवा, आजवर तुम्ही कधींच नाहीं बोलला हें. केव्हां, कशासाठीं भेटलां होतां तुम्ही शास्त्रीबुवांना ?"

'अहो, दुसरं कशासाठीं ? देशभक्तीवर मीं एक निबंध लिहिला होता. तो दाखवायचा कोणाला ? युरोपियन प्रोफेसराला ? १८७६ सालाची अखेर होती ती. तो निबंध घेऊन भीतभीतच मी शास्त्रीबुवांकडे गेलों होतों–'

'मग आतांहि येतां त्यांचेकडे ?' बळवंतरावांनीं उताविळीनें विचारलें.

' थांबा. आधीं आपलं बोलणं पुरं होऊं द्या, एकमत होऊं द्या, कार्याचं स्वरूप नक्की होऊं द्या, मग जाऊं या त्यांच्याकडे निर्णय करण्यासाठीं.'

दोघांचीहि तळमळ तीव्र. आपला देश पारतंत्र्यांत पिचत पडलेला दोघांनाहि पाहावत नव्हता. पारतंत्र्यामुळें आपले देशबांधव अन्नवस्त्राला महाग होत आहेत, आपल्याच देशांत आपल्या लोकांचा पदोपदीं अपमान होत आहे, हें त्या दोघांना अगदीं सहन होत नव्हतें. राजा राममोहन रॉय व दादाभाई नौरोजी यांनीं इंग्लंडांत स्वराज्यासाठीं चालविलेली धडपड त्यांना माहीत होती. लोकहितवादी, न्या. तेलंग, न्या. रानडे, सार्वजनिक काका इत्यादि दूरदर्शी नेते 'सार्वजनिक सभे' सारख्या संस्थांचीं रोपें लावीत चालल्याचें प्रत्यक्ष कार्य ते पाहात होते. विष्णुबुवा ब्रह्मचारी, ज्योतिबा फुले इत्यादींचे जन-जागृतीचे प्रयत्न त्यांना दिसत होते. पुण्यांतील विश्रामबाग-वाडा व बुधवारवाडा यांना लागलेल्या आगींचा अर्थ त्यांनीं जाणला होता. आणि इंग्रजशाहींतील तो पहिला महाराष्ट्रीय सशस्त्र बंडखोर!–

'डाका, आगगाडी, तारायंत्र बंद पाडून, तुरुंग मोकळे करून, खजिने लुटून, भिल्ल–रामोशांच्या मदतीनें सरकारी कारभाराला खीळ घालून इंग्रजी सत्तेचें वाटोळें करावयाचें आणि येथें प्रजासत्ताक राज्य निर्माण करावयाचें,' असें ध्येय मनांत बाळगून, ज्या वासुदेव बळवंत फडके यांनीं ' हिंदुस्थानवासी लोकहो! मी मेलों तरी तुमच्या कल्याणाकरितां देवाजवळ वकिली करीन." अशी वीर-प्रतिज्ञा केली, त्याच्या भाले–तलवारीच्या शिक्षण-वर्गांतहि बळवंतराव कांहीं वेळां गेले होते. त्याच्या रोमांचकारक शौर्य-कथा ऐकून त्यांचीं अंतःकरणें थरारलीं होतीं; पण–

'एकट्या-दुकट्याच्या असल्या मरण-मारणानें आपल्या राष्ट्राचा उद्धार होण्याचे दिवस गेले, असं मला वाटतं.' बळवंतराव गंभीर स्वरानें म्हणाले. गोपाळरावांचेंहि मत तेंच होतें. त्यांना दुजोरा देत ते म्हणाले, ' अहो, अमेरिकेचा इतिहास हेंच सांगतो ना. इंग्लंडच्या जोखडापासून अमेरिका स्वतंत्र झाली, ती तेथील लोकसमूह जागा झाला, संघटित झाला, प्रतिकार करूं लागला म्हणूनच. नाहीं तर आयर्लंड गेलीं पांच-सहाशें वर्षं शस्त्रें परजत बसलाच आहे.'

'बरोबर, अगदीं बरोबर. इतिहासाचा उपयोग हाच. पुढचें पाऊल कसें टाकावें हें मागें पाहिल्यानेंच कळतें. पुढचें ध्येय, गोपाळराव, आपण नक्की केलेंच आहे, होय ना?'

'अलबत्, मला सूर्यमंडळ भेदून विश्वामित्राच्या सृष्टीपलीकडेहि दृष्टि नेतां येईल.'

'नको, नको. तितका दूरचा पल्ला आजच नको. आपल्याला सगळे लोक नुसते कवि करावयाचे नाहींत.'

'पण सगळे लोक नुसते मुत्सद्दीहि करूं नका.'

'तुम्ही म्हणतां तितकें राजकारण बोकाळायला आपण मरून वर चार पिढ्याहि खपतील. आतां आपण फक्त १६३२ ते १९३० या तीनशें वर्षांच्या कालखंडाचाच विचार करूं.'

एकाची दृष्टि अनंत कालाचा विचार करण्याची—तत्त्वज्ञाची; तर दुसऱ्याची नजर तीन शतकांवरच खिळलेली-राजकारणी मुत्सद्याची.

'काय हो बळवंतराव, मग या तीन शतकांचा विचार करून काय वाटतंय् तुम्हांला? मनाचा कांहीं निर्णय होतोय् का?'

'होतोय् म्हणजे? ठाम होतोय्. आमच्या साऱ्या दुर्दशेचं मूळ हें राजकीय पारतंत्र्य, अशी माझी बालंबाल खात्री झाली आहे. आम्ही भणंग भिकारी कां? आम्ही शिक्षणांत मागें कां? आमचें आरोग्य धुळीस मिळालें कां? साऱ्या प्रश्नांना एकच उत्तर—आमच्या हातीं आमच्या देशाचें राज्य करण्याची सत्ता नाहीं म्हणून. हें पारतंत्र्य, वामनाच्या पावलाप्रमाणं, आमच्या देशाच्या आदि—मध्य—अंत्य या तिन्ही अवस्था व्यापून राहिलें आहे. तें प्रथम नष्ट केलें पाहिजे." डाव्या तळहातावर उजव्या हाताची बुक्की जोरानें आपटून बळवंतराव उद्‌गारले. तो सिद्धान्त गोपाळरावांनाहि पटत होता, पण—

'खरं आहे, तुम्ही म्हणतां तें खरं आहे, बळवंतराव. सोन्याची घागर कोणीं दिली, तरी ती उचलण्याची ताकद पाहिजे ना आपल्या अंगांत? समजा, उद्या पहांटेच तुम्हांला स्वातंत्र्य मिळालं, तरी तें झेपण्याची शक्ति आहे का आपल्या लोकांचे अंगीं? तितकं ज्ञान, तितकं

संघटन, तितकं कर्तृत्व, तितकी समाजहितबुद्धि—आहे का आपल्या लोकांच्या ठायीं ? ते तुमचे जातिभेद, ती तुमची अस्पृश्यता, तें तुमचें सोवळेंओवळें—या भेदभावामुळें सारा समाज कसा जागोजाग फाटलेला आहे, कुजका झाला आहे, क्षीण झाला आहे. तो अगोदर समर्थ करा, सज्ञान करा, मग परक्याशीं झगडून आपलें राज्य काय, हां हां म्हणतां, मिळवूं. ब्रिटिश सरकाराआधीं आम्हांला आपल्या अज्ञानाशींहि झगडावं लागेल. आधीं आपलं घर सुधारा, मग दार. ’

‘ अहो, चांगलं घर कुणाला नको असतं ? परंतु एखादा अज्ञानी माणूस तुम्हांला विचारील, ‘आगरकर, घर सुधारा म्हणतां, पण मला तर घरच नाहीं, मग काय करूं ?’ राजकीय स्वातंत्र्य मिळणं म्हणजे उभं राहायला जागा मिळणं. ती जागा आधीं आम्ही मिळविणार, मग आम्ही आमची सुधारणा सर्वांगांनीं करूं. ’

‘ छेः, छेः, आधीं माणूस तगडा झाल्याखेरीज डोंगर चढेल कसा ? आधीं आमच्या धर्मसमजुती, जुन्या चालीरीती, ते बालविवाह नि तें बालवैधव्य नि त्या बालविधवांचं केशवपन ! ’ आवेशानें आपला उजवा हात वर नेत गोपाळराव बोलले. मूर्तिमंत कळकळ होती त्यांची मूर्ति ! साकारलेली सद्भावना होती ती ! त्यांचेकडे आदरानें पाहात पण आपल्या मनाचा निश्चय कायम ठेवीत बळवंतराव शांत स्वरानें म्हणतात,

‘कबूल, कबूल, हे सारे दोष आम्हीं आमच्या समाजांतून काढून टाकले पाहिजेत. पण कशानं ? शिक्षणानं. ती हृदयाची जखम आहे. ती मी हलक्या हातानंच धुईन. गोड शब्दांनीं, किंबहुना अजिबात न बोलतां, नुसत्या आचारानंच, मी लोकांना समाज-सुधारणेचा मार्ग दाखवीन. पण सरकारशीं करावयाचा विरोध बाहेरचा. तो मी जोरानें, त्वेषानें करीन, त्यासाठीं निकरानें लढेन, जिवांत जीव आहे तोंवर लढेन.’

पावनखिंडींत लढत राहिलेला बाजीप्रभुच आपल्यापुढें उभा आहे कीं काय, असा भास गोपाळरावांना झाला. असा स्नेही, कांहीं झालें तरी, हातचा गमवायचा नाहीं असा त्यांनीं पणच केला. जें कांहीं देशकार्य आपल्याला करायचें आहे, तें अशा झुंझार मित्राच्या सहकार्यानेंच, असा

निर्धार त्यांच्या मनानें केला आणि ते म्हणाले,

'बळवंतराव, आतां अखेरचं बोलतों. राजकीय स्वातंत्र्य असो नाहीं तर सामाजिक सुधारणा असो, कोणत्याहि मार्गावर पाऊल टाकलं तरी शिक्षणाचा प्रकाश सर्वत्र पाडणं हेंच आपलं आद्य कर्तव्य नाहीं का? शास्त्रीबुवा हीच शिकवण देत नाहींत का? पारतंत्र्याला ज्ञान व दारिद्र्याला उद्योग हींच वस्ताद औषधें, असं ते परवां नाहीं का म्हणाले?'

'होय, होय, आणि तें मला पुरें पटले पण. शिक्षण नसणं म्हणजे आंधळं रहाणं. आंधळ्यांच्या हातून काय होणार? बस्स, ठरलं, आपण शिक्षण स्वस्त व सकस करणार, घरोघर त्याच्या कावडी पोंचविणार.'

'बरोबर, अगदीं दुधासारखं स्वस्त, सकस नि सर्वत्र शिक्षण–हाच आपला कार्यक्रम. ठरलं. आमच्या देशाचं शिक्षण आम्हीं हातीं घ्यायचं.'

'ठीक, ठीक, आपली एकवाक्यता झाली. आतां आपल्या या संकल्पाला शास्त्रीबुवांचा आशीर्वाद घेऊं म्हणजे झालें.'

'बरोबर. केव्हां जाऊं या?'

'केव्हां म्हणजे उद्यांच. शुभस्य शीघ्रम्। तशांत सध्यां शास्त्रीबुवा इथंच रजेवर आलेले आहेत.'

'पण बळवंतराव, तुमची कायद्याची परीक्षा अवघ्या तीन महिन्यांवर आलेली, तिला अडथळा कशाला? परीक्षा होऊन जाऊं द्या, मग आहे वेळ मुबलक मोकळा.'

'छेः हो गोपाळराव, परीक्षा काय? सहज उतरेन मी. एक कर्ण-पिशाच्च आहे मला वश. पण माझा सारा जीव आतां लागला आहे या नव्या दिव्य–भव्य कार्याकडे–लोकशिक्षणाकडे, लोकराज्याकडे, लोककल्याणा-कडे. 'मग उद्यांच जाऊं या शास्त्रीबुवांकडं.' 'अलबत् उद्यांच!'

आणि दुसरेच दिवशीं, सप्टेंबर महिन्याच्या रात्रीं, दहा वाजण्याचे सुमारास, डेक्कन कॉलेजच्या माळावरून, ते ध्येयवादानें रसरसलेले, उदात्त कार्यावर झडप घालूं पाहणारे दोघे सुविद्य तरुण, नारायण पेठेंतील चिपळूणकरांच्या वाड्याकडे निघाले. त्यांच्या डोक्यांत ज्ञान होतें, हृदयांत

देशभक्ति होती आणि डोळ्यांपुढें शिक्षण-प्रसाराचें ध्येय नाचत होतें. त्याग हें त्यांचें वैभव होतें आणि कष्ट हें त्यांचें सौख्य होतें. 'शहाणे करून सोडावें, सकळिकांसि।' हा त्यांचा जीवन-मार्ग एकदिलानें निश्चित झाला होता. तो शास्त्रीबुवांच्या कानांवर त्यांनीं घातला. तेव्हां परम संतोष पावून, मान हलवीत शास्त्रीबुवा म्हणाले, 'लोकहितवादींची व रावसाहेबांची पिढी आतां संपली-सरकारी नोकरी संभाळून, फावल्या वेळीं, भरल्या पोटानें, देशभक्ति करण्याची वेळ आतां निघून गेली. अष्टौप्रहर देशसेवेचा छंद घेणारीं माणसेंच आतां पुढें आलीं पाहिजेत.'

'आम्ही दोघांनींहि, सरकारी नोकरी न करतां, शिक्षणाचा प्रसार करण्याचं ठरविलं आहे.' बळवंतराव ठाम स्वरांत बोलले.

'वा:! वा:! हा तर अमृतसिद्धियोगच दिसतो मला. मीहि त्याच विचारांत आहें-पुण्यास शाळा काढण्याच्या विचारांत आहें.'

'पण रत्नागिरीच्या सरकारी शाळेंतील आपली नोकरी?' गोपाळरावांनीं हलक्या आवाजांत शंका मांडली.

'ती मीं मनानं केव्हांच सोडली आहे. सरकारी सेवेच्या रौप्य-शृंखला लाथेनें तोडून शिक्षणकार्याचं, स्वभाषेचं, स्वदेशाचं निशाण लावण्याचा मुहूर्तहि मीं निश्चित केला आहे. आमच्या तोफखान्यापुढें सरकारी हायस्कूल जमीनदोस्त झालंच म्हणून समजा.' विष्णुशास्त्री, एखाद्या प्रेषिताप्रमाणें, निश्चयानें बोलत होते. त्यांच्या नेत्रांत निश्चय, मुद्रेवर उग्रता पण अंत:करणांत करुणा होती. त्यांचें वय होतें २९ वर्षांचें आणि टिळक-आगरकर होते २३ वर्षांचे.

तिघांनींहि देशोद्धारासाठीं शिक्षण-प्रसाराचा निश्चय एकाच वेळीं केला-पण अगदीं पृथक्पणें, स्वतंत्रपणें. दोन डोंगरांतून निघालेल्या नद्या संगम पावून, एक होऊन, एकाच पात्रांतून एकाच दिशेनें वाहूं लागल्या.

ता. १ जानेवारी १८८० रोजीं, पुणें येथें मोरोबादादांच्या वाड्यांत 'न्यू इंग्लिश स्कूल' उघडलें गेलें. 'आज क्रांतीचें बीज पुण्यानें पेरलें,'. असें 'लंडन टाइम्स'नें लिहिलें.

पहिल्या दिवशीं १५९ मुलांनीं नव्या शाळेंत नांवें नोंदविलीं-

विष्णुशास्त्री व बळवंतराव हे दोघेच गोलंदाज पहिले दिवशीं तोफ डागण्यास हजर राहिले. आदल्या दिवशीं शाळेच्या खोल्या झाडायच्या-सारवायच्या होत्या ! तें काम कोणीं केलें ?

टिळकांनीं ! –एल्एल्. बी. झालेल्या टिळकांनीं ! त्या वेळीं पांच-सातशें रुपयांवर, पट्टेवाल्यांच्या इतमामांत, मुनसफाच्या खुर्चीवर, वारा घेत आरामशीर बसूं शकणाऱ्या टिळकांनीं !

गडद्याचें तें काम उरकतां उरकतां मध्यरात्र झाली. मग निजायचें कोठें ? शाळेंतच ! आणि अंथरूण-पांघरूण ? गादी-उशी ?

शाळेंतील फळे हेंच अंथरूण नि अंगावरचें उपरणें हीच उशी !

'आकाश मंडप। पृथिवी आसन।' तुकोबा बोलून गेलेच आहेत. तोच साधुसंतांचा मार्ग या देशभक्तानें स्वीकारला. कालचा देव-भक्त म्हणजे आजचा देश-भक्त.

आणि या शिक्षकांच्या पोटापाण्याची सोय हो ? त्यांचा पगार होता–चांगला ३० रु. पगार होता ! ३० दिवसांला ३० रुपये पगार काय थोडा झाला ? आणि तोहि रोज २४ तास राबून. पहिल्या वर्षीं तर चिपळूणकरांनीं पगाराची पैहि घेतली नाहीं–आणि तसेंच केलें टिळकांनीं. सनद वकिलीची पण पेशा शिक्षकाचा व तो विनावेतन.

'पडेल तें काम करावें, हवें तितकें शिकवावें, पण स्वार्थाकडे मुळींच पाहूं नये.' हींच त्यांचीं सूत्रें. एका वर्षानंतर, एम्. ए. ची पदवी मिळतांच, आगरकर 'न्यू इंग्लिश स्कूल'ला मिळाले.

या शाळेचे किरण महाराष्ट्रांत सर्वत्र पसरले आणि गांवोगांव अशा शाळा निघूं लागल्या. या शाळेंत विद्यार्थ्यांची संख्या गणितश्रेणीनें वाढूं लागली आणि प्रि. आपटे, ना. गोखले असे ध्येयवादी व बुद्धिमान् तरुण तिच्याकडे ओढले गेले. फुलांतून फळ निघावें, तसें १८८५ सालीं या शाळेचेंच फर्ग्यूसन कॉलेजहि निघालें. थोर यश मिळविलें या नवतरुणांनीं–महा-राष्ट्राच्या संजीवकांनीं !



# ‘ शिवरायांचा आठवावा प्रताप ’

“ गोब्राह्मणप्रतिपालक श्रीछत्रपति शिवाजीमहाराज ”

अशी ललकारी भालदार खड्या स्वरांत देत असतांना, मस्तकीं शिरपेंच, कंठांत मोत्यांचा कंठा व कमरेस भवानी तलवार अशा थाटांत, छत्रपतींची स्वारी आस्ते कदम मोठ्या रुबाबानें दरबारांत प्रवेश करीत आहे, सिंहासनावर ऐटीनें विराजमान होत आहे, तोंच सरदार-दरकदार अदबीनें पुढें येऊन तीनतीनदां लवून मुजरे करीत आहेत; आणि त्यांतच साता समुद्रापलीकडून जलचराप्रमाणें आलेले फिरंगी–इंग्रज, फ्रेंच, डच–दोन्ही हात बांधून, पुनः पुनः कुर्निसात करीत आहेत. महाराष्ट्राच्या केवढ्या भाग्याचा, पराक्रमाचा व अभिमानाचा काल हा !

*

पण बरोबर दोनशें वर्षांनंतर–

दौंड स्टेशन ! –पुण्यापासून ५० मैलांवर. एंजिनांच्या कर्कश शिट्या कानठळ्या बसवीत आहेत, उतारूंच्या बकाली गर्दीचा कलकलाट चोहोंकडे कोंदलेला आहे, आगगाड्यांची धांवपळ इकडून तिकडे चालू आहे, ‘ विडीकाडी, चहा--पानपट्टी ’ या घसाफोड आरोळ्यांनीं बाजार माजलेला दिसत आहे, तों–

‘ अरे, मला दोन पैशांची शेव दे रे गड्या ! ’ प्लॅटफॉर्मवरील लांकडी बांकावर बसलेला एक तरुण केविलवाण्या स्वरांत म्हणाला. शेव विकणारा पोऱ्या धांवत आला, कागदांत शेवेचे चार तुकडे गुंडाळून त्यानें त्या तरुणाचे हातांत दिले. त्याच्या डोक्यावर ना टोपी ना पागोटें. अंगांत फक्त एक सदरा नि विजार. त्याच्या हातून दोन तांबडे पैसे घेत घेत पोऱ्यानें विचारलें, ‘ काय, चाय आनूं काय ? ’

‘ नको रे बाबा ! जास्ती पैसे आहेत कुठं माझ्याजवळ ? ’ लांकडीं बांकावर बसलेला तो खिन्न तरुण उद्गारला. खिशांतला हातरुमाल काढून

२...

त्यांत ती सुकी शेव ठेवून ती तो चावीत बसला. 'असेल कुणी तरी हा भणंग!' असें मनांत म्हणत, तो पोऱ्या, तुच्छतेची नजर टाकीत तेथून एकदम झटकला. तोंच—



धिप्पाड शरीराचे दोन गोरे अधिकारी, खाड्खाड् बूट वाजवीत, हातांतील हॅट डोक्यावर चढवीत, त्या तरुणांजवळ येऊन, जमिनीवर आपल्या बंदुका दणकन् आपटून खडे राहिले. रेल्वेच्या फराळ-घरांत, पाव-बिस्किटांवर व सोडा-व्हिस्कीवर ताव मारून, ते दोघे ब्रिटिश अधिकारी, मोठ्या मजेंत व बड्या खुषींत, त्या तरुणाजवळ येऊन उभे राहिले आणि आपापसांत फिदीफिदी हसूं लागले.

आणि कां हसूं नये, गाजरासारख्या लाल गालाच्या त्या गोऱ्या बाळांनीं? त्यांच्या सक्त पहाऱ्यांत, स्टेशनवरच्या बाजारांत, लाकडी बाकावर बसून, हातांत दोन पैशांची शेव घेऊन ती दीनपणें खात बसले होते—

श्रीशिवाजीमहाराज! –

कोल्हापूरचे छत्रपति! !

होय, परमप्रतापी स्वराज्य-संस्थापक श्रीशिवाजीमहाराजांचे वंशज! ! !

रविवार ता. १८ जून १८८२ रोजींची ही दुर्घटना!

त्या दिवशीं सकाळीं साडेसहा वाजतां, या कानाचें त्या कानास कळूं न देतां, ब्रिटिश सरकारनें कोल्हापूरचे छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांना, पुणें स्टेशनावरून, रेल्वेनें नगराकडे चालविलें. आगगाडीच्या पहिल्या वर्गाचे डब्यांत छत्रपति हे ग्रीन व कॉक्स या दोन गोऱ्या अधिकाऱ्यांच्या नजरबंदीमध्यें बसले होते. तीन क्रूर कुत्रींहि त्या डब्यांत घेतलीं होतीं. तिसऱ्या वर्गाचे डब्यांत चौदा शिपाई गडी बसविले होते आणि सामानासुमानाची चाळीस गांठोडीं ठेवलीं होतीं.

दौंड स्टेशनवर ते गोरे राजपालक फराळघरांत आपला तळीराम गार करण्यास गेले आणि बिचारे महाराज, एकटेच त्या बाकावर बसून राहिले. अंगावर श्रीमंतीचें ऐश्वर्य लोळत नव्हतें, तरी त्यांची मुद्रा राजबिंडी, नेत्र तेजस्वी व शरीर कसलेलें होतें. त्यावरून त्यांना ओळखून, एका हिंदी रेल्वे-अधिकाऱ्यानें, मुजरा करून, विचारलें,

'महाराज, इकडे कोणीकडे?'

'अहमदनगरास जात आहें.' विषण्ण स्वरांत छत्रपतींच्या मुखांतून उत्तर आलें.

'कशासाठीं नगरास जाणें होत आहे?'

'तुम्ही ती गोष्ट आम्हांस विचारूं नये आणि आम्हीं ती सांगूं नये.' राजेपणाच्या हुकमतीनें शब्द बाहेर पडले. त्यांतील भाव दैन्याचा होता, पण रुबाव राजाचा होता. दीन-दुर्बल झाला तरी तो सिंहाचा बच्चा होता!

सर्वस्वाला मुकलेल्या आणि पोटासाठीं लाकूडफोड्या बनलेल्या पण सत्याला जागणाऱ्या राजा हरिश्चंद्राची मूर्ति त्यांचे डोळ्यांपुढें उभी राहिली.

औरंगजेबानें कपटानें कैद केलेल्या व क्रूरपणानें हालहाल केलेल्या, पण तरीहि स्वधर्म न सोडणाऱ्या छत्रपति श्रीसंभाजीमहाराजांची आकृति त्यांच्या नेत्रांपुढें नाचूं लागली.

'आपलाहि अंत तसाच होणार काय?' अशी भीषण शंकाहि त्या दुर्दैवी छत्रपतीच्या चित्तांत चमकून गेली. कारण, छत्रपतींना इंग्रजी कावा पुरा माहीत झाला होता. हजारों मैलांवरून येथें आलेले हे उपरे 'वाणी साधूची, करणी कसाबाची' असें वागत असल्याचें त्यांना ठाऊक होतें. हिंदुस्थानांतील राजा-महाराजांच्या तंटेबखेड्यांत हे उपरे उपटसुंभपणें कसे शिरतात, कांहीं तरी खुसपट काढून त्या राजा-महाराजांचें तळपट कसें करतात, हें ते जाणत होते. कोणी संस्थानिक निपुत्रिक म्हणून, तर कोणी कर्जबाजारी म्हणून, 'कुंपिणी सरकारनें' पदच्युत केलेला छत्रपतींच्या स्मरणांत होता.

एखाद्या वानरानें झाडावरील जांभळें पटापट जमिनीवर पाडावीं, त्याप्रमाणें लॉर्ड डलहौसीनें, येथें शेंकडों वर्षें मालक म्हणून नांदलेलीं, सूर्य-चंद्रापर्यंत आपली वंश-वेल पोंचविणारीं, कैक संस्थानें सपाट्यासरशीं कशीं खालसा केलीं, हा इतिहासहि त्यांना आठवला - बडोद्याचे महाराज मल्हारराव यांची दुर्दशा त्यांना आठवली आणि त्यांचे चित्तांत चर्र झालें!

'आपलीहि गत तीच होणार काय?' मन कुजबुजलें.

गेलीं चार वर्षें शिवाजीरावांनीं जो छळ सोसला, तो अगदीं अनन्वित! १८७१ सालीं त्यांना दत्तक घेण्यांत आलें आणि ते कोल्हापूरच्या गादीवर छत्रपति म्हणून बसले.

पण ती गादी नव्हती—तप्त सूळ होता. तेथील दिवाणच त्यांच्या मुळावर उठला—त्या बहाद्दरानें आपल्या धन्याला वेडे ठरविलें आणि त्यांना आपल्या आईची, बायकोची, कोणाचीहि भेट घेण्यास बंदी केली. वेड नसलें तरी वेड लागावें असा कोंडमारा त्या दिवाणानें केला. गोरे डॉक्टर, गोरे पहारेकरी,—अशा कडक बंदोबस्तांत त्यानें महाराजांस ठेवलें.

वेडाच्या भरांत महाराज बेफाम होतात—दुसऱ्याच्या अंगावर धांवून जातात, अशा सबबीवर गोरे पहारेकरी त्यांना शिव्या देऊं लागले, धक्का-

बुक्की करूं लागले, मारहाण करूं लागले, फार काय, कधीं छड्यांनीं तर घोड्याच्या चाबकानें बडवूं लागले!

आपल्याच देशांत, आपल्या राजधानींत, आपल्या राजवाड्यांत आपल्या राजाला कैदी बनविण्यांत आलें आहे–गुरासारखें बडविण्यांत येत आहे, हें ऐकून कोणा प्रजाजनाच्या अंगाचा तिळपापड होणार नाहीं? अंतःकरणाचा भडका उडणार नाहीं?

सर्व महाराष्ट्राला परमपूज्य असणारे श्रीछत्रपति शिवाजी महाराज! ––आणि त्यांच्या गादीवर बसलेल्या छत्रपतीचा छळ, कोल्हापूर शहरींच, सतत वाढत्या प्रमाणावर होत असलेल्या वार्ता ऐकतांना, महाराष्ट्रीय जनतेला आपल्या कानांत कोणी तापलें तेलच ओतीत आहे असें वाटत होतें.

आणि वर्तमानपत्रें म्हणजे लोकांचे कोतवाल! लोकांच्या दुःखाला वाचा फोडणें हें तर त्यांचें आद्य कर्तव्य. मालाकार चिपळूणकरांनीं वर्तमानपत्रांना असा दंडकच घालून दिला होता कीं, "कोठें जुलुमाचा, अन्यायाचा, अडचणींचा किंवा त्रासाचा प्रकार दिसून आल्यास लोकांच्या, सरकारच्या आणि विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नजरेस तो आणावा."

या लोकसेवेच्या हेतूनेंच शास्त्रीबुवांनीं ता. ४ जानेवारी १८८१ रोजीं 'केसरी' पत्र सुरू केलें. त्याचे आधीं दोन दिवस 'मराठा' हें इंग्रजी साप्ताहिकहि त्यांनीं चालू केलें. केसरीचे संपादक गोपाळराव आगरकर तर मराठ्याचे संपादक बळवंतराव टिळक. पण दोन्ही पत्रांत सारी मंडळी एकदिलानें काम करीत होती.

शिवाजीच्या वंशजाची दुर्दशा पाहावेनाशी झाल्यामुळें आगरकरांनीं केसरींत 'लेखणीचे दोन चरचरीत हात मारले' आणि टिळकांनीं मराठ्यांत कोल्हापूरच्या अंधेरनगरीवर झगझगीत प्रकाश पाडणारीं पत्रें छापून प्रसिद्ध केलीं.

'कोल्हापूरचीं काळीं कृत्यें इतकीं घोर आहेत कीं, तीं ऐकून सहृदय पुरुषाच्या अंतःकरणांस घरे पडतील व आकाशपाताळ एक होऊन जाईल.' अशी गर्जना केसरीनें केली व परक्या सरकारला वजावलें कीं, ही स्थिति 'राजनीतीस व व्यवस्थेस अतिशय कालिमा आणणारी गोष्ट

आहे. महाराजांचे प्राण जाऊन शव हातीं आल्यावर आमचे लॉर्डसाहेब जागे होणार काय? कोणत्याहि कारणानें छत्रपतींच्या जिवास अपाय झाला तर त्याचा कलंक बादशाही राणीच्या आणि तिच्या प्रतिनिधींच्या कपाळीं आल्याखेरीज राहणार नाहीं."

केसरी-मराठ्याच्या निर्भय टीकेमुळें सारा महाराष्ट्र खवळून उठला. पुणें येथें ता. २४ नोव्हेंबर १८८१ रोजीं नागरिकांची टोलेजंग सभा भरली. तींत हजारों लोकांनीं कोल्हापूरच्या दिवाणाचा व ब्रिटिश सरकारचा निषेध केला. अध्यक्षस्थानीं 'लोकहितवादी' गोपाळ हरी देशमुख हे वयोवृद्ध पेन्शनर रावबहादूर होते. कोल्हापूरचे एक वकील नाना भिडे यांनीं दोन तास भाषण करून, छत्रपतींच्या छळाची कहाणी सांगून, साऱ्या श्रोत्यांचीं हृदयें हलविलीं. सभेंत जागच्या जागीं ६०० रुपयांचा निधि जमला.

जनतेच्या नाडीवर 'केसरी–मराठा'कर्त्यांचा हात होता. आपल्या नांवाप्रमाणें 'केसरी' दर मंगळवारीं गर्जना करीत होता, गजराजाच्या गंडस्थळावर आपलीं 'खरतर नखें' टोंचीत होता व सरकारास अन्यायाचा जाब विचारीत होता. 'देशस्थिति, देशभाषा व विलायतेंतील राजकारण या तीन विषयांचें यथास्थित उद्‌घाटन' करण्याचें आपलें ध्येय चिपळूणकर-टिळक–आगरकरप्रभृतींनीं केसरी निघण्याआधींच्या प्रसिद्धि–पत्रकांत जाहीर केलें होतें. 'तोंडपुजेपणा न करतां, केवळ निःपक्षपात बुद्धीनें व सत्य-निष्ठेनें' आपलें पत्र चालविण्याचा निर्धारहि त्यांत प्रकट झालेला होता. चालकांनीं आपल्या वाचकवर्गाला असें अभिवचन दिलें होतें कीं, 'सदरील पत्रांतील लेख त्यास ठेविलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें.' आणि हें अभिवचन या पत्रांनीं पुरेपूर पाळल्याची प्रचीति पहिल्याच वर्षी वाचकवर्गाला आली.

केसरी म्हणजे सिंह. तो सर्व पशूंचा राजा. आपल्या गर्जनेनें सारें अरण्य दणाणून सोडणारा. तो कोणाला कधीं भितो काय? हत्ती दिसला कीं शेपटी आपटून व आयाळ सडसडवून त्याच्या गंडस्थळावर झेप घेणारा तो वनराज. 'करवीरारण्यवासी मानवरूपी मदोन्मत्त हत्तीबरोबर

केसरीची टक्कर' झाल्याचें खुद्द केसरीनेंच वर्णन केलें आहे. कोल्हापूरचे दिवाण बर्वे नांवाचे कोणी होते. त्यांना तर केसरीनें धारेवरच धरलें. ते चिडले. त्यांनीं टिळक-आगरकरांवर अब्रू-नुकसानीची फिर्याद ठोकली.

खटला मुंबई येथें ता. ८ फेब्रुवारी १८८२ रोजीं सुरू झाला. बर्व्यांचा बॅरिस्टर युरोपियन, तर टिळक-आगरकरांचे वकील तेलंग व फेरोजशहा मेथा. दोघेहि संपादक अगदीं तरुण—ऐन पंचविशींतले; पण भीति त्यांच्या गांवीं नव्हती; सारी जनता त्यांच्या पाठीशीं होती. लोकांची सहानुभूति लवकरच कसास लागली.

कोर्टांत काय लागत नाहीं? सत्य तर लागतेंच लागतें; पण पुराव्याचे कागद लागतात व मुख्य म्हणजे पैशाचे ढीग लागतात. ज्यांचें नांव ना गांव माहीत, ज्यांची साधी तोंडओळखहि नाहीं, अशा शेटजींनीं टिळक-आगरकरांच्या जामिनकीसाठीं ५००० रुपये आपण होऊन कोर्टांत भरले. घरोघर सर्वसामान्य लोक या प्रकरणाकडे उत्कंठेनें व आपलेपणानें लक्ष पुरवीत होते, टिळक-आगरकरांना साहाय्य करण्यास तत्पर होते.

पण संपत्तीचा लोभ वाईट - आणि त्याहून सत्तेचा. त्यांच्या मोहानें माणूस भित्रा बनतो, दुबळा होतो. 'बडचा बडचा धेंडांच्या उमद्या उमद्या थापांवर' टिळक-आगरकर विसंबून राहिले, पण त्यांनीं या दोन अनुभवी तरुणांना तोंडघशीं पाडलें. 'अवसानघातकी, अधिकार—भीत व स्वार्थ-परायण' अशा पुढाऱ्यांनीं व संस्थानिकांनीं आपल्याला दगा दिला असा आरोप पुढें आगरकरांनीं स्वच्छच केला. त्यामुळें केसरी-मराठ्यांत छापलेलीं पत्रें खोटीं ठरलीं व त्यांच्या आधारानें केलेली टीका कोर्टांत लटकी पडली. सरकार तर परकीच. त्यांनीं जरूर ते कागदपत्र टिळक-आगकरांना दिले नाहींत; आणि आपले संस्थानिक, आपले नेते यांनींहि वचन-भंग करून, पुरावे मिळूं दिले नाहींत.

गळ्यांत खटल्याची घोरपड पडलेली, त्यासाठीं पैसा कसा जमवावा ही काळजी, भल्याभल्यांनीं विश्वासघात केलेला,—अशा चिंताजनक परिस्थितींत सांपडलेल्या टिळक-आगरकरांवर एक भयंकर आपत्ति कोसळली. ती म्हणजे त्यांचे स्फूर्तिदाते गुरु व कार्यकर्ते सहकारी असे महाराष्ट्राचे

संजीवक 'निबंधमाला' कार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें निधन! वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी या थोर पुरुषाला ता. १७ मार्च १८८२ रोजीं मृत्यु आला. मुंबईस खटला सुरू झाल्यानंतर सुमारें एका महिन्यानंतरच हा अनर्थ ओढवला—हायकोर्टाकडे खटला गेल्यावर दोनच दिवसांनीं.

आगबोट बंदरांतून निघते न निघते तोंच तिच्या तळाला भोंक पडावें आणि त्यांतून भरभर पाणी वर येत असावें, आणि ते थांबविण्याच्या खटपटींत खलाशी गुंतलेला असतांना डेकवरील कप्तान एकाएकीं गोळी लागून मरावा—अशी दुहेरी आपत्ति केसरी-मराठा या पत्रांवर आली. पण त्यांच्या संपादकांचें धैर्य अभंग राहिलें. 'आज पांडवांतील धर्मराज स्वर्गवासी झाला.' असे दुःखाचे उद्‌गार काढून लगेच केसरीनें आत्म-विश्वासानें गर्जना केली कीं, 'शास्त्रीबुवांचीच कथा काय, पण आम्हांपैकीं एक जरी तळावर असला तरी तो आम्हीं सर्वांनीं आरंभिलेला उद्योग अविच्छिन्न चालविण्यास होईल तितकी खटपट करील.'

शास्त्रीबुवांच्या निधनानंतर बरोबर तीन महिन्यांनीं, तारीख १७ जुलै १८८२ रोजीं खटल्याचा निकाल लागला. 'तुमच्या मनांत फिर्यादी-बद्दल द्वेष नव्हता.' असें मान्य करूनहि युरोपियन न्यायाधिशानें या दोघां तरुण व विद्वान् अशा देशभक्त संपादकांना चार महिने कैदेची शिक्षा ठोठावलीच! त्या वेळचा तुरुंगवास म्हणजे नरकवास होता. त्यांतहि राजकीय कारणासाठीं तुरुंगांत जाणारे हे पहिलेच संपादक. सारेंच नवीन, सारेंच भयप्रद! पण त्यालाहि हे केसरीचे दोन छावे डगमगले नाहींत, किंबहुना जे पाठीमागें राहिले त्यांनीं केसरीच्या बेडरपणानें तत्काळ जाहीर केलें कीं, 'केसरी दर आठवड्यास लोकसेवा करण्यास तिळप्रायहि डगणार नाहीं. सत्याचा पाठिंबा असेपर्यंत केसरीची गर्जनाहि कमी होण्याचा समय येणार नाहीं.'

मुंबईजवळील डोंगरीच्या तुरुंगांत टिळक-आगरकरांना १०१ दिवस डांबून ठेवण्यांत आलें. तेरा फुटांच्या चौरस खोलींत त्या दोघा देशभक्तांना राहावें लागे, कांदा-भाकर खावी लागे, ढेकूण-सुरवंट यांनीं बुजबुजलेल्या घोंगड्यावर निजावें लागे. १०१ दिवसांत टिळकांचें वजन २४ पौंडांनीं

व आगरकरांचें १६ पौंडांनीं घटलें! कोठें डेक्कन कॉलेज व कोठें डोंगरीचा तुरुंग! एक स्वर्ग तर एक नरक! पण दोन्ही ठिकाणीं हे दोघे ध्येयवादी तरुण शांत मनानें, आनंदानें, देशाविषयींच्या सुखसंवादानें काळ कंठीत होते–'फिरून तुरुंगांत यावें लागलें तर काय करावें,' याचा विचार आपल्या संभाषणांत ते करीत होते–'सत्यमेव जयते' हा सिद्धान्त आपल्या मनावर ठसवीत होते.

ऑक्टोबर महिन्याच्या २६ तारखेस टिळक-आगरकर तुरुंगांतून बाहेर आले. जणुं आग्र्याच्या बंदीवासांतून छत्रपति शिवाजी महाराजच सुटून आले, इतका आनंद महाराष्ट्रीय जनतेस झाला. 'सत्याचे वाली! धैर्याचे पुतळे! अन्यायाचा काळ! देशभक्तीचे अवतार! जनसेवेच्या मूर्ति!"–अशा स्वरूपांत त्यांच्याकडे जागृत जनता प्रेमानें, आदरानें, भक्तीनें पाहूं लागली. महाराष्ट्रभूमीच्या गळ्यांतील ताईत ते बनले. ते दोघे तुरुंगाबाहेर आले, तेव्हां दोन हजार माणसें त्यांच्या सत्कारास तेथें उभीं! त्यांत सुशिक्षित होते तसेंच अशिक्षितहि होते, ब्राह्मण होते तसेच ब्राह्मणेतरहि होते, तरुण होते तसेच वृद्धहि होते व जे जे म्हणून शूर होते ते ते ह्या, लढाई मारून विजयी झालेल्या, सेनापतींचें स्वागत करण्यास जमले होते. आणि असे स्वागत–समारंभ एकट्या मुंबईंत अनेक ठिकाणीं झाले. शेंकडों लोकांनीं देशासाठीं हाल भोगलेल्या त्या तरुणांचें अभिनंदन केलें.

आणि पुण्यांत? पुणें ही तर त्यांची तपोभूमि व कर्मभूमि. थेट खडकी स्टेशनावर डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थी जाऊन थडकले आणि आपल्या कॉलेजांतील त्या दोन माजी पराक्रमी विद्यार्थ्यांचें गुणगान करूं लागले. पुणें स्टेशनावर तर गर्दीच उसळली. त्यांची मोठ्या थाटानें मिरवणूक काढण्यांत आली.

'त्यांना मोठ्या रथांत बसवून वाजतगाजत मिरवीत आणावें आणि त्यांच्या देशसेवेबद्दल त्यांना जनतेनें मानपत्र द्यावें,' अशीहि सूचना 'दीनबंधु' पत्रानें केली. पण डामडौल टिळक–आगरकरांना नको होता.

चिपळूणकरांच्या बंगल्यांत, चिपळूणकरांच्या या दोन मानसपुत्रांना, पानसुपारी देण्यांत आली. संध्याकाळीं जाहीर पानसुपारी झाली, मोरोबा-

दादांच्या वाड्यांत. सभेला चार हजारांवर लोक जमले होते. त्या वेळच्या मानानें ही सभा अपूर्व होती. सभेंत प्रत्येक वक्ता टिळक-आगरकरांची तोंड भरून स्तुति करीत होता. ती ऐकतांना श्रोत्यांचें हृदय अभिमानानें भरलें होतें. सारें वातावरण निर्भय व निःस्पृह राष्ट्रभक्तीनें भरून गेलें होतें.

महात्मा ज्योतिबा फुले यांनीं या त्यागी देशभक्तांचें मोठें कौतुक केलें. फुले यांनीं आपला 'सत्यशोधक समाज' १८७३ सालीं स्थापिला होता. त्याचा रोख ब्राह्मण जातीवर असला, तरी या दोन तेजस्वी ब्राह्मणांचे लोकोत्तर गुण घेण्यास ते मागें सरले नाहींत. त्यांनीं टिळक–आगरकरांच्या सत्काराची एक खास सभा बोलावली आणि त्यांच्या गौरवाचें भाषण करून त्यांना शाल अर्पण केली.

*

त्या दुर्दैवी छत्रपतीचा दुःखद अंत ता. २५ डिसेंबर १८८३ रोजीं झाला. नगरच्या किल्ल्यांत, बंदीवान अवस्थेंत, गोऱ्या रखवालदारांच्या भयंकर मारहाणीला बळी पडून शिवाजीराव मृत्यु पावले. महाराष्ट्राच्या काळजाचें पाणी झालें. केसरीकारांचें मन 'कावरेबावरें व उदास झालें.' या प्रकरणापायीं टिळक-आगरकरांना दहाबारा हजार रुपये खर्च आला. स्वयंस्फूर्तीनें 'केसरी–बचाव–निधि' काढला. त्यासाठीं पुण्यांत एक नाटय-प्रयोग करण्यांत आला. त्या नाटकांत त्या वेळीं कॉलेजांत विद्यार्थी असलेले गोपाळराव गोखले यांनीं स्त्री-भूमिका केली. पुढें कोल्हापूरचे विद्यार्थी पुण्यास परीक्षेसाठीं आले असतांना त्यांनीं कोल्हापूरच्या छत्रपतीसाठीं झुंझारपणें लढणाऱ्या टिळक-आगरकरांचा सत्कार केला. त्या वेळीं गोखल्यांनीं गौरवाचें भाषण केलें. 'नुपेक्षी कदा राष्ट्र दासाभिमानी.'



# दोन उत्सव सामने

अनंतचतुर्दशीचा दिवस. दुपारचे दोन वाजले. पुण्याच्या आळी-आळींतून गणपतीच्या मूर्ति थाटामाटानें, वाजत-गाजत मंडईकडे चालल्या –कांहीं पालखींतून! कांहीं रथांतून! तर कांहीं गाड्यांतून! जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे गणपतींचेंच दर्शन होत आहे; चोहींकडून––

"गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.' असा ध्वनि कर्णपथावर आदळून गगन-मंडळ भेदून जात आहे, सर्वांच्या मस्तकीं मंगल-सूचक गुलाल शोभतो आहे; टिपऱ्यांचे, लेझिमींचे, घुंगुरांचे, चौघड्यांचे व सनयांचे भिन्न भिन्न स्वरसंमेलनानें मनावर चमत्कारिक परिणाम उत्पन्न होत आहे; रे मार्केटापासून आप्पा बळवंतांच्या गेटापर्यंत प्रेक्षकांचे थवेच्या थवे असल्यामुळें पाऊल ठेवावयासहि जागा मिळत नाहीं; रस्त्या-वरील माड्या, छपरें, कौलारें गजबजून सजीव झालेलीं दिसत आहेत."



गणरायाची मिरवणूक संध्याकाळीं सहा वाजतां लकडीपुलाजवळ जाऊन पोहोंचली. वाटेंत बत्ताशांचा वर्षाव होत होता आणि गुलालानें सारे रस्ते लाल झाले होते. रस्तेच काय पण लोकांचे देहहि, फुललेल्या

पळसाप्रमाणें, लालभडक दिसत होते. जागोजाग लेजीम खेळले जात होते. चौकाचौकांत भजनांचा गजर चालला होता. सारे पुणें शहर हालून–हादरून गेलें होतें–धर्मप्रेमानें उचंबळत होतें–हिंदुत्वाच्या अभिमानानें नाचत होतें.

१८९४ सालीं ही क्रांति झाली. गणेशोत्सव काय? लाखों हिंदु हजारों वर्षें करीत आले आहेत–पण आपआपल्या घरीं, एकएकटे, फक्त धार्मिक बुद्धीनें, केवळ पारमार्थिक दृष्टीनें. पण त्याला सार्वजनिक स्वरूप दिलें टिळकांनीं, सामाजिक उपयुक्तता त्यांत ओतली टिळकांनीं, राजकीय, धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याचें तें साधन केलें टिळकांनीं!

या क्रांतीचें कारण काय?

१८९३ सालीं मुंबई येथें मुसलमानांनीं दंगा केला. 'आमच्या मशिदीपुढें टाळ-मृदंग आदि वाद्यें वाजवूं नका. मात्र तुम्हांला पूज्य असणारी गाय आम्ही भर रस्त्यावर कापूं'–अशा दोन आडमुठ्या मागण्या मुसलमान लोक हिंदूंपाशीं करीत. आणि त्या मान्य न झाल्या कीं, हातांतील लाठ्या अगर कमरेंतील सुरे ते उगारीत. मुंबईंतील दंगेखोर मुसलमानांवर सरकारनें तोफा डागल्या. तीन हजार लष्करी शिपाई बंदोबस्तासाठीं आले. गोळीबारांत पाऊणशें माणसें ठार झालीं.

मुंबईनंतर येवल्याला आणि येवल्यानंतर पुण्याला मुसलमानांनीं असेच दंगे केले. ही दंग्यांची आग बेळगांव, धुळें, मालेगांव–अशी गांवोगांव पसरत चालली, त्यांना आळा कसा घालावयाचा?

सरकार परकें, त्याला अशी दुही हवीच होती, किंबहुना ब्रिटिश अधिकारी मुसलमानांना फूसहि देत. 'भेदा व नांदा' हेंच त्यांचें राज्य-सूत्र; पण–

'आपणच आपला वाली' हें टिळकांचें जीवित-सूत्र.

**आत्मैव ह्यात्मनो बन्धुः**

हा गीतेचा मंत्र त्यांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवलेला. हिंदूंनीच एकत्र यावें, संघटित व्हावें व अन्यायाचें निर्दाळण करावें, अशी तळमळ त्यांना लागली. त्यासाठीं नवा पंथ, नवी संस्था कशाला? जुन्या उत्सवांनाच

नवें स्वरूप देण्याचें त्यांनीं ठरविलें. घरोघर होणाऱ्या हिंदूंच्या गणेशोत्सवासच त्यांनीं सार्वजनिक स्वरूप दिलें आणि राजकीय जागृतीचा पाया घातला. गणेशोत्सवांतील मेळ्यांतील पदांनीं साऱ्या थरांतील लोकांपर्यंत हें जागृतीचें लोण पोंचविलें. दहा दहा दिवस शेंकडों सार्वजनिक गणपतींपुढें व्याख्यानें होऊं लागलीं! कीर्तनें रंगूं लागलीं! पोवाडे खणाणूं लागले आणि मेळे दणाणूं लागले!! एकेक मेळा म्हणजे पांच-पंचवीस तरुणांचा ताफा—कसलेल्या शरीरांचा व लाठीकवायत शिकलेल्यांचा. खड्या आवाजानें देशभक्तीचे सूर काढणाऱ्या कार्यकर्त्यांचें तें शिबिरच असे. ते मेळे म्हणजे स्वराज्याचे मेळेच! जेथें जेथें मेळे जात, तेथें लोकांत आनंद पसरे व राष्ट्रभक्ति पिके.

जें पुण्यांत, तेंच अखिल महाराष्ट्रांत. गांवोगांव सार्वजनिक गणेशोत्सव गाजूं लागले, हिंदु लोक जागे झाले व संघटित बनले. मुसलमानांच्या ताबुतांत अंगाला रंग फांसून व बेगडी वाघ बनून हजारों हिंदु भाग घेत असत; ती पद्धत कमी होत गेली आणि हिंदूंच्या अंगीं स्वत्वाचें वारें संचरूं लागलें.

गणेशोत्सवानंतर एकाच वर्षानें टिळकांनीं दुसरा एक सार्वजनिक उत्सव सुरू केला. तो म्हणजे शिवाजी—उत्सव. शिवाजी म्हणजे महाराष्ट्राचा जनक, स्वराज्याचा संस्थापक! त्यांचें स्मरण हें स्वराज्याचें साधन, ऐक्याला आवाहन; पण त्यालाहि परतंत्र महाराष्ट्र विसरूं लागला होता. ज्या रायगड किल्ल्यावर दोनशें वर्षांपूर्वी श्रीशिवाजीमहाराजांच्या राज्यारोहणाचा टोलेजंग समारंभ साजरा झाला, त्याच किल्ल्यावर, त्याच महाराजांची समाधि, पडक्या तटबंदीचे आंत, मोडक्या इमारतींचे सांवलींत, झाडझुडपांच्या गुंतावळींत पार लोपून गेली. कोणाला तिची दाद ना वार्ता! जेथें महाराजांचे सैनिक संचार करीत, तेथें आतां पाकोळ्या फिरूं लागल्या! जेथें चौघड्यांचे नि सनयांचे मंजुळ नाद निनादत, तेथें आतां रातकिड्यांच्या किरकिराटाशिवाय कांहीं ऐकूं येईनासें झालें. जेथें उमदे घोडे थयथयाट करीत, तेथेंच आतां गाढवें फिरूं लागलीं. जेथें हत्ती आनंदाचे चीत्कार करीत, तेथें घुबडांचे

घूत्कार ऐकूं येऊं लागले. जेथें राज्यारोहण–प्रसंगीं सोन्याच्या होनांचा पाऊस पडला, तेथें आतां मातीच्या कणांचा धुराळा उडत होता. सदतीस मण सोन्याच्या रत्नजडित सिंहासनावर बसलेल्या छत्रपतींवर सहस्रावधि शास्त्रीपंडितांनीं सप्तनद्यांच्या व समुद्राच्या उदकांचा अभिषेक केला आणि नंतर छत्रपतींनीं स्वतःची सुवर्ण-तुला केली, तें स्वर्गीय दृश्य रायगडच्या ज्या डोळयांनीं पाहिलें, त्यांनाच––

भयाण बुरूज, ओसाड देवळें, जुनाट वृक्षांचीं खोडें, अर्धवट बुजलेलीं भुयारें, पडक्या इमारतींची ढांसळणारीं जोतीं, जळक्या इमारतींचे भग्न अवशेष, शेवाळयानें आच्छादिलेली पाण्याची टाकी–असें हृदयद्रावक दृश्य आतां दिसत होतें. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे या महाराष्ट्र–पित्याची समाधि जंगलांत, झाडाझुडुपांत, कांटयाकुटयांत, झांकून–बुजून–दडून गेली होती !

रायगडापासून फक्त बारा मैलांवर महाड; पण रायगडची दखल घेतो कोण ? महाराष्ट्रांत लाखों मराठे व हजारों मावळे जिवंत होते, पण महाराजांच्या समाधीकडे लक्ष देतो कोण ? आणि ते सरदार ! ते जहागिरदार ! अन् ते संस्थानिक ! खास छत्रपतींच्या गादीवर बसणारे, महाराजांच्या पुण्याईवर जगणारे–मिरवणारे व त्यांचें नांव अभिमानानें घेणारे असे कैक सत्ताधीश व ऐश्वर्यसंपन्न भाग्यवंत महाराष्ट्रांत ठायीं ठायीं होते; पण महाराजांच्या समाधीची दुरुस्ती करण्याचा विचारहि त्यांच्या मनास कधीं शिवला नाहीं. कधींमधीं गोरे अधिकारी जिज्ञासेनें तेथें जात; पण त्यांना आस्था किती ? दरसाल फक्त पांच रुपये मंजूर करण्यापुरती ! तेवढयांत छत्रपतींच्या समाधीची निगा राखली जावी ही त्यांची अपेक्षा !

छत्रपतींच्या एका वंशजाचा कैवार ज्यांनीं घेतला आणि त्यासाठीं तुरुंगवासहि सोसला, त्या टिळकांना खुद्द छत्रपतींची ही विटंबना कशी पाहावेल ? १८९५ च्या मे महिन्यांत त्यांनीं केसरींतून महाराष्ट्राला सूचना दिली कीं, रायगडाकडे लक्ष द्या, शिवाजीमहाराजांचें स्मारक करा व त्यासाठीं एक समिति नेमा. नुसती सूचना करून टिळक थांबत

नसत, त्यांनीं प्रत्यक्ष कार्याला चालना दिली. खूप खटपट करून पुण्यांत एक सभा भरविली. ता. ३० मे रोजीं हिराबागेंत टोलेजंग सभा भरली. सभेची निमंत्रण-पत्रिका टिळक व सेनापति दाभाडे यांच्या सहीनें निघाली. सभेंत सरदारांनींहि भाषणें केलीं. पंतप्रतिनिधि अध्यक्ष होते. कोल्हापूरचे छत्रपति व न्या. रानडे यांची संमति तारेनें आली होती. पन्नास लोकांची समिति नेमण्यांत आली. तिच्या अधिकारी मंडळांत टिळक होते.

टिळक म्हणजे चैतन्य-मूर्ति. ते एखाद्या कार्याला मिळणें म्हणजे त्याला सहस्र अश्वशक्तीचें एंजिन जोडलें जाणेंच. त्यांनीं केसरींच्या अंकाअंकांमधून शिवाजी–उत्सवाच्या प्रचाराचा नुसता पाऊस पाडला. राजापासून रंकापर्यंत सर्वांचीं अंत:करणें त्यांनीं गदगदा हलविलीं. ते केसरींतून पुनः पुनः आपल्या वाचकांना पटवूं-पढवूं लागले. 'दीडशें वर्षांतील महाराष्ट्राच्या इतिहासांत चमकणारे उच्च विचार व उदात्त मनोविकार महाराजांत एकवटलेले होते असें म्हणण्यास हरकत नाहीं.'

'महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींचें प्रेम एकाच ठिकाणीं बसण्यासारखें जर कोणतें स्थळ असेल तर तें शिवछत्रपतींचें चरित्र हेंच होय.'

लोक जागे झाले–शिवाजीचे जयघोष करूं लागले. एका खाणावळवाल्या विधवा स्त्रीनें पावणेतीन रुपये उत्सवासाठीं दिले, तर एका ठकुताईनें पांच रुपये देऊन एक पत्र धाडलें. तें सारें टिळकांनीं केसरींत प्रसिद्ध केलें. त्याच कार्याला केसरी तेव्हां वाहिलेला होता. ज्या वेळीं जें कार्य हातीं धरलें असेल, त्याचाच छंद टिळकांना लागे–त्याचा निदिध्यास त्यांना सतत लागे. त्यामुळें त्याच एका विषयाचा पुरस्कार ते केसरींतून जोरजोरानें करीत. पानपानभर जागा शिवाजी-स्मारकाच्या देणग्या छापण्यासाठीं त्यांनीं दिली.

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनीं एक हजारांची देणगी दिली, ती ठळकपणें त्यांनीं छापली. गांवोगांवच्या लोकांनींहि पैसे पाठविले–मुसलमानांनींहि पाठविले. दोन महिन्यांत ८००० लोकांकडून ३१०० रुपये जमले. याचा अर्थ गोरगरिबांनींहि आपले पैसे पाठविले–

आणि त्याबरोबर पाठविलें आपलें हृदय ! चार राजेमहाराजांनीं मिळून पांचपन्नास हजार रुपये दिले असते, तर तें कार्य बहुजनसमाजाच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोंचलें, असें झालें नसतें. टिळकांना आपल्या प्रत्येक कार्यांत सर्वसामान्य लोकांचा पाठिंबा हवा होता. तो शिवाजी-उत्सवांत भरपूर मिळाला. पहिल्या तीन महिन्यांत हा निधि ६,५०० रु. जमला, तर पुढील तीन महिन्यांत तो ११,००० वर गेला—आणि १८९६ एप्रिल मध्यें तर त्याचा आंकडा १६,००० पर्यंत पोंचला.

ता. १५ एप्रिल १८८६ रोजीं रायगड किल्ल्याचा जणूं पुर्नजन्मच झाला. त्या दिवशीं टिळकांनीं तेथें शिवाजीचा जन्मोत्सव आरंभिला. आदल्या दिवसापासूनच गडावर माणसांची रांग लागली होती. बाराहि मावळांतले प्रतिनिधि आले होते. किल्ल्यावरील नगारखान्याचा चौक, राजदरबाराचा दिवाणखाना, दिवाणांचा वाडा, दारूखान्याचें कोठार, जगदीश्वराचें व शिरकाई देवीचें देवालय वगैरे इमारती, म्हणजे प्रायः सर्व इमारतींचे अवशेष माणसांनीं गजबजून गेले होते. शेंकडों वर्षांत जेथें केरसुणी फिरली नव्हती तेथील कोळीष्टकें यंदा प्रथमच झाडून निघालीं. देवळांच्या गाभाऱ्यांतील झिरप्यानें बनलेलीं डबकीं उपसून टाकण्यांत आलीं. तुटक्याफुटक्या मूर्तींच्या अंगावरून फार दिवसांनीं एकदां हात फिरला गेला. पिण्याचा पाण्याचा तलाव बराचसा स्वच्छ करण्यांत आला. मुख्य मार्गावरचे-कांटे सराटे काढून टाकण्यांत आले. अंगांत नुसती बंडी व कमरेस लंगोटी अशा गरिबी थाटाची मावळेमंडळी, कांबळ्यांत भाकरी बांधून घेऊन आली होती, व आपआपल्या ऐपतीप्रमाणें नारळसुपारीचा नजराणा महाराजांचे गादीपुढें ठेवीत होती.

संध्याकाळीं मुख्य समारंभ सुरू झाला. अनेक मेळ्यांनीं महाराजांच्या गौरवाचीं गीतें गायिलीं. टिळक--परांजपे प्रभृतींचीं भाषणें झालीं. त्यामुळें श्रोत्यांचें चित्त थरारून गेलें, अंगावर रोमांच उभे राहिले व डोळ्यांपुढें शिवकालीन स्वराज्य नाचं लागलें. शेवटीं खड्या सुरांत स्फूर्तिदायक पोवाडे म्हणण्यांत आले. जुन्या स्वराज्याच्या आठवणीनें नव्या स्वराज्याची आशा सर्वांच्या मनांत धगधगून पेटली.

या उत्सवानें महाराष्ट्रीय मनांत मूळ धरलें. एवढेंच नव्हे तर त्याच्या शाखा बंगालपर्यंत पसरल्या. फार काय? जपान, आफ्रिका या परदेशांमध्येंहि तो साजरा होऊं लागला. टिळकांच्या भगीरथ प्रयत्नाचेंच तें फळ. मध्यंतरीं टिळकांना बंदीवासांत जावें लागलें, त्याबरोबर उत्सवहि बंद झाला. पण ते मोकळे होऊन बाहेर येतांच उत्साहानें उत्सवाच्या कार्यास लागले. १९०० सालीं रायगडावर पुनः समारंभ कडाक्यानें गाजला. पांढरपेशे मंडळी पांच-सहाशेंच होती. पण पंचक्रोशींतील खेड्याखेड्यांतून व वाड्यावाड्यांतून हजारों शेतकरी, मावळे, गडकरी, कामकरी आले होते. रात्रीं वाजंत्री लावून व चंद्रज्योति पाजळून, मशालीचे प्रकाशांत व भजनी मेळ्यांच्या घोषांत, शिवाजीमहाराजांची मिरवणूक पालखींतून काढण्यांत आली. अस्सल मराठेशाही थाटांत गोंधळ्यांनीं दोन तास पोवाडे म्हटले. व्याख्यानें, कीर्तनें, आरत्या इत्यादींची गर्दी उसळली! पहांटे अडीच वाजेपर्यंत समारंभ चालला होता.

१९०६ सालीं रायगडावर तिसरा मोठा उत्सव झाला. पुढें गव्हर्नरहि रायगडास जाऊन आले. त्यांनीं समाधीच्या दुरुस्तीसाठीं पांच हजार रुपये मंजूर केले. पण पुढें माशी शिंकली. ती देणगी या ना त्या सबबीवर दिली गेली नाहीं.

महाराष्ट्रापासून बंगाल किती दूर! त्यांतहि पूर्वीं मराठ्यांची भीतीच बंगाली लोकांना वाटे. पण टिळकांनीं आपल्या राजकारणाच्या मंत्रानें बंगाल वश करून घेतला होता. तेथील प्रसिद्ध पुढारी सुरेंद्रनाथ बानर्जी, बिपिनचंद्र पाल वगैरेंनीं १९०३ सालापासून या उत्सवांत भाग घेतला. कलकत्ता येथील सभेस श्रोत्यांची संख्या तर दहा हजारांपर्यंत होती. शिवाजीमहाराजांचे पांच हजार फोटो फुकट वांटले गेले. पुढलीं कांहीं वर्षें अशाच वैभवानें बंगालमध्यें शिवाजी-उत्सव सालोसाल साजरा झाला. १९०६ सालीं तर कलकत्ता येथील उत्सवांत टिळकांना बोलावण्यांत आलें होतें, त्यामुळें उत्सवास विशेषच रंग आला होता. बंगाली लोकांनीं टिळकांच्या गाडीचे घोडे सोडून ती स्वतः ओढीत नेली.

मिरवणुकीला प्रचंड गर्दी लोटली होती–आणि ती मुखानें टिळकांचा जयजयकार करीत होती–व ओंजळीनें त्यांचेवर पुष्पवृष्टि करीत होती. शिवाजीचा उत्सव तेथें चार दिवस सतत चालू होता. शेवटीं गंगेपर्यंत शिवाजीच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यांत आली.

१९०५ सालीं शिवाजी-उत्सवानें आपल्या देशाची मर्यादा ओलांडून त्यानें जपानवर स्वारी केली. टोकिओमध्यें जपानी, चिनी स्त्री–पुरुषांनीं शिवाजीचा गुणगौरव केला. १९०६ सालींहि एका बौद्ध मंदिरांत जपानी, चिनी, सयामी, जर्मन आणि हिंदी विद्यार्थ्यांनीं हा उत्सव प्रचंड प्रमाणावर साजरा केला. ४०० हून अधिक लोकांनीं या उत्सवांत भाग घेतला.

अखेर १९२१ सालीं शिवाजी-उत्सवाला सरकार-मान्यताहि मिळाली. त्या वर्षीं पुणें येथें छत्रपतींच्या पुतळ्याची कोनशिला इंग्लंडच्या युवराजांनीं बसविली.

शिवाजी म्हणजे स्वातंत्र्याची प्रदीप्त ज्वाला ! शिवाजी म्हणजे अखंड प्रयत्नांची मूर्ति ! शिवाजी म्हणजे निर्लोभी जनसेवेची पताका ! त्यांचें नांव महाराष्ट्रभर दुमदुमलें ! त्यांची स्मृति प्रत्येक महाराष्ट्रीयाला झाली. आणि त्याचें फल म्हणजे महाराष्ट्रामध्यें स्वातंत्र्याची लालसा वाढली, पारतंत्र्याशीं लढा देण्याची हिंमत दुणावली आणि लोकसेवेची वृत्ति बळावली.

*

लोकसेवेच्या संधि एकामागून एक येतच होत्या. इंग्रजांचें राज्य म्हणजे कपटानें मिळविलेलें व लूटमारीनें चालविलेलें. सालोसाल कोटयवधि रुपये इंग्रज हिंदुस्थानांतून लुटून नेत. त्याचा परिणाम काय झाला ?

१८९६ सालापासून दुष्काळावर दुष्काळ पडूं लागले. धान्य नाहीं, वैरण नाहीं, पाणी नाहीं–असा हाहाकार सर्वत्र उडाला. गुरें कडब्याच्या किंमतीनें विकूं लागली–व कडबा सोन्याच्या किंमतीनें ! खेड्यांतील उपासपोटी लोकांचे तांडेच्या तांडे शहराकडे धांव घेऊं लागले. पण

शहरांत तरी काय ? तेथील विणकर लोकांना सरकारनें खडी फोडण्याचें काम दिलें व खडी फोडणारे अन्नान्न करीत प्राण सोडूं लागले. पोटासाठीं कोठें आयांनीं आपलीं मुलें विकलीं तर कोठें मोठ्यांनीं आपला धर्म विकला. गुरें आणि माणसें पटापट मरूं लागलीं.

आपल्या बांधवांची ही दुर्दशा नष्ट करण्यासाठीं टिळक कंबर कसून उभे राहिले. त्यांनीं सरकारला आपलें कर्तव्य काय आहे हें बजावलें आणि लोकांना आपले हक्क काय आहेत हें समजावून दिलें. पुण्याच्या 'सार्वजनिक सभे' तर्फे त्यांनीं जिल्ह्याजिल्ह्यांत प्रचारक पाठविले, पत्रकें काढलीं. तीं पत्रकें कांहीं कलेक्टरांनीं परत केलीं—जाळूनहि टाकलीं ! गांवोगांवच्या सभांनाहि सरकार बंदी करूं लागलें. तेव्हां टिळक केसरींतून कडाडून टीका करूं लागले. परीक्षेसाठीं पुण्यास गांवोगांवाहून गोळा झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनीं दुष्काळग्रस्त देशबांधवांची सेवा करण्याचा उपदेश केला.

ठाणें जिल्ह्यांतलें एक खेडें. खत्तलवाड हें त्याचें नांव. तेथें टिळकांचे प्रतिनिधि गेले. त्यांनीं गांवकऱ्यांची सभा भरविली. तिला दोन हजार लोक आले होते. त्यांत कोळी होते, वारली होते—आणि होते पोलीस, फौजदार, कलेक्टरहि. या सभेंत टिळकांच्या प्रतिनिधीनें गांवकऱ्यांना उपदेश केला कीं, 'तुमचीं पिकें बुडालीं असलीं तर तुम्ही सरकारास शेतसारा देऊं नका.' असा उपदेश केल्याबद्दल त्या प्रतिनिधीवर सरकारनें खटला भरला. या सभेची वार्ता आपल्या वाचकांना देतांना टिळकांनीं केसरीमध्यें जंगी मथळा दिला :—

'पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यांत भरलेली रयतेची जंगी सभा.'

असा लांबलचक व प्रक्षोभक मथळा—आणि त्याखालील लेख म्हणजे भीमाची गदाच ! टिळक अशा लेखांनीं सरकारवर हल्ल्यामागून हल्ले चढवीत असत आणि लोकांचे हाल दूर करण्याचा प्रयत्न करीत असत. जनतेची अशी निर्लोभ सेवा निर्भय वृत्तीनें करण्यांतच टिळकांचा सारा जन्म गेला.

त्यांनीं गरिबांसाठीं स्वस्त धान्याचीं दुकानें उघडलीं.

या वेळींच टिळकांच्या बुद्धीनें निश्चय केला होता कीं, स्वराज्य-प्राप्ति हें आपल्या जीविताचें साध्य आणि लोक-जागृति हें त्याचें साधन. ही लोक-जागृति करण्याचें साधन कोणतें ?

शिक्षण-प्रसार हें एक. त्यासाठीं ते विष्णुशास्त्र्यांच्या झेंडयाखालीं जाऊन उभे राहिले-आगरकरांच्या खांद्याला खांदा देऊन काम करूं लागले. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्यूसन कॉलेज या दोन्ही शिक्षण-संस्थांत त्यांनीं एक नव्हे, दोन नव्हे, चांगलीं दहा वर्षें काम केलें. जन्मभर तेंच काम–नव्या पिढीवर शुभ संस्कार घडविण्याचें काम-करण्याचीच त्यांची इच्छा होती. पण–

संस्थेंत नवींनवीं माणसें आलीं. त्याबरोबर त्यांची नवी वृत्तीहि आली. पुस्तकें लिहून पैसे कमावण्याकडे कांहींनीं लक्ष पुरविलें. आरंभींची तळमळ गेली, त्यागवृत्ति लोपली, ध्येयबुद्धि मंदावली–असें टिळकांना वाटलें. चालकांमध्यें मतभेद झाले–खटके उडूं लागले. टिळक-आगरकरां-सारखे समान वयाचे, समान संकल्पाचे, समान ध्येयाचे, सहाध्यायी व सहकार्यकर्ते–पण त्यांच्यांतहि सहकार्य होईना–त्यांच्यांतून विस्तव जाईना. दोघांचीं तोंडें दोन दिशांना.

तेव्हां टिळकांनीं आणखी एक स्वार्थत्याग केला. आपलें जन्माचें ध्येय जें शिक्षण-कार्य, त्याचा त्याग त्यांनीं केला. त्यांनीं डेक्कन एज्यु-केशन सोसायटीचा राजीनामा दिला. दहा वर्षें, रात्रंदिवस, पोट बांधून, जिवापाड श्रम करून, प्रथमपासून वाढविलेल्या आपल्या प्रिय संस्थांचा–लाडक्या कन्यांचा निरोप घेऊन दुःखित अंतःकरणानें ते बाहेर पडले.

बाहेर पडले तरी त्यांचें ध्येय सुटलें नाहीं. ध्येय तेंच, साधन भिन्न. स्वराज्य-प्राप्तीसाठीं लोक-शिक्षण हा मार्ग कायम, पण त्या लोक-शिक्षणा-साठीं शाळा-कॉलेजाऐवजीं नवें दार त्यांनीं उघडलें–तें म्हणजे वृत्तपत्रें.

'केसरी-मराठा' हीं वृत्तपत्रें शास्त्रीबुवांनींच १८८१ सालीं काढलीं होतीं. त्यांत आगरकर–टिळक रक्त ओतून लिहीत होते. त्यापायीं डोंगरीच्या तुरुंगाची हवाहि हे वीर खाऊन आले होते. पण पुढें वृत्त-पत्रांच्या क्षेत्रांतहि मतभेद उत्पन्न झाले–आणि विकोपासहि गेले. ते डेक्कन

कॉलेजांत असतांनाच हे मतभेद धुमसत होते, पण प्रत्यक्ष कार्याला लागल्यावर ते धडाडून पेटले आणि त्यांतून ठिणग्याच बाहेर पडूं लागल्या.

स्त्रीशिक्षण व प्रौढविवाह, जातिभेदनिवारण व अस्पृश्यतानिवारण-या सामाजिक सुधारणा आधीं केल्या पाहिजेत आणि सर्व समाजांत समता, बुद्धिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य हे गुण रुजविले पाहिजेत, मग राजकीय स्वातंत्र्य आपण सहजच मिळवूं, अशी विचारसरणी आगरकरांची; तर टिळकांचें मत असें कीं, शिक्षण-सुधारणा असो कीं सामाजिक सुधारणा असो, धार्मिक उन्नति असो कीं आर्थिक विकास असो—राष्ट्र-सेवेचें कोणतेंहि कार्य आपण घेतलें, तरी आपल्या साऱ्या वाटा परक्या सरकारनें रोखून धरलेल्या आहेत—सारीं दारें बंद आहेत—जिकडे पाहावें तिकडे 'प्रवेश बंद' अशा पाटचा लागलेल्या आहेत. या सर्व रोगांचें मूळ कारण जें पारतंत्र्य, तें आपण आधीं नष्ट करूं, मग स्वातंत्र्यामध्यें या साऱ्या सुधारणा आपण हां हां म्हणतां करूं.

या दोन विचारांचा संघर्ष वाढत चालला. तो टाळण्यासाठीं या भावाभावांत वांटणी झाली. टिळक-आगरकर हे भाऊभाऊच नाहींत तर काय? टिळकांनीं केसरी-मराठा हीं वृत्तपत्रें आपल्याकडे घेतलीं—आणि त्या-बरोबरच घेतला त्यावरील कर्जाचा बोजाहि! १८८७ च्या ऑक्टोबरमध्यें टिळक केसरी-मराठ्याचे मालक बनले, तर १८८८ च्या ऑक्टोबरमध्यें आगरकरांनीं 'सुधारक' नांवाचें आपलें स्वतंत्र साप्ताहिक सुरू केलें.

'केसरी'साठीं टिळकांनीं काय केलें नाहीं? छापखान्यांतील टाइ-पांच्या पेटचा स्वतःच्या खांद्यावरून वाहिल्या—केसरीच्या वर्गणीदारांचे शेंकडों पत्ते दर आठवड्यास स्वतःच्या हातांनीं लिहिले—पहिला अंक तर घरोघर वांटण्याचें काम एल्‌एल्. बी. झालेल्या टिळकांनीं केलें. आणि संपादकीय कचेरीचा थाट काय सांगावा! घोंगडीवर बसून व वळकटीवर कागद ठेवून ते संपादकीय लेख लिहीत. रात्रंदिवस लहानमोठें काम ते करीत. पुढेंहि १८।१८ तास ते एका बैठकींत काम करीत. मुंबईत कॉंग्रेसचे वेळीं केसरी रोज काढण्यासाठीं टिळक एकदां ३६ तास सतत काम करीत होते.

आरंभीं केसरी होता चिमुकला --

अवघ्या चार लहान पानांचा--दोन पैसे किंमतीचा. वार्षिक वर्गणी फक्त एक रुपया ! त्या वेळीं आगरकर लहानमोठे विषय घेऊन ते खुसखुशीतपणें मांडीत. त्यांच्या लिहिण्यांत पांडित्याची प्रभा असे, अलंकारांचा लखलखाट दिसे व विनोदाची पखरण दरवळे. कधीं 'चिंध्या' तर कधीं 'कादंबरी' वर ते अग्रलेख लिहीत, कधीं बालविवाह तर कधीं स्त्री-शिक्षण हे विषय ते रंगवीत.

कोल्हापूर प्रकरणानंतर केसरीचा प्रसार झपाट्यानें वाढला. त्याच्या साडेतीन हजार प्रति खपूं लागल्या. असा एकएक खटला म्हणजे सरकारशीं युद्धच. त्या युद्धाच्या वार्ता वाचण्यासाठीं तरुणांच्या उड्या केसरीवर पडत. तीन वर्षांचे आंत केसरीचा खप ४२०० झाला. त्या वेळच्या वृत्तपत्रांत हा विक्रमच होता. म्हणून हा आंकडा केसरीच्या पहिल्या पानावर, मराठींत व इंग्रजींतहि, ठळकपणें छापण्यांत येऊं लागला.

टिळकांच्या हातांत गेल्यापासून 'केसरी' हा महाराष्ट्राचें मुखपत्र बनला--स्वराज्याचा तोफखानाच ठरला. राजकीय विषयावर टिळकांचा भर, आणि त्या विषयावर लेखांचा पाऊस पाडण्यांत त्यांचा हातखंडा ! महाराष्ट्रांतील दोन पिढ्यांना राजकीय जन्म देण्याचें श्रेय टिळकांचेंच. पुढें महाराष्ट्रांत निरनिराळ्या सार्वजनिक क्षेत्रांत जे कार्यकर्ते चमकले, त्यांपैकीं बहुतेकांना स्वदेशसेवेची प्रेरणा टिळकांकडूनच मिळाली. 'टिळकांचे केसरींतील लेख वाचूनच मी राजकारणाकडे वळलों' अशी साक्ष आतां वृद्ध झालेले शेंकडों कार्यकर्ते देत आहेत. टिळकांनीं नवाच महाराष्ट्र घडविला !



# 'सेवेला देह वाहिला.'

जे कोणी रंजले-गांजले असतील त्यांना आपुलें म्हणून त्यांचें दुःख निवारणें हेंच टिळकांचें जन्म-कार्य. जीं बांधलेलीं आहेत तीं सोडवावींत, जीं बुडत आहेत तीं काढावींत आणि दीनदुबळ्यांचीं सांकडीं फेडावींत, हाच टिळकांचा बाणा. म्हणून गांजलेल्या लोकांना ते आपला आसरा वाटत – कैवारी वाटत. 'अनाथांचा नाथ' या दृष्टीनें त्यांच्याकडे सर्व दलित लोक पाहात.

टिळकांना दीन-दलितांची सेवा करण्याची नवी संधि १८९६ सालीं चालून आली. दुष्काळाचे पावलावर पाऊल ठेवून एक नवाच रोग हिंदुस्थानांत आला – त्याचें नांव प्लेग. कोणाला प्लेग झाला कीं त्याच्या अंगांत ताप भरावयाचा आणि जांघेंत गांठ उठावयाची. तीन-चार दिवसांत रोगी खलास! एका पुणें शहरांत एकएका दिवसांत २०० ते ३०० माणसें प्लेगनें मरूं लागलीं. साऱ्या महाराष्ट्रांत प्लेगची साथ वणव्याप्रमाणें पसरली. टिळकांनीं लोकांना स्वच्छता ठेवण्याबद्दल सूचना दिली, आणि स्वतः एक खाजगी दवाखाना प्लेगच्या रोग्यांकरितां त्यांनीं काढला. मोफत अन्न देण्यासाठीं अन्नछत्रहि त्यांनीं चालविलें.

पण सरकार काय करीत होतें? त्यांनींहि स्वच्छतेचें काम चालविलें होतें–पण भुतासारखें, राक्षसासारखें, पिशाच्चासारखें! गोरे सोजीर कोणाच्याहि घरांत घुसत, भांडीकुंडीं-कापडचोपड घराबाहेर फेंकत, दागदागिने लुटत, देवदेवता आपटत, आजाऱ्यांना व म्हाताऱ्याकोताऱ्यांनाहि हुसकावत; फार काय, बायाबापड्यांची विटंबनाहि करीत!

देवांचें पावित्र्य व स्त्रियांचें पातिव्रत्य–सर्व सज्जनांना प्राणासमान प्रिय. हिंदु समाज तर या दोन पवित्र वस्तूंना प्राणापेक्षांहि अधिक मानतो. एक वेळ तरवारीच्या धारेवरून तुम्ही बोट फिरवूं शकाल किंवा पेटलेल्या

निखाऱ्यांवरून पायांनीं चालत जाऊं शकाल, पण देव व स्त्री यांचा अनादर किंवा विटंबना हाडाचा हिंदु कधींहि सहन करणार नाहीं. विजेच्या जिवंत तारांना स्पर्श करणेंच तें!–बंदुकीच्या गोळयांना सामोरेंच जाणें तें. त्यांत मृत्यु ठेवलेलाच!

हाच अनुभव सरकारला आला. पुण्यांतील प्लेगची व्यवस्था पाहण्यासाठीं रँड नांवाचा एक जुलमी अधिकारी सरकारनें नेमला होता. त्याच्यावर सारे पुणेकर दांतओठ खात होते. त्याच्या छळांनीं व अत्याचारांनीं सारी जनता खवळून गेली होती. त्याचा सूड उगविण्याचे विचार कैक तरुणांच्या डोक्यांत थैमान घालीत होते.

अशा तरुणांमध्यें तीन भाऊ होते. त्यांचें आडनांव चाफेकर. एका कीर्तनकारांचीं तीन मुलें––दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव ही त्यांचीं नांवें; आणि २७, २४ व १७ हीं त्यांचीं वयें. तिघेहि वृत्तीनें अत्यंत धर्मनिष्ठ, आणि शरीरानें अत्यंत सुदृढ! दररोज १२०० नमस्कार घालावेत, एका तासांत अकरा मैल दौड मारावी, भारी गड्याबरोबर कुस्त्या खेळाव्या–असा व्यायामाचा त्यांना मोठा छंद. पर्वतीवर त्यांनीं 'गोफण क्लब' स्थापन केला. दीडशें मुलें तेथें नित्य जमत आणि गोफणीनें धोंडे मारण्यास शिकत. भगवीं निशाणें घेऊन लुटुपुटीच्या लढाया खेळत. तेथें 'गोफण्या मारुतीची' स्थापनाहि त्यांनीं केली.

चाफेकरबंधूंनीं पुण्यांत 'राष्ट्रहितेच्छु मंडळी' काढली. तेथें दांडपट्टा, भालाफेंक, मुष्टियुद्ध असे लढाऊ खेळ शिकविले जात. हा लढा कोणाशीं द्यावयाचा? तर हिंदुधर्माच्या विरोधकाशीं! त्यांनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांना दगड मारले, हिंदुधर्माविरुद्ध बोलणाऱ्या कांहीं सुधारकांना लोखंडी कांबीनें बडविलें, मुंबईतील परीक्षेच्या मंडपास आग लावली आणि राणीच्या पुतळ्यास डांबर फांसलें. स्वधर्माचे जे वैरी ते त्यांचे वैरी; तसेच स्वदेशाचे जे शत्रु त्यांनाहि हे आपले शत्रु मानूं लागले!

स्वधर्मासाठीं जीव देण्याची व जीव घेण्याची त्यांची तयारी होती–जशी स्वधर्मासाठीं, तशीच स्वदेशासाठींहि. आपल्या देशबांधवांना लुटणाऱ्या इंग्रजांचा ते तिटकारा करूं लागले–फोनोग्राफसारख्या परक्या

वस्तूंवर ते बहिष्कार घालूं लागले--जुलूम करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यावर ते चडफडूं लागले. आणि एके दिवशीं--

प्लेगची तपासणी करणारी गोऱ्या शिपायांची टोळी चाफेकरांच्या घरीं आली. ते सोजीर, त्यांच्या माजघरांत–स्वयंपाकघरांत–देवघरांतहि शिरूं लागले. बायका घाबरल्या–कावऱ्याबावऱ्या झाल्या. सर्वांना वाटलें, हा आपल्या धर्मावर घाला आला. एक गोरा अधिकारी म्हणाला, ' मला तुमच्या घरांत जावयाचें आहे–साऱ्या खोल्या तपासावयाच्या आहेत. '

' असें होणार नाहीं–तुमचें या घरांत जाणें होणार नाहीं. ' जणुं विजांचाच कडकडाट झाला. बाळकृष्ण व दामोदर या दोन्ही बंधूंनीं करड्या स्वरांत त्या सोजिराला मनाई केली. त्यांचा तो दणदणीत आवाज व खणखणीत देह पाहून गोरा अधिकारी निमूटपणें पुढें निघून गेला.

आगींत तेल ओतावें त्याप्रमाणें, दुष्काळानें हैराण झालेल्या जनतेला प्लेगनें पछाडलें, आणि वर सरकारी जुलमानें सळो का पळो करून सोडलें. ' नको हा जीव ! ' असें साऱ्या लोकांना होऊन गेलें. पण जनतेच्या या हालाचें, छळाचें, जुलमाचें व एकंदर दुर्दशेचें भान परक्या सरकारला कोठून असणार ? तें आपल्याच अधिकाराच्या तोऱ्यांत ! आपल्याच विलासांत मग्न ! आपल्याच मौजेंत चूर ! आपल्याच नाचरंगांत दंग ! इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिला राज्यावर बसून या वेळीं साठ वर्षें पूर्ण झालीं होतीं. म्हणून हिंदुस्थानांत सरकार हीरकोत्सव साजरे करीत होतें. पण मृत्यूच्या दाढेंत सांपडलेली महाराष्ट्रीय जनता त्या आनंदांत सामील कशी होणार ?

ता. २२ जून १८९७ ची रात्र ! पुण्याजवळील गणेशखिंडींत उत्साह उतूं चालला होता. कारण तेथें गव्हर्नरचा बंगला होता.–आणि त्या बंगल्यांत सरकारी मेजवानीचा थाट उडाला होता. अधिकाऱ्यांच्या गाड्यांमागून गाड्या गणेशखिंडीकडे चालल्या होत्या. टेकड्या टेकड्यांवर रंगीबेरंगी दारूकाम होत होतें. तें पाहण्यासाठीं आंबटशोकी लोकांचे थवेच्या थवे जमले होते.

आणि त्याच गणेशखिंडीकडे निघाले दोन तरुण ! कोण होते ते ?

कशासाठीं तिकडे निघाले होते ते ? आणि त्यांच्या उपरण्याचे आंत काय दडलेलें आहे तें ?

स्वधर्मासाठीं व स्वदेशासाठीं तळमळणारे व तडफडणारे चाफेकरबंधु होते ते ! प्लेगमधील जुलुमाचा सूड उगविण्यास त्यांनीं हाच मुहूर्त मुक्रर केला. पहांटे उठून, पळत जाऊन, चतुःश्रृंगी देवीचें दर्शन त्यांनीं घेतलें आणि यशासाठीं देवीची प्रार्थना केली. सर्व दिवस त्यांनीं ईश्वरचिंतनांत घालविला. संध्याकाळीं ७॥ वाजतां श्रीमंगलमूर्तीस नमन करून, वडील-मातोश्रींचें सादर स्मरण करून, बरोबर गीता ग्रंथ घेऊन, कोणालाहि कळूं न देतां, बाळकृष्ण व दामोदर हे ऐन पंचविशींतील दोन तरुण गणेश-खिडीकडे झपाझप निघाले. तेथें जाऊन पोंचतांच त्यांनीं आपल्या बरोबरीच्या तरवारी व कुऱ्हाडी पुलाखालीं ठेवून दिल्या !

गणेशखिडींत मेजवानीचा सोहळा थाटानें पार पडला. राजनिष्ठ लोकांनीं उंची उंची खाद्यपेयांवर हात मारून राणीसाहेबांना तोंड भरून दुवा दिला. भरल्या पोटानें ते सारे गोरे अधिकारी आपआपल्या गाड्यांतून शहरांत परत जाऊं लागले. रँडची गाडी चालली, तिच्यामागून १०-१५ पावलें पाठीमागें बाळकृष्ण धांवत होता ! गाडी ६०० यार्ड गेली–पिवळ्या बंगल्यापाशीं पोंचली–तोंच–

'गोंद्या !'

अशी खुणेची हांक बाळकृष्णानें दिली. दामोदर तेथें आला. दोघांनीं दोन गाड्यांच्या पाठीवर चढून पिस्तुलांतून झटाझट् गोळ्या झाडल्या आणि लगेंच हरणाप्रमाणें पळत जाऊन त्या अंधारांत ते दिसेनासे झाले.

आपण एक सत्कृत्य केलें–शतकृत्य केलें असें वाटून चाफेकरबंधु आनंदांत झोंपले. दुसरे दिवशीं पुण्यांतहि आनंदीआनंद होऊन गेला. कोणीं खडीसाखर वांटली, तर कोणीं पेढेहि वांटले. घरांत विषारी साप निघाला म्हणजे जो तो घाबरून दूर पळतो, पण त्याला कोणीं ठेंचून मारलें म्हणजे टाळ्या पिटतो. तसाच हा प्रकार ! जुलमी रँड मेला आणि त्याबरोबरच त्याच्या मागील गाडींतील निरुपद्रवी साहेबहि निष्कारण मेला !

१४६५२



त्याचा परिणाम काय झाला ?

रँडचे जागीं दुसरा अधिकारी आला. सरकारचा पुणेकरांवरील जुलूम दसपट-शतपट वाढला. सारे पुणेकर भयभीत झाले. जिकडे पाहावें तिकडे सामसूम ! जो तो चूपचाप !

आणि चाफेकर-बंधूंचें काय झालें ? काय व्हायचें ? व्हायचें तेंच झालें. आमच्याच लोकांनीं त्यांना पकडून दिलें. फितुरी हा आमच्या रक्तांत भिनलेला रोग आहे—पांचवीस पुजलेला भोग आहे.

फितुरीच्या जाळयांत चाफेकर-बंधु सांपडले – तिघेहि बंधु ! दामोदर व बाळकृष्ण यांचा पत्ता साहेबाला सांगणारे द्रविड-बंधु निघाले. या फितुरीचें प्रायश्चित्त म्हणून वासुदेव चाफेकरानें दोन्ही द्रविड—बंधूंना, खुन्या मुरलीधराचे देवालयाजवळ, रात्रीं नवाचे सुमारास, बरोबर नेम साधून, पिस्तुलांतील गोळयांनीं ठार केलें.

पुढें वासुदेवालाहि एका फितुरानेंच पोलिसांचे हवालीं केलें—आणि सरकारनें त्याला फांसावर चढविलें.

येरवडयाच्या तुरुंगांत ता. ८ मे १८९९ रोजीं, प्रभात काळीं हातांत भगवद्गीता घेऊन, 'दादा, चाललों रे मी !' असा आपल्या बंधूंना अखेरचा निरोप देऊन प्रसन्न मुद्रेनें वासुदेव फांसाच्या फळीवर चढला.

फांशीची वाट पाहात, तुरुंगाच्या कोठडींत डांबलया गेलेल्या बाळकृष्णानें ते निरोपाचे शब्द ऐकले—आणि, आणि—

आणि चारच दिवसांनीं, ता. १२ मे रोजीं बाळकृष्णानेंहि फांशीच्या फळयांवरून मृत्यूस कवटाळलें.

तेथेंच आणि त्यापूर्वीं दामोदराचेंहि बलिदान होऊन गेलें होतें. ता. १८ एप्रिल १८९९ रोजीं दामोदरानें फांशीच्या दोरींत आपली मान आनंदाने अडकविली.

आदले दिवशीं रात्रीं, उपवास करून, प्रार्थना म्हणून, 'नारायण नारायण जय गोविंद हरे !' असा देवाच्या नांवाचा जप करून पवित्र अंत:करणानें तो निजला—आणि दुसरे दिवशीं स्वर्गीं गेला !

तीन तेजस्वी तरुणांच्या शौर्याचा व देशभक्तीचा अंत असा झाला !

तीन तरुण देशभक्तांचा हा उज्ज्वल त्याग कोणाला स्फूर्ति देणार नाहीं ? नाशिक येथें सोळा वर्षांच्या 'विनायकाचें' कविमन तर थरारून गेलें. त्यानें त्याच क्षणीं, रात्रीं जागून, एक पोवाडा रचला व चाफेकर-बंधूंचा गौरव केला कीं,–

शतावधी ते जन्मा येती मरोनि जाती ना गणती ।
देशासाठीं मरती त्यांसी 'देश-पिते' कीं बुध म्हणती ॥

याच वीर-गीतांत कवि सावरकर टिळकांचे गुण असे गातात :

देशवीर महाराज शूर श्रीटिळक तयांचें क्षेम असो ।
खरा हिरा हा कसासि उतरे, काळ–भीति 'बाळासि' नसो ॥

१८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धानें इंग्रज सरकार घाबरून गेलें होतें. आपलें राज्य धुळीस मिळतें कीं काय असें भय त्याला पडलें होतें. त्यानंतर सुमारें वीस वर्षांनीं, १८७९ मध्यें, वासुदेव बळवंत फडके यांनीं धामधूम उडवून दिली, तेव्हांहि सरकार घामेघूम झालें. नंतर अदमासें वीस वर्षांनीं, १८९७ मध्यें, चाफेकर-बंधूंनीं रँडचा खून केला व सरकारला धसका बसविला, 'पुण्यांतील साऱ्या सुशिक्षित ब्राह्मणांचाच हा कट असावा' असें मानून सरकार कावरेंबावरें झालें. रँड-खुनानंतर पांच-सहा दिवसांतच सबंध पुणें शहरावर जादा पोलीस बसविण्याचा ठराव मुंबई सरकारनें केला. प्लेगच्या दिवसांतील पुंड सोजीर जातात न जातात, तोंच या जादा पोलिसांची घोरपड पुणेंकरांवर आली.

या वेळीं टिळकांवरील जबाबदारी मोठी होती. त्यांचें कार्य बिकट होतें–नाजूकहि होतें. सच्चा संपादक म्हणून लोकांच्या हक्कांचें रक्षण निर्भयपणें करावयाची जबाबदारी त्यांचेवर होती. त्यासाठीं परक्या व जुलमी सरकारावर टीकेचे हल्ले चढविण्याचें बिकट कार्य त्यांना बजावा-वयाचें होतें–आणि हीं दोन्ही कामें पार पाडण्यास ते पुरेपूर समर्थ होते; पण त्यांची स्थिति अत्यंत नाजूक झाली होती. कारण चाफेकरांचा तो अत्याचारी मार्ग त्यांना पसंत नव्हता, पण चाफेकरांना ते दोष देऊं इच्छित नव्हते.

त्यांचें शौर्य, त्याग व देशभक्ति यांचे ते अत्यंत चहाते होते; पण

एकएका हिंदी व्यक्तीनें एकट्यादुकट्या गोऱ्या अधिकाऱ्याचा खून केल्यानें आपल्या देशाला स्वराज्य मिळेल, असें त्यांना स्वप्नांतहि कधीं वाटत नव्हतें. त्यांच्या सूक्ष्म बुद्धीनें इंग्रजांचें अजस्र सामर्थ्य बरोबर जोखलें होतें आणि जगाचा इतिहास वाचल्यानें त्यांची बालंबाल खात्री पटली होती कीं, अशा वैयक्तिक अत्याचारानें सरकारी जुलुमाची चीड व संताप व्यक्त होतो इतकेंच, पण स्वराज्याच्या मार्गावर राष्ट्राचें एक पाऊलहि पुढें पडत नाहीं. त्यासाठीं सर्व लोकसमाजच शहाणा झाला पाहिजे, एकजूट बनला पाहिजे आणि परसत्तेशीं सामना देण्यास उभा ठाकला पाहिजे.

अर्थात् टिळकांची, गांधीजींप्रमाणें, अहिंसेवर निर्भेळ श्रद्धा होती असें नाहीं. कोणींहि केव्हांहि कशासाठींहि हिंसा करणें हें गांधीजींना पाप वाटे व ते तिचा कडकडून निषेध करीत.

**‘ अहिंसा उत्तम, हिंसा मध्यम व भीरुता अधम ’**

अशी गांधीजींची तात्त्विक बैठक होती. स्वराज्यापेक्षांहि सत्याला ते अधिक मान देत. टिळकांना हिंसा अशी वावडी वाटत नव्हती, पण ती आजच्या परिस्थितींत शक्य नाहीं, व्यवहारी नाहीं, उपयुक्त नाहीं अशी त्यांची ठाम समजूत होती. त्यामुळें त्यांनीं वैयक्तिक अत्याचाराला कधींहि प्रोत्साहन दिलें नाहीं. पण चाफेकरांसारख्यांचे गुण घेण्यासहि ते कधीं कचरले नाहींत.

अशा नाजूक भूमिकेवरून केसरींत लेख लिहिणें म्हणजे तारेवरची कसरतच होती. इकडे चाफेकरांचें कृत्य नापसंत पण त्यांना दोष तर द्यावयाचा नाहीं; उलट सरकारचें धोरण पूर्ण नापसंत, पण सरकारी कायद्याची रेषा तर ओलांडावयाची नाहीं – अशा पेंचांत असतांनाहि टिळकांनीं केसरींत जे लेख लिहिले ते अत्यंत रोखठोक असे होते. ‘ ब्रिटिश ऑफिसरांचे खून व्हावेत ही गोष्ट अत्यंत निंद्य व भयंकर आहे. ’ असें त्यांनीं स्पष्टपणें व मनापासून लिहिलें, पण सरकारावर टीकाहि केली.

रँड-खुनानंतर सरकारच्या दडपशाहीमुळें सारे लोक भीतीनें गर्भगळित झाले होते. कोणीहि तोंडांतून सरकारविरुद्ध ‘ ब्र ’ काढण्यास

धजत नव्हतें. अशा स्थितींत, त्या खुनानंतर अवघ्या पंधरा दिवसांत, ता. ६ जुलैच्या केसरींत, टिळकांनीं एक खणखणीत अग्रलेख लिहिला. त्याचें शीर्षकच मुळीं ' सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय ? ' असें दणदणीत आहे. ब्रिटिश सरकारला असा रोकडा जाब विचारणारा त्या वेळीं दुसरा कोणी मायेचा पूत पुढें आला नाहीं.

एकटे टिळक ! धैर्याचे महामेरु ! ! आजूबाजूचे सैनिक व सेनानी जखमी होऊन जमिनीवर पडले असतांना, सरसेनानीनें हातीं समशेर घेऊन शत्रूवर वार करावा तशी टिळकांची ही वीर कृति होती. रानामध्यें वाघ किंवा लांडगा शिरला म्हणजे ससे-हरणें पळत सुटावींत, पण एकटया सिंहानें मात्र त्या वाघा-लांडग्यांचा समाचार घ्यावा, तसा टिळकांचा हा लढाऊ पवित्रा होता. त्या वेळीं त्यांचे हातांत लेखणी नव्हती, लोखंडाचा अजस्र घण होता आणि त्याचे घावामागून घाव ते सरकार-वर घालीत होते. त्याच अग्रलेखांत टिळक दरडावून म्हणतात, ' एखादा मोठा हत्ती पिसाळला असतां ज्याप्रमाणें तो वाटेल तशी धूळधाण करीत सुटतो, तद्वत् आमच्या सरकारची स्थिति झाली आहे, खुन्यास जो खून चढावयाचा तो आमच्या सरकारास चढून सरकारची नजर अगदीं फिरून गेली आहे. '

टिळकांचें अंत:करण म्हणजे एक ज्वालामुखीच. तें सदैव जळत असे--उकळत असे-त्यांतून बाहेर पडणारे स्फुलिंग म्हणजे केसरींतील लेख ! त्यांच्याइतका बहाद्दर प्रचारक दुसरा झाला नाहीं ! चळवळ चेतविणारा तसा पुढारी क्वचितच ! लोकहिताचा एखादा विषय त्यांनीं हातांत धरला कीं त्याचा ते आपल्या वाणीनें व लेखणीनें एकसारखा धोषा लावीत. कोणत्याहि कार्याची तड लावल्याशिवाय त्यांना स्वत:लाहि चैन पडत नसे व इतरांनाहि ते चैन पडूं देत नसत. कारण, त्यांना ध्येयाचा सदैव ध्यास ! कार्याचा अखंड छंद ! ! युद्धाची उदंड हौस ! ! !

एखादा सोनार सोन्याचा वारीकसा गोळा घेऊन, ऐरणीवर ठेवून, हातोडयाचे घाव त्यावर घालून घालून त्या सोन्याचा अत्यंत पातळ व लांबच लांब असा पत्रा तयार करतो, त्याप्रमाणें स्वराज्य असो, स्वदेशी

असो, पैसा-फंड असो, तो विषय टिळकांच्या हातांत गेला कीं त्याचा त्यांनीं विस्तार केलाच म्हणून समजावें. साऱ्या प्रांतांत, साऱ्या देशांत त्या वेळीं तो एकच विषय घुमत राहावयाचा.

आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्यासारखा महान् व तांतडीचा विषय असल्यावर मग काय विचारतां ? पळापळाला टिळक मनांत त्याचेंच चिंतन करीत, वाणीनें त्याचाच प्रचार करीत व लेखणीनें त्याचाच पुरस्कार करीत. पारतंत्र्याचा धिप्पाड पहाड त्यांच्या डोळ्यांपुढें उभा होता, तो फोडण्यासाठीं ते आपल्या लेखणीची छिनी रात्रंदिवस चालवीत होते, आणि 'यारे यारे सारे जण' असें म्हणून, हांक देऊन, लोकांना पाचारून, आपापल्या हातोड्यानें व कुदळीनें काम करण्यास लावीत होते. त्यांनीं पोखरलेला तो पारतंत्र्याचा पहाड, अखेर दुसऱ्या महायुद्धाच्या झंझावातानें, जमीनदोस्त झाला आणि स्वातंत्र्याची वाट मोकळी झाली. याचें श्रेय लहान-थोर, नेमस्त-जहाल, सर्वच देशभक्तांना आहे हें खरें, पण त्यांत टिळकांचा वांटा फार मोठा !

लोकांनीं भिऊं नये, दबूं नये, उलट जुटीनें व धिटाईनें परक्या सरकारशीं सामना द्यावा, ही निर्भयतेची व प्रतिकाराची वृत्ति टिळक प्रत्येक प्रसंगीं जनतेंत निर्माण करीत. रँड–प्रकरणामुळें सरकार काळ बनलें असलें, तर टिळक कृतांतकाळ झाले होते. 'दुरभिमान, दुराग्रह व दुरिच्छा यांचेंच सरकारच्या कौन्सिलांत प्राबल्य होऊन राहिलें आहे.' असें त्यांनीं खडसावून सांगितलें आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या 'अरेरावीपणाचा व शिरजोरपणाचा' कडक निषेध केला, एवढेंच नव्हे तर असा अधिकारी 'वेड्याच्या इस्पितळांत पाठविण्यासारखा आहे,' असा चरचरीत शेरा मारला. या गव्हर्नराइतका 'कोणीहि जुलमी व अन्यायी गव्हर्नर झाला नाहीं.' असा स्पष्ट आरोप त्यांनीं केला आणि 'अन्यायाची व असमंजसतेची कमाल झाली,' असें मत स्वच्छ स्वच्छ लिहून टाकलें. 'मुंबई सरकारचें डोकें फिरून गेलें आहे आणि त्यांची नीति मोगलाईतहि क्रूर निर्दयपणाची मानली गेली असती,' असे कठोर प्रहार त्यांनीं केले.

नुसती मोगलाईच काय, पण रावण-राज्याचीहि उपमा इंग्रज सरकारला देण्यास टिळक कचरले नाहींत. त्यांच्या शब्दांत किती त्वेष भरलेला असे, आणि त्यांची भाषाशैली वीरश्रीनें कशी रसरसलेली असे, हें कळण्यासाठीं केसरीचा ता. १३ जुलै १८९७ चा अग्रलेख वाचला म्हणजे पुरे! 'राज्य करणें म्हणजे सूड उगविणें नव्हे!' असा जरब बसविणारा मथळा देऊन टिळक लिहितात,

'एकदां राज्य कमावल्यानंतर राज्यांतील सर्व व्यवस्था तेथें आपल्या सामर्थ्याचा डौल मारून करणें म्हणजे रावण-राज्याचेंच अनुकरण करणें होय. राज्य करणें म्हणजे जेथें तेथें आपली तलवार काढून, 'मानवा, तूं काय समजलास? तुला सुपारीच्या खांडासारखा खाऊन टाकीन, मारीन, जाळीन, पोळीन.' अशा तऱ्हेनें लोकांना भिववीत सुटणें नव्हे. ज्या राजास नेहमींच्या व्यवस्थेनें बंदोबस्त ठेवतां येत नाहीं, तो राज्य करण्यास नालायक समजला पाहिजे. खून झाला, आण पलटण आणि जाळ सगळा गांव, हा न्याय नव्हे, राजनीति नव्हे आणि मुसद्दीपणाहि नव्हे.'

अशी आग टिळक सरकारवर पाखडीत. त्यांचें लिहिणें कितीहि न्यायाचें असलें तरी परकें सरकार तें सहन कसें करणार? सिंहाच्या आयाळीचे केंस मुलानें ओढले म्हणजे सिंह आपला पंजा त्या मुलावर उगारतो ना? तसें इंग्रज सरकारनें टिळकांवर आपलें दडपशाहीचें हत्यार उगारलें. ता. २७ जुलै १८९७ रोजीं टिळक मुंबईस गेले होते. तेथेंच पोलिसांनीं त्यांना पकडलें आणि पोलिस कमिशनरच्या खोलींत डांबून ठेवलें.

अकस्मात् अटक! आणि राजद्रोहाचा भयंकर आरोप! पुढें तुरुंगवासाचें संकट उभें! पोलीस-कचेरींत रात्रीचा मुक्काम! – अशा स्थितींत टिळकांना भेटण्यास त्यांचे एक स्नेही गेले. तों त्यांना काय आढळलें?

शांत चित्तानें टिळक गाढ झोप घेत होते!

टिळकांना न्यायाधिशांनीं ५०,००० रु. च्या जामिनावर तात्पुरतें सोडण्याचें मान्य केलें. आणि काय आश्चर्य! दोन जामीन आपण होऊन

London 1st October
1919

Dear Sir

Please accept my warmest thanks for your kind message of congratulations and good wishes on the occasion of my 64th birthday. God grant that I may yet deserve it by my work. Believe me

Yours very sincerely
B. G. Tilak

॥ श्री ॥ लंडन, १ आक्टोबर
१९१९

कृ. सा. नि. वि. माझ्या ६४ व्या जन्मदिवसाच्या प्रसंगी आपण स्मरणपूर्वक जो प्रेमाचा निरोप मजला पत्रद्वारे पाठविला त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. या प्रेमाला अनुरूप अशी माझ्या हातून कांही देशसेवा घडून येवो एवढीच परमेश्वरापाशी माझी प्रार्थना आहे. कळावे, लोभ असावा हे विनंती.

आपला
बाळ गंगाधर टिळक.

## टिळकांची भूपाळी

[कवि : कै. गोविंद, नाशिक]

नव्हे टिळक ही, आत्मश्रद्धा शिवरायाची असे ।
खरोखर । शिवरायाची असे ।।
निश्चयनिग्रह भगवा झेंडा करांत झेलीतसे ।। १ ।।

रामदासकृत रघुरापाची उपासना ही म्हणूं ।।
खरोखर । उपासना ही म्हणूं ।।
धीरश्रीनें वीरश्रीनें भयास भिववी जणूं ।। २ ।।

विद्वत्तेच्या अंकावरती देशभक्ति खेळते ।
टिळक ही । देशभक्ति खेळते ।।
बंधुप्रीती गीतें गाते समता ती डोलते ।। ३ ।।

मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे ।
तुझ्यावर । शब्दांचे बुडबुडे ।।
तुझे पवाडे गातिल पुढतीं तोफांचे चौघडे ।। ४ ।।

पुढें आले. ‘अर्ध्या लाखाची काय कथा ? टिळकांना पांच लाखांनाहि जामीन राहण्यास मी तयार आहें,’ असें मुंबईचे एक डॉक्टर म्हणाले. लोकांचा इतका विश्वास टिळकांनीं संपादन केला होता.

आणि तोच नेमका सरकारच्या डोळ्यांत खुपत होता. म्हणून त्यांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली. शिक्षा सुनावणारा न्यायमूर्ति युरोपियन होता. तरी त्यांनीं असे उद्‌गार टिळकांना उद्देशून काढलेच कीं, ‘आपली बुद्धि व आपलें सामर्थ्य हीं विलक्षण आहेत. प्लेगच्या वेळीं आपण चांगलें काम केलें आहे, म्हणून मी थोडी शिक्षा देतों.’ येरवड्याच्या तुरुंगांत टिळकांची रवानगी झाली. साऱ्या देशांत हाहाःकार उडाला !

विद्यार्थ्यांनीं संप केले.—मजुरांनीं उपवास केले. प्रत्येक तरुण महाराष्ट्रीयाला वाटलें, आपल्या घरांतीलच एक माणूस आज दूर गेला. साऱ्या महाराष्ट्रांत दुःखाची छाया पसरली. दिवाळी नाहीं, दसरा नाहीं, संक्रांत नाहीं.——गोडधड खाणेंहि हजारों लोकांनीं सोडलें. सभासभांत टिळकांचा गौरव होऊं लागला. बंगालचे मुलूखमैदान वक्ते सुरेंद्रनाथ बानर्जी एका जाहीर सभेंत म्हणाले,

‘ना. टिळकांबरोबर तुरुंगांत जाण्याचा प्रसंग मला आला असता, तर त्यायोगें माझा सन्मान झाला असेंच मीं मानलें असतें.’

हिरा कीं कांच याचा निवाडा ऐरणीवरच होतो; तसा निकाल या खटल्यानें दिला – आणि तो पूर्णपणें टिळकांच्या बाजूनें दिला ! टिळक म्हणजे अष्टपैलू हिरा आहे, अशी सर्वांची खात्री झाली.


आणि तिकडे इंग्लंडांत ?

*

एक प्रोफेसर—मॅक्समुल्लर हें त्यांचें नांव. संस्कृतचे गाढे पंडित. हिंदूंचा ऋग्वेद त्यांनीं अभ्यासिलेला. एखाद्या ऋषीप्रमाणें सारा जन्म त्यांनीं तत्त्वज्ञानाला वाहिलेला ! एके दिवशीं सकाळीं ते आपल्या खुर्चीवर बसून टेबलावरील टपाल पाहात होते. पाहतां पाहतां एक बुकपोस्ट

त्यांचे हातीं आलें. तें फोडून पाहतात तों आंत एक इंग्रजी पुस्तक!– अगदीं भिकार मुखपृष्ठाचें – आणि तसेंच भिकार छपाईचें !

'असेल कसला तरी हा कॅटलॉग.' असें म्हणून प्रोफेसरसाहेब तें पुस्तक केराच्या टोपलींत टाकणार होते, पण सहज त्यांची नजर पुस्तकाच्या नांवाकडे वळली.



'आर्यांचें मूलस्थान' हें त्या पुस्तकाचें नांव. तें पाहतांच साहेब चमकले. तो त्यांच्या अभ्यासाचा विषय. त्यांत नवें कोण काय सांगतो, असें पाहण्याची त्यांना जिज्ञासा झाली. त्यांनीं तें पुस्तक उघडलें. आणि एक एक पान ते वाचूं लागले. पानांमागून पानें वाचतां वाचतां ते थेट पुस्तकाच्या शेवटापर्यंत गेले–आणि 'वा, वा !' करीतच उठले.

त्या भिकार ग्रंथांतील संपन्न विचार पाहून ते चकित झाले. असे

स्वतंत्र संशोधन करणारा लेखक आहे तरी कोण? म्हणून त्यांनीं पुस्तकावर नांव पाहिलें तर :

B. G. Tilak


‘काय करतात हे ग्रंथकार? कोणत्या कॉलेजांत शिकवीत असतात हे?’ त्यांनीं चौकशी सुरू केली.

आणि त्यांना जबरदस्त धक्काच बसला, त्या ग्रंथकाराचें त्या वेळचें निवासस्थान ऐकून. कारण तें निवासस्थान म्हणजे—येरवड्याचें कारागृह!

तेथें टिळक रंग तयार करण्याचें मजुराचें काम करीत होते—स्वदेशसेवेसाठीं आपला देह झिजवीत होते—आपल्या बुद्धीची किंमत देत होते.

हें कळतांच त्या इंग्रज पंडितानें - मॅक्समुल्लर यानें - विलायत सरकारकडे अर्ज केला कीं, टिळकांसारख्या महाविद्वानाला तुरुंगांत रखडत ठेवूं नका, त्यांची शिक्षा कमी करा. महर्षि दादाभाई नौरोजी, सर रमेशचंद्र दत्त अशा थोर थोर लोकांनींहि अशीच मागणी सरकारकडे केली. ती मागणी मान्य करून सरकारनें टिळकांची सहा महिन्यांची शिक्षा कमी केली, आणि ता. ६ सप्टेंबर १८९८ रोजीं रात्रीं—

दुसरा बंदीवास भोगून टिळक बाहेर आले. साऱ्या पुणें शहरांत, नव्हे महाराष्ट्रांत, आनंदीआनंद झाला. दिवाळीची रोषणाई लखलखली व सणावाराच्या मेजवान्या झडल्या. व्रतांची सांगता झाली व नवस फेडण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्राच्या देहांत पुन: प्राण आला—त्याच्या राजकीय आकाशांत सूर्य पुन: प्रकाशूं लागला. जे तरुण नेमस्त वृत्तीकडे झुकलेले होते, तेहि टिळकांचें हें धैर्य व त्याग पाहून दिपले—जिंकले गेले—आकर्षित झाले. टिळकांचे अनुयायीच बनले ते! लोकमान्यांच्या लोकसंग्रहाची गुरुकिल्लीच ही!



## नोटीस

### बक्षीस रुपये ५००

खालीं सही करणाऱ्या ग्रहोपग्रहादिक मंडळींकडून तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं, या आमच्या मंडळांत राहुकेतूची आम्हांस अतिशय बाधा होत आहे. अलीकडे आमच्या पुणें शहरांत टिळक यांणी तर कांहीं प्रलय करून सोडला आहे. या गृहस्थांत पुष्कळ व्यंगें असून, त्यांचें डोकें अगदीं फिरून गेलें आहे अशी आमची बालंबाल खात्री झाली आहे; परंतु अशी खात्री होण्यास कारणें अगर पुरावा गेल्या आठवड्यांत अहोरात्र खटपट करीत असतांहि अद्यापि आम्हांस मिळाला नाहीं. करितां सर्व लोकांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं खालीं लिहिलेली माहिती आमचेकडे पाठवून वर लिहिलेलें बक्षीस उपटावें. पुरावा खोटा असला तरी चालेल, पण तो खात्रीलायक असावा. आम्हीं आमच्यांत ‘असत्य-प्रसारक-मंडळी’ची स्थापना केली आहे.

सेक्रेटरीज्

टिळक-परसीक्यूशन-क्लब, पुणें.

किती विलक्षण आहे ही जाहिरात, नाहीं ? ती ता. १९ एप्रिल १८९२ च्या केसरींत प्रसिद्ध झाली हें त्याहून विलक्षण ! – आणि तीहि टिळक संपादक असतांना प्रसिद्ध झाली ! – सारेंच विलक्षण ! !

अशी ही विलक्षण जाहिरात देणारा ‘ टिळक-छलक-संघ ’ कोणाचा ? तो कधीं स्थापन झाला ? कां झाला ?

तो संघहि खोटा नि ती जाहिरात पण खोटी ! केवळ कल्पित ! टिळकांनींच आपल्या कल्पनाशक्तींतून काढलेली - केवळ गंमतीनें, विनोदानें.

पण नुसता विनोदच टिळकांना करावयाचा नव्हता. विनोद त्यांचा लाडका नव्हता. मग त्यांनीं ही विनोदी जाहिरात कां लिहिली–आणि छापलीसुद्धां ?

हा त्यांचा विनोद म्हणजे एक प्रकारचा विरोधच होता. त्यांचे जे विरोधक होते, त्यांना हें हंसरें उत्तर होतें. त्यांचे जे प्रतिस्पर्धी होते, त्यांच्यावर उचललेलें हें गोड हत्यार होतें. त्यांचे जे वैरी होते–खोट्या-नाट्या गोष्टी छापीत होते–कांहींहि आधार नसतां त्यांची बदनामी करीत होते, त्यांच्यावर हा हंसत हंसत केलेला हल्ला होता.

आणि टिळकांना विरोधक विविध पक्षांचे होते. त्यांना प्रतिस्पर्धी जन्मभर भेटले. त्यांचे टीकाकार स्वदेशांत व परदेशांतहि होते. त्या सर्वांशीं झुंजण्यांत–झगडण्यांतच त्यांचा सारा जन्म गेला. त्यांचें सारें आयुष्य म्हणजे एक अखंड युद्धच आहे. राष्ट्राच्या पारतंत्र्याशीं युद्ध–आणि त्या पारतंत्र्याचे जे जे कोणी पूजक असतील, पोषक असतील, त्यांच्याशींहि युद्ध !

पहिलें युद्ध सरकाराशीं – साम्राज्यशाही, बलाढ्य ब्रिटिश सर-काराशीं. कां ? तर त्यांनीं आमचें राज्य हिरावून घेतलें – कपटानें व क्रौर्यानें. तें आमचें राज्य आम्हांला परत द्या–असें म्हणून टिळक सरकाराशीं भांडत. ‘ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळ-विणारच ’ असें ते हजारों हजार लोकांच्या शेंकडों सभांत जाहीरपणें ठांसून बोलत - लोकहि ते बोलूं लागत–बोलल्याप्रमाणें हळूहळू वागूं लागत-ब्रिटिशांच्या सत्तेखालचा पाया उखडूं लागत. जे जे गोरे अधिकारी

गरीब, अडाणी, परतंत्र हिंदी जनतेला छळीत, त्यांच्यावर टिळक तुटून पडत. जनतेचा कैवार घेऊन ते सरकाराशीं सतत लढत. म्हणून त्यांना 'हिंदी असंतोषाचे जनक' असें इंग्रज लेखक म्हणत.

या ब्रिटिश सत्तेचे जे पाईक होते, पोशिंदे होते—त्यांनाहि टिळक धारेवर धरीत. 'भेदा व नांदा' या कुटिल नीतीनें ब्रिटिश सरकार वागे. सरकारानें मुसलमानांना हिंदूपासून फोडलें—दंगा करण्यास उठविलें—आणि 'आम्हांला स्वराज्य नको,' असें म्हणावयास लावलें. अशा दंग्यांत हिंदूंची कड घेऊन भांडणारे टिळकच !

एखादी आई आपल्या मुलाला शेजारच्या गुंड पोरानें मारल्याचें कळतांच धावून जाते व तणतणून बोलते,. तसें टिळकांचें सारें लिहिणें-बोलणें असे. ते अखिल हिंदुस्थानचा कैवार घेत-सर्व हिंदु समाजाचा पाठपुरावा करीत. जेथें जेथें अन्याय असे, तेथें तेथें तो नष्ट करण्यासाठीं ते धांवून जात आणि धैर्यानें लढत – मग तो अन्याय करणारे परके असोत वा स्वकीय असोत.

आपल्याच हाडामांसाचे जे विद्वान् लोक परक्या सरकाराची ताबेदारी करीत आणि आपल्या तोंडाला रुपेरी लगाम लावून घेत, त्यांच्याशीहि टिळकांना अनेक सामने द्यावे लागले. खिशांत लठ्ठ पगार व शिरावर रावसाहेब-रावबहादुरीच्या पदवीचा तुरा-अशा सरकारी थाटांत राहणाऱ्या व हिंदी लोकांवर यथेच्छ तोंडसुख घेणाऱ्या न्यायमूर्तींनाहि जाहीर जाब विचारणारे टिळकच !

हिंदु समाजांत अनेक अनिष्ट चालीरीति होत्या – नसतात कोणत्या समाजांत त्या ? ज्ञानानें, समजुतीनें, मतपरिवर्तनानें, त्या हळूहळू घालवावयाच्या असतात. ती टिळकांना 'हृदयाची जखम' वाटे. ते म्हणत, 'गोड बोलून, किंबहुना मुळींच न बोलतां, नुसत्या आचारानेंच मी ती जखम भरून काढीन.'

सामाजिक सुधारणा टिळकांना जरूर हवी होती; पण ती कायद्याच्या कुऱ्हाडीनें त्यांना नको होती. युक्तिवादानें, प्रचारानें, शिकवणीनें त्यांना तें कार्य साधावयाचें होतें. त्यांनीं १८८५ मध्येंच केसरींत स्पष्ट लिहिलें

आहें कीं, 'पारतंत्र्यामुळें आमच्या लोकांची स्थितीच अशी झाली आहे कीं, राजकीय बाबतींत सुधारणा झाल्याखेरीज आमची सामाजिक स्थिति सुधारावयाचीच नाहीं.' घोडी कां अडली ? भाकरी कां करपली ? पानें कां सडलीं ? या तिन्ही प्रश्नांचें उत्तर जसें 'न फिरविल्यानें' हें एकच आहे; त्याप्रमाणें आमची सामाजिक सुधारणा कां होत नाहीं ? आमच्यांत शिक्षण प्रसार कां पावत नाहीं ? आमची औद्योगिक क्रांति कां साधत नाहीं ? इत्यादि नाना प्रश्नांचें उत्तरहि एकच, आणि तें म्हणजे 'परतंत्र असें राज्ययंत्र न फिरविल्यानें.'

आज आपल्याला राजकीय स्वातंत्र्य मिळालेलें आहे आणि त्यामुळें, पूर्वींच्या पारतंत्र्यांत, आपल्या लोकांना किती छळ, किती संकटें, किती अपमान सोसावे लागत याची कल्पना येत नाहीं. त्याप्रमाणेंच आतां सामाजिक सुधारणा पुष्कळच झालेली असल्यानें पूर्वींच्या काळीं किती दुष्ट, क्रूर व अपमानकारक रूढि आपल्या समाजांत घर करून बसल्या होत्या, हें कोणास सांगूनसुद्धां खरें वाटणार नाहीं. त्या सर्व रूढि नष्ट कराव्यात असें टिळकांचें मत असे, पण त्यासाठीं परक्या सरकारचा कायदा आमच्या घरांत शिरावयास नको, असा त्यांचा आग्रह असे.

अगदीं साधी गोष्ट. स्त्रियांनीं पायांत जोडा घालावा. पण हें ठरण्यासाठीं किती वर्तमानपत्रांच्या कागदावर किती शाई सांडली असेल ! उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून एखादी स्त्री पायांत जोडा घालून व डोक्यावर छत्री घेऊन रस्त्यावरून चालत गेली, तरी लोक तोंडांत बोटें घालीत आणि म्हणत, 'काय हा अनाचार !'

आणि तीच स्त्री जर का हातांत पाटी-पुस्तकें घेऊन शाळेंत जाण्यास निघाली तर मग काय विचारतां ? आकाशच कोसळलें ! जो तो तिच्याकडे बोटें दाखवीत असे—खडेसुद्धां मारीत असे. अशा स्त्रियांच्या अंगावर घाण पाणी ओतण्यास स्त्रियाच पुढें येत !—अगदीं पांढरपेशा—कुलीन—खानदानी ! समजूतच होती तशी त्या वेळीं. त्यामुळें महात्मा फुले यांनीं स्त्रियांच्या शिक्षणासाठीं शाळा काढली तर केवढें काहूर माजलें. त्या शाळेंत शिकविण्यासाठीं त्यांच्या पत्नी सावित्रीबाई जाऊं लागल्या,

तर त्यांनाहि हे सर्व प्रसाद मिळालेच !

आणि लग्नें ? ८।८, १०।१० वर्षांच्या मुलां-मुलींचीं सर्रास होत ! —विद्वानांच्या, पुढाऱ्यांच्या, सुधारकांच्यासुद्धां घरीं ! रा. ब. नगरकर यांचा मुलगा दहा वर्षांचा व त्याची वधू पांच वर्षांची असा बालविवाह १८८१ सालीं झाला. न्या. तेलंग म्हणजे केवढें बडें प्रस्थ ; पण त्यांनींसुद्धां आपल्या मुलीचा विवाह केला तिला नववें वर्ष लागण्याचे आंतच ! न्या. रानडे यांचें वय प्रथम विवाहाचे वेळीं १३ वर्षांचें ! खुद्द टिळकांचें लग्न झालें वयाच्या पंधराव्या वर्षीं आणि पुढील पिढींतील केळकर विवाहाच्या वेशींत शिरले पंधराव्या वर्षींच ! त्या वेळीं त्यांच्या पत्नीचें वय होतें अवघें सात वर्षांचें ! तशी रूढीच होती त्या वेळीं ना ! अगदीं पाळण्याला बाशिंग बांधूनहि कोठें कोठें लग्नें होत !



बाल-विवाहामुळें बाल-विधवा हजारों-लाखों दिसत. आठ आठ, दहा दहा वर्षांच्या मुली ; पांढऱ्या फटफटीत कपाळानिशीं, सारा जन्मच्या जन्म, ना संसार, ना मूलबाळ, अशा एकाकी केविलवाण्या

स्थितींत झिजत-झुरत मूकपणें घालवीत. कोंवळ्या कळ्या चुरगळल्या जात !

त्यांना पुनर्विवाह करण्याची बंदी ! पुरुष मात्र सात-सात लग्नें करीत ! – एकामागोमाग किंवा एकाच वेळींहि ! केवढी ही भयंकर विषमता ! स्त्री आणि पुरुष या एकाच समाजाच्या फांद्या ना ? पण एक फांदी दडपली जात होती दुःखाच्या दरींत, तर दुसरी जाऊन भिडली होती थेट आकाशाला !

विधवा स्त्रीनें पुनर्विवाह करणें म्हणजे तेव्हां मोठा डोंगर चढून जाणेंच होतें. महर्षि अण्णासाहेब कर्वे यांनीं पुनर्विवाह केला तर त्यांना आपल्या गांवीं जाण्याला बैलगाडी मिळेना, कीं आपल्या स्वतःच्या घरांत राहावयास जागा मिळेना. गांवकऱ्यांनीं त्यांना वाळींत टाकलें. त्यांच्याबरोबर जेवावयासदेखील कोणी तयार होईना.

न्या. रानडे यांनीं स्वतः कांहीं पुनर्विवाह केला नाहीं. पण पुनर्विवाह केलेल्या एका पंडिताला आपल्या घरीं भोजनास बोलाविलें. हें कानीं पडतांच त्यांच्या वडिलांनीं डोक्यांत राख घातली आणि राहतें गांवच सोडण्याची तयारी केली.

१८६९ सालची गंमत आहे ही. मुंबईसारख्या मोठ्या शहरांतील ही गोष्ट. एक पुनर्विवाह झाला होता आणि त्यासाठीं एक भोजन-समारंभ होणार होता. त्याचीं निमंत्रणें बड्याबड्या पदवीधर सुधारकांना गेलीं होतीं. पण फक्त सातच सुधारकांनीं त्या मेजवानीस जाण्याचा हिय्या केला. आपल्याला लोकांनीं पाहूं नये, म्हणून त्या सात वीरांनीं तोंडावर बुरखे घेतले. त्यांतूनहि कोणीं आपल्याला ओळखलें आणि त्रास देण्यास सुरुवात केली, तर संरक्षणासाठीं त्यांनीं सरकारकडून कांहीं पोलीस मागून घेतले. अशा बंदोबस्तानें, गुपचुपपणें त्यांनीं भोजन उरकलें आणि पुनर्विवाहाचें अभिनंदन केलें. नंतर निर्धास्तपणें घरीं जाऊन निवांतपणें ते झोंपले. पण काय आश्चर्य ! दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत त्यांच्या गुप्त पराक्रमाची वार्ता छापून आलीच !

नुसती पुनर्विवाहाला बंदी होती, एवढेंच नव्हे तर, त्या बालविधवांना

एखाद्या गुन्हेगाराप्रमाणें वागविलें जात होतें. त्यांना लाल वस्त्र नेसावयास दिलें जाई. त्यांच्या डोक्याचें वपन केलें जाई व त्यांचा सुंदर केशभार उतरला जाई. त्यांना दागदागिने घालणें वर्ज्य, गोडधड खाणें वर्ज्य, चांगले कपडे घालणेंहि वर्ज्य ! फार काय, लग्न-समारंभांत किंवा सणासुदींच्या कार्यक्रमांत त्यांना पाऊल टाकतां येत नसे. त्यांचें दर्शनच अशुभ मानलें जाई. एखादा पुरुष कामास निघाला असतांना रस्त्यावर एखादी विधवा स्त्री दिसतांच अपशकुन झाला असें मानून तो मागें फिरत असे. सर्व जन्म पावित्र्यानें, संयमानें व संन्यस्त वृत्तीनें घालविणाऱ्या त्या पुण्यशील साध्वीच्या पायाचें तीर्थ घेण्याऐवजीं सारा पुरुष समाज तिला पायांनीं लाथाडीत होता – तुडवीत होता !

आणि असंख्य मुलींचा संहार करणारा तो राक्षस–लग्नांतील हुंडा ! या हुंड्यापायीं किती मुलींच्या आयुष्याचें वाटोळें झालें असेल ! १९१४ सालीं बंगालमधील एका बालिकेनें या हुंड्यामुळें होणाऱ्या अनर्थाला वाचा फोडली. तिचें नांव स्नेहलता. तिच्या लग्नाकरितां आपलें घर गहाण टाकण्याचा प्रसंग तिच्या पित्यावर ओढवला होता. तो प्रसंग टाळण्यासाठीं तिनें काय केलें ?

लग्नाचे आदले दिवशीं तिनें आपल्या वडिलांना एक हृदयद्रावक पत्र लिहिलें. त्यांत तिनें लिहिलें,

"बाबा, बरद्वान येथें पुराच्या अरिष्टानें अनेक लोक संकटांत सांपडले, तेव्हां त्यांना साहाय्य करण्याकरितां कित्येक थोर अंतःकरणाचे तरुण बंगाली लोक आपण होऊन तयार झाले. दुःखितांना दया दाखविल्या-बद्दल ईश्वर त्यांचें कल्याण करो ! पुष्कळ तरुण माणसांनीं परदेशी वस्तु विकत न घेण्याबद्दल शपथा घेतल्या आहेत. नुकतेच दक्षिण आफ्रिकेंतील आपल्या बांधवांच्या मदतीसाठीं कित्येक बंगाली तरुणांनीं घरोघर हिंडून फंड जमविल्याचेंहि मीं ऐकिलें आहे. परंतु या माणसांना स्वजनाबद्दल दया वाटत नाहीं काय ?

"बाबा, गेल्या रात्रीं मला स्वप्न पडलें व मीं आपल्या मनाचा निर्धार केला. वाद्यांचे अभूतपूर्व असे मंगलध्वनि ऐकू येत आहेत, तेजाची

-८००६४ १२८

अपूर्व प्रभा चोहोंकडे फांकली आहे, अशा वेळेस दुर्गामातेचें मला दर्शन घडलें. तिनें आनंदित मुद्रेनें मला स्वर्गलोकीं येण्याविषयीं खूण केली. त्या वेळेस, बाबा, मला तुमची, तुमच्या सचिंत मुद्रेची, माझ्या प्रिय आईची व माझ्या भावंडांची आठवण झाली. इतक्या सर्वांचें रक्षण करावें, असा माझा निश्चय होऊन, 'मी येतें' असें दुर्गामातेस खुणेनें सांगितलें."

आणि शेवटीं स्नेहलतेनें आत्महत्या करण्याचा निर्धार केला. आपल्या आत्महत्येनें सर्व पालकांचे डोळे उघडतील अशी भोळी आशा तिला वाटत होती. तिनें त्या पत्राच्या अखेरीस लिहिलें, 'बाबा, अग्नि, पाणी किंवा विष यांपैकीं कोणाचा आसरा करावा, याबद्दल माझा विचार चालू झाला आणि शेवटीं अग्नीचीच मीं कांस धरली. स्वतःस जाळून घेऊन मीं पेटविलेल्या या वणव्याच्या ठिणग्या सर्व देशभर पसरोत!"

अशी ही हुंड्याची दुष्ट रूढि बंद व्हावी, असें टिळकांचें स्पष्ट मत होतें. पण पैशाचा मोह इतका कांहीं विलक्षण आहे कीं, अद्याप हुंड्याची चाल नाहींशी झाली नाहीं. १९५४ सालीं भारत सरकारनें 'हुंडा-प्रतिबंधक' कायदा केला, तरी अजून मुलींच्या गळ्याभोंवतालचा हुंड्याचा फांस सुटलेला नाहीं.

असे एक ना दोन–छप्पन्न अन्याय स्त्रीजातीवर होत होते. ते सामाजिक अन्याय पाहून आगरकरांचें चित्त संतप्त होई आणि रक्त उकळूं लागे. टिळकांचीहि स्थिति तशीच होई. त्यांनीं ता. २६ ऑक्टोबर १८८९ रोजीं पुणें येथें तुळशीबागेंत भरलेल्या सभेस आपलीं मतें लेखी कळविलीं होतीं. त्यांच्या मतें त्या वेळीं ताबडतोब सुधारणा व्हावयास पाहिजे होत्या त्या म्हणजे—

(१) मुलीचें लग्न सोळा वर्षांचे आंत करूं नये.
(२) मुलाचें लग्न वीस वर्षांचे आंत करूं नये.
(३) पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढें होऊं नये.
(४) चाळीस वर्षांपुढें लग्न करणें झाल्यास विधवेशीं करावें.
(५) हुंडा घेण्याची चाल अजिबात बंद करावी.

( ६ ) प्राप्तीचा दहावा भाग सार्वजनिक कामाकडे द्यावा.
( ७ ) विधवेचें वपन करूं नये.
( ८ ) दारू पिणें बंद असावें.

केवळ मतें मांडून स्वस्थ बसणारे टिळक नव्हते. तसें भाषण करणारे व लेख लिहिणारे बोलघेवडे सुधारक पुष्कळ होते. पण ते कृतीच्या नांवानें शून्य ! टिळक कृतिशूर होते. त्यांनीं आपल्या मुलींना शिक्षण दिलें आणि त्यांचीं लग्नें प्रौढपणीं केलीं.

बळवंतरावांच्या पत्नीचें नांव सत्यभामाबाई. त्यांना आठ अपत्यें झालीं. पैकीं बळवंतरावांच्या हयातीपर्यंत दोन मुलगे—श्रीधरपंत व रामभाऊ—आणि तीन मुली जिवंत होत्या. विश्वनाथ नांवाचा मुलगा २० वर्षांचा होऊन प्लेगला बळी पडला. त्याच्या मृत्यूची वार्ता कानीं आली, तरी टिळक केसरीचा अग्रलेख शांतपणें लिहीत बसले.

दारूबंदीसाठीं तर त्यांनीं भगीरथ प्रयत्न केले. पुणें शहरांत त्यांनीं दारूच्या गुत्त्यागुत्त्यावर निरोधन करण्याची चळवळ इतक्या धडाडीनें चालविली कीं, लौकरच दारूचीं दुकानें ओस पडलीं. एका सरकारी अधिकाऱ्यानें तर असा शेरा मारला कीं, 'गेले दोन आठवडे पुणें शहरांत टिळकांचाच अंमल चालू आहे असा भास होतो.'

सामाजिक सुधारणेचें एक केंद्र म्हणजे स्त्री-पुरुषांतील समानता. विद्या, विवाह, वारसा, व्यवसाय, मताधिकार इत्यादि सर्व बाबतींत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें हक्क मिळावेत ही सामाजिक सुधारकांची मोठी मागणी. त्याचबरोबर समाजांतील जाती-जातीमधील उच्चनीचता नाहींशी व्हावी व समानता प्रस्थापित व्हावी हें सामाजिक सुधारणेचें दुसरें ध्येय ! या जातीय भेदभावाचें अत्यंत हीन व अमंगल स्वरूप म्हणजे अस्पृश्यता !

कुत्र्यामांजरांनाहि शिवणारा माणूस दुसऱ्या माणसांना स्पर्श करीत नाहीं, हा माणुसकीचा केवढा अपमान ! नुसता स्पर्शच काय, पण महार-मांगाची सांवली पडली, तरी विटाळ झाला असे पूर्वी कांहीं ठिकाणीं मानीत. शाळेंत बंदी, देवळांत बंदी, विहिरीवर बंदी ! परवांपरवांपर्यंत खेड्यांतील

विहिरीवर महारा-चांभाराची बाई पाणी भरण्यास गेली, तर तिला मारहाण होत असे. गांधीजी-विनोबा किती पूज्य ! पण त्यांनाहि अलीकडे कांहीं देवळांत या अस्पृश्यतेपायीं मार बसला.

हा अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्यासाठीं कैक सुधारकांनीं आपल्या रक्ताचें पाणी केलें. १८५३ सालीं महात्मा फुले यांनीं पुण्यांत अस्पृश्यांसाठीं खास शाळा उघडली आणि त्यांच्यासाठीं पाण्याचा हौद खुला केला. १८७३ सालीं पुण्याच्या विष्णुमंदिरांत 'सार्वजनिक काकांनीं' 'सार्वजनिक हळदी-कुंकू-समारंभ' घडवून आणला. त्याला ५००० स्पृश्य व अस्पृश्य स्त्रिया हजर होत्या आणि त्यासाठीं आठ पल्ले हरबरे लागले. आगरकरांनीं या अस्पृश्यतेच्या तटबंदीवर कडाडून हल्ले चढविले. टिळक हे तर जनतेचे पुढारी—जनतेंतच वाढलेले—जनतेंतच मिसळणारे ! ते जनतेचा हा सडका भाग सहन कसा करतील ?

१९१८ सालची गोष्ट. मुंबई येथें "अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद" भरली होती. अध्यक्ष श्रीमंत सयाजीराव गायकवाड होते. लो. टिळक इंग्लंडला जाण्याच्या गडबडींत असतांनाहि परिषदेंत आले. एवढेंच नव्हे तर, 'काँग्रेसनें अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधि घेऊन आपल्या कार्यास त्यांचा पाठिंबा मिळवावा.' अशा आशयाचा ठराव त्यांनीं मांडला व "अस्पृश्यता परमेश्वरास मान्य असेल तर त्याला मी परमेश्वरच मानणार नाहीं." अशी गर्जना केली. ती ऐकतांच परिषदेंतील पांच-सात हजार श्रोत्यांनीं टाळ्यांचा इतका प्रचंड कडकडाट केला कीं, त्यामुळें मंडप खालीं कोसळतो कीं काय असें सर्वांना वाटू लागलें. या सभेला लाल—बाल—पाल ही राष्ट्रीय त्रिमूर्ति हजर होती हें विशेष.



# ‘आतां रे युग हें नवें!’

आकाशांतील तेज:पुंज सूर्यच पृथ्वीवर उतरला आहे कीं काय असा भास त्या वेळीं तेथें जमलेल्या सहस्रावधि लोकांना झाला.

चोहोंकडे प्रचंड वादळ माजलें होतें आणि काळे ढग एकमेकांवर आदळत होते. घनदाट अंधार पसरला होता आणि सोसाटयाचे वारे सुटले होते. सारी पृथ्वी डळमळूं लागली होती. पण तो तेजोनिधि दाही दिशां झळाळत होता, मेरूप्रमाणें अचल होता, भवितव्यतेला तुच्छ मानीत होता आणि काळपुरुषाला आव्हान देत होता कीं, “ये ये, तूं माझ्यावर चालून ये, मी तुझ्याशीं सामना देण्यास दंड थोपटून उभा आहें. सारें विश्व माझ्यावर उलटलें तरी मी या जागेपासून एक पाऊलहि हालणार नाहीं.”

त्या तेजस्वी माणसाच्या दोन पायांच्या फटींतून सर्व राष्ट्र चालत आहे—एका युगांतून दुसऱ्या युगांत जात आहे, असा भास परक्या इंग्रज प्रेक्षकालाहि झाला.

कोणी मुठी वळून जागच्या जागीं खुर्चीवर बसले होते, तर कोणी खुर्चीवरून उठून ओरडत होते—किंकाळत होते—हातवारे करीत होते! कोणी हातांतील काठया भिरकावीत होते, तर कोणी पायांतील जोडे फेंकीत होते. कांहींनीं तर आपली खुर्चीच हातांत घेऊन वर उचलून व्यासपीठावर आदळण्यासाठीं हवेंत भिरकावली. व्यासपीठावर धांदल, गडबड नि गोंधळ माजला—जणुं कांहीं तुफान खवळलेल्या लाटाच!

पण त्या खवळलेल्या समुद्रांतहि शांतपणें व स्थिरपणें अढळ उभी होती एक मूर्ति—टिळकांची! आपल्या छातीवर दोन्ही हात घट्ट आडवे ठेवून ते एखाद्या पर्वताप्रमाणें खडे होते. त्यांचें चित्त विचलित झालेलें नव्हतें—त्यांचें शरीर कंप पावत नव्हतें. त्यांच्या डोळयांतून निश्चयाचें तेज सर्वत्र पसरत होतें आणि त्यांची मुद्रा सिंहासारखी उग्र भासत होती. “माझें डोकें उडविलें तरी हरकत नाहीं, पण मी सत्य सोडणार नाहीं,” अशा निर्वाणीच्या निर्धारानेंच ते तेथें उभे होते. “हिमालय कोसळेल,

सूर्य भंगेल, पण माझें ध्येय स्थिरच राहील," अशी साऱ्या जगाला जणुं ते ग्वाहीच देत होते.

सुरतेचा हा प्रसंग हिंदुस्थानच्या इतिहासांत संस्मरणीय आहे.

कौरवांच्या दरबारांत शिष्टाई करण्यासाठीं भगवान् श्रीकृष्ण गेले असतांना त्यांना सर्वांनीं विरोध केला, तरी ते आपला संदेश सर्वांना ऐकवीतच होते. त्याप्रमाणेंच टिळक सुरतेच्या काँग्रेसमध्यें आपलें म्हणणें त्या गोंधळांतहि सर्वांच्या कानीं घालीत होते.

आग्रा येथें औरंगजेबाच्या दरबारांत श्रीशिवाजीमहाराजांचा अपमान होतांच त्यांनीं जें अभंग धैर्य व अलोट आत्मविश्वास प्रकट केला, त्याचेच झोत या वेळीं टिळकांचे अंगांतून बाहेर पडत होते. तोच करारीपणा! तीच स्वाभिमानी वृत्ति! तेंच मृत्युंजयी सामर्थ्य!

ता. २४ डिसेंबर १९०७ रोजीं दुपारीं सुरतेंत राष्ट्रीय सभा सुरू झाली· मंडपांत सुमारें १०००० लोक जमले होते, त्यांत १५०० वर प्रतिनिधि होते. त्यांपैकीं ५०० प्रतिनिधि टिळकांच्या बाजूचे होते. पण जे होते ते अगदीं निष्ठेचे, करोल वृत्तीचे, जणुं 'केशरी पोशाख' केलेले. या जहाल मंडळींना वाटे, 'आपल्या राष्ट्राचा रथ जलदीनें चालावा. आपण लौकरांत लौकर स्वराज्य मिळवावें. त्यासाठीं इंग्रजांची पायधरणी व मनधरणी करून कांहीं उपयोग नाहीं. त्यांच्याशीं भांडून, झगडून, झुंजून त्यांच्या हातून आणि आपलें राज्य हिसकावून घेतलें पाहिजे—छिनावून घेतलें पाहिजे.'

दुसरा पक्ष नेमस्तांचा. 'गोडं च बोलयेत् कार्यं च साधयेत्' हें त्यांचें धोरण असें टिळक म्हणत. नेमस्तांची भाषा मधुर, मन मृदु, मागणी मवाळ, आणि मार्ग सदनशीर. 'परंतु भूपा चिडवूं नको रे' हें त्यांचें पथ्य. 'ही नोकरी द्या, ती पदवी द्या, हा अधिकार द्या, ती सवलत द्या.' अशा चिल्लर मागण्या ते सरकारकडे करीत. आणि त्या मिळविण्यासाठीं सरकारपुढें हात जोडून उभे राहात, अर्ज दाखल करीत, शिष्टमंडळें नेत, फारच झालें तर विधिमंडळांत, 'गैर झालें, खाविंद, हें फार गैर झालें,' अशीं पदराआडून भाषणें करीत.

सुरतेआधीं कलकत्त्यास काँग्रेस झाली—१९०६ सालीं. तिचे अध्यक्ष

महर्षि दादाभाई नौरोजी. त्या वेळीं त्यांचें वय होतें ८१ वर्षांचें. त्यांचा बहुतेक सारा जन्म गेला इंग्लंडांत-इंग्रज सरकारपुढें दातांच्या कण्या करण्यांत, पण उपयोग किती? दगडाच्या भिंतीवर डोकें आपटून घेण्याइतकाच ! तेव्हां ते संतापले. कलकत्त्याच्या काँग्रेसचे अध्यक्ष असतांना त्यांच्या मुखांतून असे जळजळीत शब्द बाहेर पडले :


'आतांपर्यंत मला इतक्या वेळां निराश व्हावें लागलें आहे कीं, त्यामुळें कोणाचेंहि हृदय फुटून जावें आणि कोणीहि वैतागानें बंड करण्यापर्यंत धांव घ्यावी.'

या बंडखोर वृत्तीचेच होते टिळक आणि त्यांचे जहाल अनुयायी. तसेच होते बंगालचे वाघ सुरेंद्रनाथ बानर्जी आणि त्यांचे गरम भक्त. या दोघांचाहि प्रभाव कलकत्ता काँग्रेसवर पडला. त्यामुळें चतु:सूत्रीचा ठराव मंजूर झाला. ही चतुःसूत्री कोणती? स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ! हीं चार सूत्रें म्हणजे स्वातंत्र्याचीं चार अस्त्रेंच !– पारतंत्र्यावर चारी दिशांना डागलेल्या तोफाच ! या ठरावामुळें–

* स्वराज्य हें हिंदुस्थानचें राजकीय ध्येय निश्चित झालें.
* स्वदेशी हें त्या स्वराज्याचें साधन ठरलें. 'झीज सोसूनहि' स्वदेशी मालच वापरण्याच्या शपथा शेंकडों तरुणांनीं घेतल्या.
* परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याच्या प्रतिज्ञा हजारों लोकांनीं केल्या–परदेशी कापडाच्या होळ्या गांवोगांव होऊं लागल्या.
* स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचें ज्ञान देणाऱ्या व अभिमान उत्पन्न करणाऱ्या राष्ट्रीय शाळा निघूं लागल्या.

हा कणखर, लढाऊ व तेजस्वी कार्यक्रम मवाळ पुढाऱ्यांना आवडेना. म्हणून त्यांनीं असा चंग बांधला कीं, पुढच्या काँग्रेसमध्यें आपण चतुःसूत्रीचा ठराव रद्द करून टाकूं. हा पिछेहाटीचा पराक्रम करण्याचे कामीं मवाळांनीं युद्धांतील डावपेंच सुरू केले. कलकत्त्यानंतर नागपूरला काँग्रेस भरणार होती. पण तेथें आपली सरशी होणार नाहीं, अशी भीति नेमस्त नेत्यांना वाटली. म्हणून त्यांनीं नागपूरऐवजीं सुरतेस काँग्रेस भरविण्याचें ठरविलें.

सुरत हा मवाळांचा बालेकिल्ला. अध्यक्ष निवडला तोहि मवाळच— डॉ. रासबिहारी घोष. ते होते व्हाइसरॉयाच्या कौन्सिलाचे सभासद; परंतु टिळक-पक्षाला हवे होते अध्यक्ष लाला लजपतराय–‘पंजाब-केसरी !’



राष्ट्रसभेंत चैतन्य ओतण्यासाठीं टिळकांनीं जन्मभर हाडाचीं काडें केलीं. १८९५ सालीं पुणें येथें राष्ट्रसभा भरली होती, तेव्हां तिचे एक चिटणीस म्हणून टिळकांनीं खूप काम केलें. राष्ट्रसभा ही खरीखुरी राष्ट्राची सभा व्हावी अशी त्यांची इच्छा. लोकांची संघटना बांधून तिच्या बळावर लोकांचीं दुःखें दूर करावींत व त्यांचे हक्क त्यांना मिळावेत, असें ते राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना सांगत.

पण ते पुढारी होते नेमस्त. त्यांचे डोळे सरकारच्या पायाकडे.

ते उलट टिळकांना ‘तेल्यातांबोळ्यांचा पुढारी’ म्हणत. पण अशा निंदेला डरणारे टिळक नव्हते. ते उलट उत्तर देत, ‘माझ्या पाठीमागें

५...

असलेल्या लोकशक्तीला ‘ जनावरांची शक्ति ’ म्हणणें म्हणजे लोक-समाजालाच जनावरांच्या कोटींत ढकलणें होय. ’ आणि ‘ केसरी ’ शब्दा-वर कोटि करून ते आपल्या विरोधकांना उत्तर देत, ‘ केसरी हा जात्याच जनावरांचा राजा असल्यामुळें त्याला तेली-तांबोळी, उदमी-व्यापारी वगैरे जनावरांत मिसळण्यांत कांहींच हलकेपणा अथवा लाज वाटत नाहीं. ’

कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं जास्तींत जास्त लोक गोळा करण्यासाठीं टिळक जिवापाड परिश्रम करीत. त्या कामीं त्यांना ज्या जहाल पुढाऱ्यांचा पाठिंबा होता, त्यांत लाला लजपतराय हे एक होते. ते टिळकांप्रमाणें परक्या सरकारचे कट्टे शत्रु होते. त्यांना सरकारनें हद्दपार केलें होतें. हद्दपारीची शिक्षा भोगून ते नुकतेच हिंदुस्थानांत परत आले होते. त्यांच्या सत्काराकरितां टिळक स्वतः मुंबई स्टेशनावर हजर होते. लालाजींनाच सुरत कॉंग्रेसचे अध्यक्ष करावे असा प्रचार व प्रयत्न टिळकांनीं चालविला होता.

खास आगगाडीनें टिळक व त्यांचे अनुयायी पुण्याहून सुरतेस गेले होते. तेथें जणूं कांहीं जहाल व मवाळ या दोन्ही पक्षांची रस्सीखेंचच होती. फेरोजशहा, गोखले, मोतीलाल नेहरू इत्यादि नेमस्त नेत्यांनीं घोस यांनाच अध्यक्ष करण्याचें ठरविलें. पण टिळक पक्षाचा आग्रह लालाजींना अध्यक्षस्थान देण्याचा.

टिळकांएवढा महाराष्ट्राचा महान् पुढारी – देशासाठीं दोनदां तुरुंगांत जाऊन आलेला बहाद्दर देशभक्त – संपादक व विद्वान् म्हणून त्रिखंडांत कीर्ति कमावलेला लेखक; पण त्या मवाळ नेत्यांना त्याचें काय होय ? टिळकांच्या स्वागतासाठीं कॉंग्रेसच्या मवाळ सभेनें कांहींच तयारी केली नव्हती, किंबहुना त्यांचेवर बहिष्कारच घातला होता. जणुं कांहीं आपला शत्रूच येत आहे असें समजून ते त्यांचेकडे पाठ फिरवून बसले होते.

पण काय आश्चर्य ! टिळकांचें सुरतेस टोलेजंग स्वागत झालें. स्टेशनावर हजारों लोक त्यांचा जयजयकार करीत होते, रस्त्यारस्त्यावर कमानी उभारल्या होत्या, अग्रभागीं घोडेस्वारांचें पथक असलेली त्यांची जंगी मिरवणूकहि निघाली. साऱ्या सुरतेनें त्यांचा सत्कार केला.

हें कसें घडलें ? ही जादू कोणीं केली ? अहमदाबादचा जादूगार तेथें आलेला होता. तो हाडाचा देशभक्त होता–पक्षभक्त नव्हता. तो गुणांचा भोक्ता होता–सेवेचा चाहता होता–त्यागाचा पुजारी होता. जेथें जेथें विभूतिमत्त्व असेल, तेथें तो लीन होणारा होता. कारण तो स्वतः तसा गुणी होता, सेवाशील होता, त्यागसंपन्न होता. गुणी माणूसच गुणी माणसाला ओळखूं शकतो. ज्ञानेश्वरांची ओळख एकनाथांनाच पटली, बुद्धाच्या बोधिवृक्षाखालीं विवेकानंदांचीच समाधि लागली. तशी टिळकांची थोरवी गांधीजींनींच ओळखली. त्यांनीं हजारों हस्तपत्रकें काढलीं, आणि आपल्या गुजराती बंधूंना हाकारून सांगितलें, "उठा, हा महान देशभक्त आज आपल्या घरीं येत आहे, त्याच्या स्वागतास पुढें जा." गांधीजींच्या या जादूगिरीमुळें सुरतेची सुरत बदलली.

कॉंग्रेसच्या पहिल्या दिवशीं प्रथम स्वागताध्यक्षांचें भाषण झालें. नंतर डॉ. घोष यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना मांडण्यांत आली. तिला अनुमोदन देण्यास बंगालचे पुढारी सुरेन्द्रनाथ बानर्जी बोलावयास उठले, पण त्यांना कोणी बोलूं देईना. एकसारखी गडबड, गोंधळ व गोंगाट माजला, त्यामुळें सभा तहकूब झाली.

दुसरे दिवशीं पुनः सभा भरली. अध्यक्षांच्या सूचनेला अनुमोदन मिळालें. आतां ती सूचना मंजूर होणार, इतक्यांत टिळक व्यासपीठाकडे धांवत निघाले. त्यांना स्वयंसेवकांनीं हरकत केली, पण सुटलेला तीर मागें थोडाच फिरणार ? टिळक पायऱ्या चढून तसेच वर गेले आणि अध्यक्षांच्या सूचनेला विरोध करणारें भाषण मोठमोठ्यानें करूं लागले. "आपल्याला घोष हे अध्यक्ष नकोत, लालाजीच हवे आहेत" अशी उपसूचना टिळकांनीं सकाळींच पाठविली होती. डॉ. घोष आपलें अध्यक्षीय भाषण वाचूं लागले. एकाच वेळीं दोन भाषणें चालू झालीं. पण तीं चालू राहतील कशीं ?

साऱ्या सभेंत दंगल उसळली, आरडाओरड सुरू झाली, इतक्यांत–

'टिळक, व्यासपीठावरून तुम्ही खालीं उतरा.'

'मला खालीं उतरा म्हणून सांगणारे तुम्ही कोण ? छाती असेल

तर मला उचलून खालीं ठेवा.' शेंकडों विजा एकदम कडाडाव्यात, त्याप्रमाणें टिळकांच्या निश्चयाचे शब्द बाहेर पडले.

मुंबईचे सिंह सर फेरोजशहा मेहता टिळकांकडे पाहून गरजले, 'अध्यक्षांची आज्ञा आहे कीं तुम्ही खालीं जा."

'मी जाणार नाहीं !' पुण्याच्या केसरीनें गर्जना केली. कांहीं गुजराती मवाळ वीरश्रीनें टिळकांच्या अंगावर धावून गेले. पण त्यांना पं. मालवीय व ना. गोखले यांनीं मागें लोटलें.

शब्द संपले ! जोडे आले, काठ्या आल्या, खुर्च्या आल्या ! टिळक जिवंत राहतात कीं नाहीं अशी शंका वाटूं लागली. पण खुद्द टिळकांची, स्वस्तिकाकार हात केलेली, अभय-अचल मूर्ति स्थिर-शांत होती. देव-दानवांनीं समुद्र-मंथन सुरू केलें असतांना खडा राहिलेला मैनाक पर्वतच दुसरा ! आतां धक्काबुक्कीला व मारामारीला सुरुवात झाली. टिळकांचे भक्त त्यांचेभोंवतीं कडें करून उभे राहिले; एवढेंच नव्हे तर त्यांचे विरोधक ना. गोखलेहि – होय, एके काळीं टिळकांचे शिष्य असलेले व पुढें टिळकांचेंच त्यागाचें उदाहरण पाहून फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर झालेले ना. गोखले, गंभीर स्वरांत म्हणाले, 'टिळकांच्या एका केसाला जरी धक्का लागला तरी येथें रक्तपात होईल.'

शेवटीं पोलीस आले. मंडप रिकामा झाला ! व्यासपीठावर खडे होते फक्त एकटे टिळक-आणि त्यांचे संरक्षक अनुयायी. कॉंग्रेस दुभंगली !

दुसऱ्याच दिवशीं राष्ट्रसभेच्या मंडपांत ९०० मवाळांची मजलस भरली – पण २०० पोलिसांच्या पहाऱ्यांत !

उलट टिळक, लालाजी, अरविंदबाबू अशा तेजस्वी नेत्यांनीं नवा पक्ष काढला. त्या नव्या पक्षाचीं तत्त्वें कोणतीं हें सांगण्यासाठीं टिळकांनीं स्वतंत्र व्याख्यानच दिलें. त्यांत स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीचा त्यांनीं पुरस्कार केला. स्वराज्य मिळविण्यासाठीं आम्ही जरूर तर कायदेभंग करूं, असहकारिता पुकारूं; येथपर्यंत टिळकांच्या विचाराची मजल तेव्हांहि जाऊन पोंचली होती.

टिळकांच्या या लढाऊ धोरणानें – व त्याहिपेक्षां लढाऊ वर्तनानें–

ते तरुणांच्या कंठांतील ताईत बनले. त्यांनीं काँग्रेसचा आत्मा जिंकला— राष्ट्राचा आत्मा जिंकला, बहुजनसमाजाचें अंतःकरणच त्यांनीं सुरतेच्या स्वारींत काबीज केलें.

टिळकांचें लोकांवरील हें वाढतें वजन सरकारला कसें पाहावेल ? त्यांनीं या पुरुष-सिंहाला कोंडण्याचें ठरविलें. झालें ! केसरींतील तीन लेख सरकारनें निवडले, आणि त्यांचेवर राजद्रोहाचे आरोप ठेवले.

मुंबईच्या हायकोर्टांत ता. १३ जुलै १९०८ रोजीं टिळकांचा खटला सुरू झाला. तो ता. २२ रोजीं संपला. टिळकांनीं आपल्या बचावाचें भाषण स्वतःच केलें — आणि तें तब्बल पांच दिवस वीस तास चाललें. तें सर्व भाषण समक्ष ऐकून नेमस्ताग्रणी ना. शास्त्री चकित झाले—आणि टिळकांची धैर्यशाली भूमिका पाहून इंग्लंडांत ना. गोखलेहि संतोषले. त्यांतील कायदे-पांडित्य, धैर्यशीलत्व, देशाभिमान इत्यादि गुण अलौकिक होते. पण सारें उपड्या घड्यावर पाणी ! फत्तरावर पाऊस पडून काय उपयोग ?

ता. २३ जुलैचा दिवस—टिळकांचा ५३ वा वाढदिवस ! रात्रीची वेळ ! कोर्टांतहि अंधार दाटलेला ! तेथींल गॅसच्या दिव्यांचा मंद प्रकाश भीषण वाटूं लागला. आभाळ ढगांनीं झाकोळलेलें. सर्वजण स्तिमित झाले होते — उत्कंठित झाले होते — जिवाचा कान करून निकाल ऐकण्यास उत्सुक झाले होते.

रात्रींचे ९॥ वाजले आणि पंचांनीं टिळकांना दोषी ठरविलें. त्या आधारानें न्यायाधीश दावर शिक्षा सांगण्यास तयार झाले. त्याआधीं नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें त्यांनीं टिळकांना विचारलें, 'तुम्हांला कांहीं सांगावयाचें आहे ? '

'होय !' असें म्हणून, स्तंभांतून गुरगुरणाऱ्या नरसिंहाप्रमाणें, हा महाराष्ट्राचा महापुरुष धीरगंभीर वाणीनें म्हणाला :

> " मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, ज्यूरीनें कसाहि निकाल दिलेला असला, तरी मी पूर्णपणें निरपराधी आहें, असेंच मी मानतों. जगतांतील व्यवहारांचें नियमन करणाऱ्या श्रेष्ठ शक्ति अस्तित्वांत आहेत; आणि कदाचित्, त्यांच्या मतें, मी मोकळा राहण्यापेक्षां माझ्या हाल-अपेष्टांनींच माझ्या अंगीकृत कार्याचा अधिक उत्कर्ष होईल."

यांत भयाचा लवलेश नव्हता कीं दयेची याचना नव्हती. उलट या न्यायासनाहून वरिष्ठ अशीहि एक न्यायशक्ति जगांत अस्तित्वांत आहे, असें त्याला – व सरकारला – उत्तर होतें. त्या उत्तरांत ईश्वरनिष्ठा होती, आत्मविश्वास होता आणि आशावादहि होता. टिळक जणुं कांहीं मनानें वरच्याच जगांत वावरत होते. न्यायमूर्तींनीं त्यांना सहा वर्षें काळें पाणी व १००० रुपये दंड अशी शिक्षा बेगुमानपणें ठोठावली !

उतारवय झालेलें – त्यांतच शरीर मधुमेहानें पोखरलेलें – असे टिळक सहा वर्षांच्या काळेपाण्यावरून परत येतात कसचे व पुनः आपल्याला दिसतात कसचे ? असें वाटून महाराष्ट्रीयांनीं फार दुःख केलें. मुंबईच्या मजुरांनीं सहा दिवस संप पुकारला. सरकारनें गोळीबार केला, त्यांत ७५ माणसें ठार झालीं ! मजुरांच्या चाळीचाळींतून हिंडून टिळकांनीं त्यांना 'दारूबंदी, स्वदेशी, स्वराज्य हें सारें तुमच्यासाठीं आहे' असें पूर्वीं समजावून सांगितलें होतें. त्यामुळें मजुरांना साहजिकच वाटत होतें, 'आपला खरा वाली, सच्चा कैवारी म्हणजे टिळकच !'

मुंबईतील गुजराती कापडवाल्यांनींहि सहा दिवस दुकानें बंद केलीं, काळीं निशाणें दुःखप्रदर्शनार्थ लावलीं व टिळकांचे फोटो सर्वत्र लटकावून दिले. नागपूरमधील दुकानें–गिरण्या बंद पडल्या. 'एम्प्रेस मिल' तेवढी चालू राहिली. म्हणून तिच्या कापडाचे गठ्ठे मुंबईच्या कित्येक व्यापाऱ्यांनीं परत केले. जे विद्यार्थी शाळेंत गेले नाहींत, त्यांना दंड झाला.

टिळकांच्या या अघोर शिक्षेमुळें सारा देश खवळून उठला. विद्यार्थ्यांनीं हरताळ पाडले, उपवास केले, गांवोगांवचे बाजार बंद पडले, कांहीं टिळकभक्तांनीं जोडा घालण्याचें सोडलें, तर कांहींनीं गोड-धड खाणें टाकलें. सारे सण, सारे उत्सव थांबले. सुतकी कळाच पसरली सर्व देशावर.

सरकारनें टिळकांना कडक बंदोबस्तामध्यें, अत्यंत गुप्तपणानें, मुंबईहून अहमदाबादेच्या तुरुंगांत टाकलें. बरोबर दोन महिन्यांनीं त्यांना अहमदाबादेहून मुंबईस परत आणण्यांत आलें आणि तेथून आगबोटीनें रंगूनला रवाना केलें. रंगून स्टेशनावरहि २००० माणसें जमा झालेलीं होतीं आणि 'टिळकमहाराज की जय' अशा आरोळ्या ठोकीत होतीं.


दुसरे दिवशीं रंगूनहून मंडालें येथें टिळकांना नेण्यांत आलें. आणि तेथील एका एकांतवासाच्या कोठडींत डांबून ठेवलें. त्यांचें उतारवय लक्षांत घेऊन सरकारनें त्यांची काळेपाण्याची शिक्षा रद्द करून साध्या कैदेची शिक्षा ठेवली व दंड रद्द केला.

स्वदेशापासून दूर, निर्जन अशा प्रदेशांत, १२ × २० फुटांच्या लहानशा कोठडींत, वयोवृद्ध टिळकांना, एकाकीपणें, एक नव्हे दोन नव्हे, पुरीं सहा वर्षें बंदीवास भोगावा लागला. त्या बंदीवासांत त्यांचें हृदय खचलें काय ? त्यांचें मन निराश झालें काय ? त्यांचे विचार दुबळे बनले काय ? त्यांचें ज्ञान गंजून गेलें काय ?

या सर्व प्रश्नांचें एकमेव उत्तर म्हणजे–

‘ गीता-रहस्य ! ’

श्रीकृष्णाच्या गीतेचा अर्थ मराठींत स्वतंत्र बुद्धीनें सांगणारा हा नऊशें पानांचा ग्रंथ युग-प्रवर्तक आहे – मराठी साहित्यांतील ‘ कोहिनूर ’ हिराच आहे ! अवघ्या पांच महिन्यांत त्याचें लेखन त्यांनीं केलें, पण त्यासाठीं चाळीस वर्षें त्यांचें वाचन-मनन चालू होतें. त्याच्या पहिल्या आवृत्तीच्या ६००० प्रति ६ महिन्यांत उडाल्या. गायकवाडवाड्यांत या ग्रंथाच्या राशी दुतर्फा ठेवलेल्या होत्या व एक एक व्यक्ति एक एक प्रत भक्तिभावानें घेऊन जात होती, आदरानें वाचीत होती व आस्थेनें आचरणांत आणीत होती. तरुण पिढीच्या मनाची घडण बनविणारा हा ग्रंथराज अजोड आहे.



# ‘स्वराज्याचा मुक्काम की’

नांव आहे गायकवाडवाडा; पण खरा तो टिळकवाडाच! बडोद्याच्या सयाजीरावमहाराजांकडून १९०४ सालीं १५००० रुपयांना टिळकांनीं तो वाडा विकत घेतला. नारायण पेठेंतील या प्रशस्त वाड्यांतच टिळक राहत व केसरी–मराठा पत्रें छापीत. घर–कचेरी–छापखाना सारें तेथेंच. राहतें घर व संपादकीय कचेरी यांना जोडणारा एक लहानसा पूल आहे. त्यावरून उघड्या अंगानें फिरतांना टिळक कधीं कधीं दिसत. नाहीं तर दुसऱ्या मजल्यावरील पुढल्या खोलींत, खुर्चीवर बसून, हातानें सुपारी कातरीत कातरीत, ते कधीं आल्यागेल्याशीं बोलत, कधीं केसरीचे अग्रलेख ‘लेखका’ला सांगत, कधीं राजकीय ग्रंथ वाचीत, तर कधीं गीता-रहस्यावर शास्त्रीपंडितांशीं चर्चा करीत. पण हें सारें पुढें. ता. १६ जून १९१४ रोजीं केवढा चमत्कारिक प्रसंग गायकवाडवाड्यापुढें उभा राहिला पाहा ना!

‘झाली, चूक झाली, पुनः अशी चूक मी करणार नाहीं.’ असें देवडीवरचा भय्या मनांतल्या मनांत दहा वेळां तरी म्हणाला असेल. त्यानें किती तरी वेळां आपल्या थोबाडींत मारून घेतल्या असतील. पण त्यांत खरोखर त्याची काय चूक होती? त्यालाच काय, पण कोणालाच कल्पना नव्हती कीं, गायकवाडवाड्याचा मालक आज रात्रीं गायकवाड-वाड्यापुढें अकस्मात् दत्त म्हणून उभा राहील. सरकारचा बंदोबस्त होताच तसा कडक!

मंडालेच्या बंदीवासांतून सरकारनें टिळकांना ता. ८ जून रोजीं मुक्त केलें. तेथून त्यांना रंगूनला नेतांना रेल्वेचा डबा रिझर्व्ह केलेला, स्टेशनावर खिडक्यांचीं दारें बंद आणि डोक्यावर पगडीऐवजीं टोपी घातलेली! लोकांनीं लोकमान्यांना ओळखूं नये हा हेतु. आगगाडीनंतर

आगबोट. रंगूनहून मद्रासला आगबोटीनें टिळकांना नेण्यांत आलें. मद्रासहून आगगाडीनें टिळकांना आणलें तें हडपसरापर्यंत – खुद्द पुणें स्टेशनवर नव्हे. न जाणों, गुप्त बातमीहि फुटावयाची आणि स्टेशनवर गर्दी लोटावयाची! हडपसरहून मोटारीनें पुण्यास पोलिस-अधिकाऱ्यांनीं टिळकांना आणलें, आणि ऐन मध्यरात्रीस गायकवाडवाड्यापुढें उभें केलें.

पण त्यांच्या स्वतःच्या वाड्यांत जाण्यास त्यांना बंदी! – सरकारची नव्हे, स्वतःच्या भय्याची! तो भव्य दरवाजा लावून भय्या देवडीवर बसला होता. 'खाड्खाड्' अशा पोलिसी बुटांच्या आवाजानें तो डोळे चोळीत उठला. एक कृश झालेला, गालफडें बसलेला व साठीच्या घरांत गेलेला पगडीवाला; आणि दोन चार रुबाबदार पोशाखांतील अधिकारी! भय्या बावचळला. त्याला कांहींच कळेना. वाड्याची पुनः झडती आली कीं काय, अशी कल्पना करण्यांत त्याचें डोकें गुंतलें, तोंच—

'खोलो, दरवाजा खोलो,' पोलिस अधिकारी गुरगुरला.

'नहीं, बिगरपरवाना मैं नहीं खोल सकता.'

'मालिकको भी? अरे, यह तो तेरे मालिक है मालिक.'

'ये मैं नहि जानता.'

'फिर मॅनेजरसाबको बुलाव.'

'हाँ, मै उनको बुलावूंगा. वे इन्साफ करेंगे.'

केसरीचे मॅनेजर बाबा विद्वांस – टिळकांचे भाचे. रामाचें राज्य जतन करणाऱ्या भरताच्या भक्तिभावानें त्यांनीं गेलीं सहा वर्षें काढलीं होतीं. ते झोपेंतून उठले आणि हातांत कंदील घेऊन निघाले. दारांतून बाहेर जातांच त्यांनीं टिळकांना ओळखलें. त्यांनीं थरथरत्या हातांनीं व डबडबलेल्या डोळ्यांनीं आपल्या 'मामांना' आंत घेतलें. वाड्याचें चैतन्यच जणूं त्यांनीं आंत घेतलें! मध्यरात्रीं सूर्य उगवला, असेंच त्यांना वाटलें!! आनंदाचा आवंढा त्यांनीं गिळला आणि लगेच—

धांदल उडाली! वाड्यांत चोहोंकडे दिवे लागले! बैठकी अंथरण्यांत आल्या. मित्रमंडळींना सुवार्ता कळविण्यांत आली. ती वार्ता कळतांच लोक आनंदानें धांवत सुटले. त्यांना वाटलें,

वनवासांतून प्रभु रामचंद्र आज अयोध्येंत परत आले.
कालियाच्या डोहांतून गोपालकृष्ण नंदाच्या घरीं आले.
आग्र्याच्या कैदेंतून सुटून शिवाजीमहाराज पुण्यास आले !

पाडव्याप्रमाणें घरोघर गुढ्या उभारल्या गेल्या;
दिवाळीप्रमाणें घराघरावर पणत्या पेटविल्या गेल्या;
संक्रांतीप्रमाणें घराघरांतून पेढे वांटण्यांत आले.

सारें पुणें आनंदानें नाचूं लागलें;
अवघा महाराष्ट्र हर्षानें ओसंडूं लागला;
अखिल हिंदुस्थान उत्साहानें हसूं लागला.

कोणीं अंगणांत रांगोळ्या घातल्या तर कोणीं मेजवान्या झोडल्या, कोणीं सत्यनारायण केले तर कोणीं सहा वर्षें चालविलेल्या वैराग्य-व्रतांची सांगता केली. आतां त्यांनीं गोड खाल्लें, तांबूल सेवन केले, पायांत जोडे घातले. आनंदीआनंद अवघा कोंदून गेला. गांठीभेटींना पूर आला. अभिनंदनाच्या तारा-पत्रांचा वर्षाव झाला. परगांवचेहि लोक येऊं लागले आणि लोकमान्यांच्या पायांवर डोकें ठेवून गेले.

जाहीर स्वागत-समारंभ ता. २१ रोजीं पुण्याच्या नागरिकांनीं केला. सायंकाळीं सहा वाजतां सारा गायकवाडवाडा माणसांनीं फुलून गेला. नगर, नाशिक, नागपूर, सोलापूर, बेळगांव अशा दूरदूरच्या ठिकाणांहूनहि टिळक-भक्त तेथें आले होते. पांच-सहा हजार स्त्री-पुरुष उत्साहानें जमले होते. सभास्थानीं लोकमान्यांची देशसेवेनें कृश झालेली ती मूर्ति दिसतांच लोकांनीं टाळ्यांचा कडकडाट केला आणि 'टिळक महाराज की जय' असा घोष सहा वर्षांनीं पुनः केला. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन अध्यक्षस्थानीं बसले. आणि मग काय विचारतां ! लोकमान्यांचे गळ्यांत हारावर हार पडूं लागले व पायांवर मस्तकांमागून मस्तकें लवूं लागलीं. प्रशंसेची पुष्पांजलि करणारीं भाषणेंहि झडलीं.

'लोक जसे मला विसरले नाहींत तसा मीहि लोकांना विसरलों नाहीं. लोकांचें मजवरील प्रेम जसें कायम आहे, तसेंच माझें लोकांवरील प्रेम

कायम आहे.’ असें लोकमान्यांनीं आपल्या आभाराच्या भाषणांत सांगितलें.

‘ पुनश्च हरिः ॐ ’ म्हणून टिळकांनीं राजकारणाचीं सूत्रें सहा वर्षांनंतर आपल्या हातीं घेतलीं. पूर्वीच्याच धडाडीनें त्यांनीं आपली चळवळ ‘मागील अंकावरून पुढें चालू ’ केली. पुनः सभा, पुनः संघटना, पुनः प्रतिकार–अशीं त्यांच्या चळवळीचीं चक्रें जोरानें फिरूं लागलीं. सुरतेला काँग्रेसचा जो धागा तुटला होता, तो जोडण्याच्या खटपटीस ते लागले. पुणें, नागपूर, बेळगांव येथें त्यांनीं प्रांतिक परिषदा भरविल्या. त्यांना हजारों लोक लोटले. तेथें काँग्रेस काबीज करण्याचें त्यांनीं ठरविलें. कारण त्यांना वाटे, ‘ परिस्थिति सुप्रसन्न आहे, काल अनुकूल आहे आणि आपली स्वराज्याची मागणी न्यायाची आहे. ’

या स्वराज्याच्या एकाच मागणीवर जोर द्यावा म्हणून १९१५ च्या डिसेंबरमध्यें, पुण्याच्या प्रांतिक परिषदेंत, स्वतंत्र समिति नेमण्यांत आली. १९१६ च्या एप्रिलमध्यें बेळगांव येथें प्रांतिक परिषद् भरली असतांना तर, ‘ हिंदी स्वराज्य संघ ’ ( इंडियन होमरूल लीग ) या संस्थेची लोकमान्यांनीं विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा केली. त्याचे आधीं पांच-सात महिने, मद्रासेंत डॉ. बेझंट या गोऱ्या विदुषीनें अशीच होमरूल लीग काढली. तिचे सभासद टिळक झाले, टिळकांच्या होमरूल लीगचे सभासद बेझंटबाई झाल्या आणि जवाहरलालांसारखे शेंकडों तरुण त्या दोन्ही संस्थांचे सभासद बनले. कमळानें जळाला व जळानें कमळाला शोभा येते आणि जळा-कमळानें सरोवर शोभिवंत दिसतें, तसें सुंदर सहकार्य या संस्थांमध्यें होतें.

लगेच टिळकांचा स्वराज्य-दौरा तुफान वेगानें सुरू झाला. जून-मध्यें नगर येथें त्यांनीं स्वराज्यावर जाहीर व्याख्यानें दिलीं. बोलतां बोलतां, त्यांच्या तोंडून असे स्फूर्तिदायक उद्गार बाहेर पडले :–

“ आमची विद्या मोठी, आमचा इतिहास प्राचीन, आमची संस्कृति उच्च म्हणून आम्ही स्वराज्याला पात्र आहों, असा युक्तिवाद कोणी कोणी करतात. पण मी म्हणतों, स्वराज्यासाठीं अशीं कारणें देण्याची गरजच काय ?

## " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच ! "



मुलाला आईची भेट कां व्हावी, याचीं कारणें का देत बसावयाचें ? तो त्या मुलाचा जन्मसिद्धच हक्क आहे. तसाच कोणत्याहि राष्ट्राचा स्वराज्यावर हक्क आहे. "

लोकमान्यांच्या या मंत्रानें सारा महाराष्ट्र भारून गेला — नव्या स्फूर्तीनें नाचूं लागला.

लोकांचें हें नवें तेज परक्या सरकारला पाहावेना. लोक बलवान् होणें म्हणजे तें सरकार दुर्बल होणें — असाच विरोधी संबंध त्या वेळीं होता. हिंदी लोक जगणें-वाढणें-सुखावणें म्हणजे इंग्रज सत्ता झुरणें-झिजणें-मरणें असाच अर्थ होता. म्हणून बेळगांव-नगरचीं तीन भाषणें निमित्ताला घेऊन सरकारनें लोकमान्यांना पुनः कोंडण्याचा कट केला — ४०००० रुपयांचा जामीन मागितला. तो केव्हां ? तर—

ऐन आनंदाच्या भरांत ! ग्रहण लागलें तें पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रालाच ! लोकमान्यांच्या वयाला साठ वर्षं पूर्ण झालीं, म्हणून जनतेनें त्यांचा षष्ठ्यब्दी-समारंभ केला. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून त्यांचे मित्र, चहाते, अनुयायी हजारोंनीं आले. होमहवन-रुद्राभिषेक झालें, पुराण-कीर्तन झालें, अन्नदान-वस्त्रदान झालें, मानपत्र दिलें आणि दिली एक लक्ष रुपयांची थैलीहि ! ' आमच्या प्रत्येकाच्या आयुष्यांतील एकेक दिवस घेऊन

तो ईश्वरानें टिळकांना द्यावा.' अशी इच्छा सभेंत व्यक्त झाली. टिळक गहिंवरले आणि म्हणाले,

'आपली मातृभूमि आपणां सर्वांस कार्याचें आव्हान देत आहे. आपण सर्व 'राष्ट्रदेव' होऊं या. तुमची ही लाखाची देणगी माझी नाहीं. ती मी ठेव समजतों. मी तिचा फक्त ट्रस्टी आहें. तिच्यांत माझें तुळशी-पत्र घालून तिचा विनियोग मी राष्ट्रकार्यासाठीं करीन.'

या साठी-समारंभाचा मुहूर्त साधून दुधांत मिठाचा खडा टाकण्यासाठीं-पक्वान्नाच्या घांसांत विष कालविण्यासाठीं–सरकारनें ४० हजारांचा जबर जामीन टिळकांकडून मागितला. टिळकांनीं सरकारचें युद्धाचें आव्हान स्वीकारलें. मुंबईच्या हायकोर्टांत त्यांनीं लढा सुरू केला–आणि पूर्ण विजय मिळविला. ता. ८ नोव्हेंबर रोजीं न्यायमूर्तींनीं जामिनकीचा हुकूम बाजूस सारला व निकाल दिला–'स्वराज्य मागणें हा गुन्हा होत नाहीं.' नवा किल्ला सर केल्याइतका आनंद टिळकांना झाला.

मुंबईत सत्कार-सभा भरली. तेव्हां टिळकांनीं आनंदाची आरोळी ठोकली, 'आतां आपल्या स्वराज्याच्या चळवळीवर कायदेशीरपणाचा शिक्का बसला. तरी उठा, उद्योगास लागा, स्वराज्य मिळवा. वेळ आली आहे, परमेश्वर साहाय्यास येत आहे. प्रश्न व्यक्तीचा नाहीं, राष्ट्राचा आहे. त्यासाठीं आपण एक होऊं या.'

असें एक होण्याचा सुयोगहि लवकरच आला. लखनौ येथें १९१६ च्या डिसेंबरांत भरलेली कॉंग्रेस म्हणजे ऐक्याचा विजयस्तंभच. त्या अधिवेशनांत हिंदु व मुसलमान एक झाले, नेमस्त व जहाल एक झाले, टिळक व गांधी एक झाले. स्वराज्याचा एकच एक घोष उठला.

'स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं' असें जनता लाख मुखांनीं बोलूं लागली. आणि पुढें टिळकांनीं तर स्वराज्याचा सतत धोशाच लावला. सारें राष्ट्र त्यांनीं स्वराज्याच्या मागणीनें दुमदुमून सोडलें. अगदीं सोप्या भाषेंत, घरगुती दाखले देऊन, जीव तोडून, अत्यंत तळमळीनें ते गांवागांवांतून, सभासभांमध्यें, स्वराज्य कां पाहिजे हें बहुजनसमाजाला समजावून सांगूं लागले. आपल्या वार्धक्याची पर्वा न

करतां, अंगांतील मधुमेहाकडे लक्ष न देतां, सरकारी संकटांची तमा न बाळगतां, एखाद्या प्रदीप्त अग्निज्वालेप्रमाणें, एखाद्या प्रचंड झंझावाताप्रमाणें, लोकमान्य स्वराज्याचा तेजस्वी संदेश वायुवेगानें सर्वत्र फैलावूं लागले.

या त्यांच्या साऱ्या स्वराज्य-दौऱ्याचा कळस म्हणजे वऱ्हाडची मोहीम. १९१८ च्या फेब्रुवारींत पंधरा दिवस हा दौरा चालला· त्यांतील अवघ्या चार दिवसांत टिळकांनीं मोटारीनें ३०० मैलांचा प्रवास केला, नऊ सभांमध्यें भाषणें केलीं आणि लाख लोकांना स्वराज्याची दीक्षा दिली. मानपत्रें आणि थैल्या ह्यांचा त्यांचेवर वर्षाव झाला. खऱ्या सोन्या-रुप्यांचीं फुलें उधळलीं गेलीं. सुवासिनींनीं निरांजनांनीं ओवाळलें. भक्तांनीं रथांतून मिरवणुका काढल्या. तापणाऱ्या उन्हांत व तापलेल्या वाळवंटावर तास–तास उभे राहून हा साठी उलटलेला तपस्वी स्वराज्याचे वेद लोकांना शिकवीत होता. ते शिकवतां शिकवतां अकोट येथील व्याख्यानांत टिळकांनीं एक नवाच शब्द उच्चारला. आणि तो म्हणजे '**नोकरशाही !**'

" हिंदुस्थानांतील अंमल बादशाही नाहीं, लोकशाही नाहीं, तर गोऱ्या नोकरांचा आहे–म्हणजे नोकरशाही आहे. ती आम्हांला बदलावयाची आहे–तिच्यावर आम्हांला सत्ता मिळवावयाची आहे. ही नोकरशाही माजली आहे, ती आम्हांला नको. आम्हांला नोकर पाहिजेत, पण त्यांची 'शाही' नको. " बंदुकींतून सटासट् गोळ्या सुटाव्यात, तसे वेगवान व वजनदार शब्द टिळकांच्या मुखांतून निघत. आणि ते जसें बोलत, तसेंच लिहीत.

लेखणीनें व वाणीनें लोकमान्यांनीं स्वराज्याचा प्रचार इतका धडाडीनें केला कीं, अवघ्या तीन वर्षात 'स्वराज्य–संघाला' ४०००० सभासद व १००० आजन्म सभासद मिळाले. ३॥ लाख रुपयांचा निधि जमला. संघाच्या १८० शाखा विजेसारख्या काम करूं लागल्या. शेंकडों सभा भरल्या आणि लाखों पत्रकें वांटलीं गेलीं. सरकारकडे शेकडों तारा गेल्या नि लाखों सह्यांचे अर्ज रवाना झाले. सर्वांचा सूर एक आणि तो म्हणजे––

'आम्हांला आमचें राज्य द्या – पूर्ण स्वराज्य द्या !'

'स्वराज्य ! स्वराज्य ! स्वराज्य !' हा एकच ध्यास टिळकांना लागलेला होता – आणि तो ते अखिल हिंदुस्थानाला लावीत होते. कोणतेंहि स्थान असो, कोणताहि प्रसंग असो, त्याचा उपयोग ते स्वराज्याचा सुकाळ देशभर करण्यासाठींच करीत. ते मंडालेहून सुटून आले आणि दोनच महिन्यांचे आंत, ता. ४ ऑगस्ट १९१४ रोजीं, युरोपांत महायुद्ध पेटलें– त्यांत इंग्लंड भाजून निघूं लागलें. तेव्हां टिळकांनीं घोषणा केली,

'साम्राज्याच्या गरजा, येती आमच्या काजा.'

ब्रिटिश साम्राज्याचे एक प्रतिनिधि, मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन, यांनीं मुंबईत एक 'युद्ध-परिषद' भरविली. साम्राज्य कितीहि बलाढ्य असलें, तरी महायुद्धाच्या खाईंत लोटण्यासाठीं त्याला मनुष्यबळ हवेंच होतें. सक्ती करून रिक्रूट किती मिळणार ! आणि कसले मिळणार ? सक्तीचा सूड म्हणून मामलेदार-फौजदारांना लोक ठार मारूं लागले. टिळक-गांधींसारख्या लोकमान्य पुढाऱ्यांनीं आपल्या या प्राणसंकटाचे वेळीं सरकारला साहाय्य करावें अशी राज्यकर्त्यांची इच्छा. म्हणून गव्हर्नरानें युद्ध-परिषद बोलाविली. तिला टिळक-प्रभृति राष्ट्रीय चळवळ्यांनाहि निमंत्रण दिलें. 'लष्करांतील वरिष्ठ जागा सरकार हिंदी लोकांना खुल्या करील, तर मी पांच हजार लोकांची भरती करीन. तसें मजकडून न होईल तर कमी पडतील त्या माणसागणिक मी शंभर रुपये दंड देईन.' असें लोकमान्यांनीं जाहीर केलें होतें.

ता. १० जून १९१८ रोजीं मुंबईत टाऊन हॉलमध्यें ही अपूर्व परिषद भरली. सरकार व त्यांचे होयबा एका बाजूला आणि लोकमान्य व त्यांचे अनुयायी दुसऱ्या बाजूला – असा विलक्षण देखावा दिसूं लागला. सूत्रधाराची नांदी झाली, पारिपार्श्वकांनीं साथ दिली, आणि––

'प्रथम आम्ही सांगतों कीं, हिंदुस्थानवर स्वारी झाली तर तिला तोंड देण्यासाठीं आम्ही हिंदी लोक आपले प्राण अर्पण करूं. मात्र स्वदेशाचें संरक्षण व स्वराज्य यांचा संबंध आम्हांला तोडतां येत नाहीं. कारण––

'छे: ! छे: ! तुम्हांला येथें स्वराज्याची, राजकारणाची चर्चा करण्यास आम्हीं बोलावलें नाहीं.'

'असें असेल तर मी येथें कशाला राहूं ? अशी ही परिषद् सोडून जाण्याशिवाय स्वाभिमानी माणसाला दुसरा मार्गच नाहीं. हा मी निघालों.'

आणि खुद्द सरकारी परिषदेंतून, प्रत्यक्ष गव्हर्नराकडे पाठ करून, लोकमान्य आपलें भाषण तसेंच सोडून ताड्दिशीं निघाले व बाहेर गेले !


या त्यांच्या स्वभिमानाचा, स्वराज्यप्रेमाचा व पराक्रमाचा कित्ता केळकरांनीं गिरविला. ते परिषदेंतून निघाले – आणि तसेच निघाले हॉर्निमन, जमनादास इत्यादि. पुढच्याच 'केसरी' च्या अंकांत लोकमान्यांनीं सडेतोड अग्रलेख लिहिला–'लॉर्ड विलिंग्डन यांचा अत्याचार !' आणि त्यांत गव्हर्नरला ठणकावून बजावलें कीं,

'न गणसि मज, जातों तुच्छ मानूनि तूंतें.'

म. गांधीजींनींहि जाहीर पत्र लिहून लोकमान्यांना पाठिंबा दिला व सरकारवर टीका केली कीं, 'मुंबई सरकारनें लोकमान्य टिळकांच्या व्याख्यानाला बंदी केली, त्यामुळें माझ्या रिक्रूटिंगच्या कामाला हरकत येत आहे.'

'हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणींत मानवजातीचे हितसंबंध गुंतलेले आहेत.' असे दूरदर्शी विचार लोकमान्य बोलून दाखवीत. ते स्वच्छ म्हणत, 'आमचा स्वराज्याचा जन्मसिद्ध हक्क मिळेपर्यंत आमचें समाधान होणार नाहीं, ब्रिटिश राष्ट्रास बळकटी येणार नाहीं आणि जगांतहि खरी शांतता नांदणार नाहीं.'

स्वराज्यासाठीं लोकमान्य जन्मभर झगडले–स्वकीय नेत्यांशीं, तसेंच, परकीय सरकारशींहि–मग ते न्या. रानडे असोत, डॉ. भांडारकर असोत कीं ना. गोखले असोत; तसेंच कलेक्टर लॅंब असो, गव्हर्नर हॅरिस असो कीं व्हाइसरॉय कर्झन असो, कोणालाहि न डरतां ते झुंझारपणें स्वराज्याचा लढा खेळत आणि शेवटचा लढा खेळण्यासाठीं तर, वयाची साठी उलटली असतांहि ते इंग्लंडला गेले आणि तेथें एक अत्यंत महत्त्वाचा खटला खेळले.



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ४००८५ वि: चरित्र
क्रमांक नोंद दि: २८.१२.८५
१२६६





# ‘मेळविलीं जखम-फळें’

पुण्याचा पगडीवाला संपादक–आणि तो सातासमुद्रांपलीकडील लंडनच्या कोर्टांत?–‘लंडन टाइम्स’च्या वार्ताहरावर अब्रूनुकसानीची फिर्याद करण्यासाठीं सर्वश्रेष्ठ न्यायासनापुढें उभा! वरवर दिसण्यांत हा खटला सर व्हॅलेंटाइन् चिरोल व लोकमान्य या व्यक्ति–व्यक्तींमधील होता, पण खरोखर हा खटला दोन संपादकांमधील नव्हता–स्वराज्यप्रेमी हिंदुस्थानचें साम्राज्य-लोभी इंग्लंडशीं हें युद्ध होतें.

‘खरें युद्ध सरकारशींच होतें.’ असें लोकमान्य पुढें जाहीरपणें म्हणालेच. चिरोलचे वकील सर एडवर्ड कार्सन हेहि खटला चालवितांना म्हणाले, ‘हा खटला टिळकांनीं जिंकला, तर इंग्रज सरकारावर अनर्थ गुदरेल व त्यांना हिंदुस्थानांत राज्य करणें कठीण होईल.’ फार काय, खुद्द न्यायाधीशहि ज्यूरीला खटला समजावून देतांना म्हणाले, ‘आम्ही इकडे युद्धांत प्राण खर्चीं घालीत असतांना टिळक हिंदुस्थानांत लष्कर-भरतीच्या विरुद्ध प्रचार करीत होते–आमचा शत्रु जो जर्मनी, त्याच्या वस्तु जरूर तर घ्या, पण ब्रिटिश वस्तु नको असा उपदेश करीत होते.’ हा खटला म्हणजे दोन राष्ट्रांमधील लढा होता–दोन प्रवृत्तींमधील तंटा होता.

चिरोल हा ‘लंडन टाइम्स’चा बातमीदार–सर्व जग फिरून आलेला. त्यानें १९१० सालीं हिंदुस्थानांत येऊन ‘टाइम्स’ला बातमी-पत्रें पाठविलीं. त्यांत ‘हिंदी असंतोषाची मीमांसा’ करतां करतां त्यानें असें बिनदिक्कत लिहिलें कीं, ‘टिळकांनीं शिवाजीला पुढें आणलें आणि मोठें राष्ट्रीय आंदोलन निर्माण केलें. शिवाजीच्या राज्यारोहण-समारंभांत असा जाहीर प्रचार केला गेला कीं, राजकीय कारणासाठीं, स्वराज्य मिळविण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांचे खून पाडणें हा प्रजाजनांचा हक्क आहे, किंबहुना तें त्यांचें कर्तव्यच आहे.’ याला ना आधार ना पुरावा!

६...

खुनांशीं—अत्याचारांशीं टिळकांचा संबंध जोडून त्यांची जगभर बदनामी चिरोलनें केली. तेव्हां त्याला खडसावून जाब विचारणें हें टिळकांचें कर्तव्यच होतें. तें बजावण्यासाठीं ते ता. १९ सप्टेंबर १९१८ रोजीं इंग्लंडला जाण्यास निघाले. तेथें ते सुमारें तेरा महिने राहिले. खटल्यांत दोन्ही बाजूंस मोठमोठे कायदेपंडित होते. त्यांच्या चकमकी उडत. पण सर्वांत जास्त तेज पडलें टिळकांच्या बुद्धीचें व धैर्याचें. टिळकांना यश देणें म्हणजे इंग्लंडचें नुकसान करणें, अशी समजूत गोऱ्या ज्यूरीची झाली. तिनें चिरोलला निर्दोषी ठरविलें. टिळकांचा दावा बुडाला ! त्यापायीं झालेला तीन लाख रुपये खर्च पाण्यांत पडला – अहोरात्र केलेल्या श्रमांचा अपव्यय झाला.

पण टिळक खरे कर्मयोगी ! गीतेचें तत्त्वज्ञान त्यांच्या बुद्धींत उतरलेलें, मनांत बिंबलेलें, हृदयांत ठसलेलें आणि हाडामांसांत खिळलेलें. संकटसमयीं देखील त्यांचें धैर्य गळलें नाहीं कीं चित्त चळलें नाहीं. न्यायाधिशाचा अन्याय्य निवाडा ऐकून ते शांतपणें पण निश्चयानें म्हणालें, 'माझ्यावर आकाश कोसळून पडलें तरी त्याच्या विटा पायाखालीं घालून मी माझें कार्य करीत राहीन.'

चिरोल खटला हें स्वराज्याच्या लढ्याचेंच एक अंग होतें. त्याशिवाय खास स्वराज्यासाठीं प्रत्यक्ष प्रयत्नहि लोकमान्यांनीं इंग्लंडांत तेरा महिने अहोरात्र केले—दुसरें कांहीं त्यांनीं तेथें पाहिलेंहि नाहीं. 'होमरूल लीग' तर्फे त्यांनीं पार्लमेंटरी कमिटीपुढें साक्ष दिली आणि स्वराज्याची मागणी केली. इंग्लंडमधील मजूर पक्षाशीं संधान बांधून त्याला आपल्या स्वराज्यास अनुकूल करून घेतलें, तेथें शिकत असलेल्या हिंदी विद्यार्थ्यांचें चित्त स्वराज्याकडे वळविलें; आणि इंग्रज विद्यार्थ्यांना स्वराज्य-दानाचें महत्त्व समजावून सांगितलें. सभा व पत्रकें यांचा त्यांनीं इंग्रज जनतेवर पाऊस पाडला. त्या वेळीं महायुद्ध अचानक थांबलें होतें. तेव्हां तह-परिषदेला हजर राहण्याची त्यांनीं खटपट केली. तिला सरकारनें खो दिला. तेव्हां परिषदेच्या अध्यक्षाला पत्र पाठवून त्यांनीं विनंती केली, 'महाराज, आमच्या स्वराज्याचा विचार करा.'

अशा प्रकारें इंग्लंडांतहि स्वराज्याचा डांगोरा तेरा महिने पिटून, ता. ६ नोव्हेंबर १९१९ रोजीं टिळक मायदेशीं येण्यास निघाले. स्वराज्य-प्रचाराची त्यांची कामगिरी अनमोल झाली. त्यापुढें, ते चिरोल-खटला हरले याचें दुःख हिंदी जनतेनें मानलें नाहीं. उलट, विजयी वीराप्रमाणें त्यांचें पुण्या-मुंबईस टोलेजंग स्वागत झालें. ता. १ डिसेंबर रोजीं पुण्याच्या ‘ रे मार्केटांत ’ प्रचंड सभा भरली आणि नगरपालिकेनें त्यांना मानपत्र दिलें. सरकारी अधिकाऱ्यांशिवाय दुसऱ्या कोणाला नगरपालिकेनें दिलेलें तें पहिलेंच मानपत्र ! अमृतसरच्या कॉँग्रेसला ते गेले, तर तेथें मान-सन्मानाची त्यांचेवर अमृत-वृष्टीच झाली. सारी कॉँग्रेस टिळकांच्या शब्दावर नुसती झुलत होती. ते कॉँग्रेसचे - अवघ्या हिंदुस्थानचे—जणुं ‘ अन-भिषिक्त सम्राट् ’च होते. याहून अधिक गौरव तो काय व्हावयाचा ?

होय, त्याहूनहि अधिक गौरवाचा, अधिक प्रेमाचा व अधिक कृत-ज्ञतेचा समारंभ महाराष्ट्रानें केला. महाराष्ट्र द्रव्यानें दरिद्री असेल, ज्ञानानें उणा असेल, पण मनानें श्रीमंत आहे, हृदयानें उदार आहे.

ता. २२ मे १९२० रोजीं पुणें येथें एक अपूर्व समारंभ झाला—लोकमान्यांच्या साठी-समारंभापेक्षांहि भव्य व भावपूर्ण. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून टिळकांचे भक्त भक्तिभावानें तेथें लोटले होते. कशासाठीं ?

चिरोल-खटल्यांत टिळकांना तीन लाख रुपये कर्ज झालें होतें, तें फेडण्यासाठीं !

आतां ‘ टिळक म्हणजे महाराष्ट्र व महाराष्ट्र म्हणजे टिळक ’ असें अद्वैत निर्माण झालें होतें. टिळकांना वैयक्तिक जीवन असें राहिलेंच नव्हतें. ते आतां एक राष्ट्रपुरुष बनले होते. त्यांच्या अणुरेणूंत देशभक्तीच भरून राहिली होती. स्तुतीच्या सहस्रधारांनीं भिजवून व भक्तीचे मंत्र म्हणून मराठी जनतेनें, तीन लाख रुपयांचा निधि, लोकमान्यांना प्रेम-भावानें अर्पण केला. लोकमान्यांचें अंतःकरण वज्रकठोर ! पण तेंहि विरघळलें आणि ते म्हणाले,


‘आज मला लोकांनीं विकत घेतलें.’

लोकांचें तें ब्रह्मांडाएवढें प्रेम पाहून लोकमान्यांचें मन श्रीज्ञानेश्वरांप्रमाणें संतोषानें म्हणालें असेल, 'मेळविलों जन्म-फळां.'

यानंतर सुमारें दोनच महिन्यांनीं लोकमान्य मुंबईस गेले. कशासाठीं? केवळ मित्र-प्रेमासाठीं—वचन-पालनासाठीं.

त्यांचे एक मित्र बाबामहाराज महामारीनें मृत्युशय्येवर पडले होते. त्या वेळीं, म्हणजे १८९७ सालीं, लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला मुंबईस चालू होता. त्यांतून जामिनावर सुटून ते ता. ७ ऑगस्ट रोजीं पुण्यांत आले. तेथें त्या मरणोन्मुख मित्राच्या समाचारास ते गेले. तेव्हां बाबामहाराजांनीं त्यांना म्हटलें, 'आतां मी तर जाणार. माझ्या जिंदगीची व्यवस्था नीट कोण लावणार? तुम्हीं ती लावावी अशी माझी अंतकाळची इच्छा आहे.' अशी इच्छा कोण मोडील?

लोकमान्यांनीं होकार तर दिला. पण पुढें त्यांच्या मार्गांत कांटे



पसरण्यास मुंबई सरकार आलें, कोल्हापूरचे छत्रपति आले; त्यामुळें लोकमान्यांना १८ वर्षें प्रिव्ही कौन्सिलापर्यंत खटले लढवावे लागले.

१६० दिवस प्रत्यक्ष कोर्टात हजर राहावें लागलें व ६० हजार रुपये स्वतःच्या खिशांतून खर्च करावे लागले. ते ६० हजार रुपये जगन्नाथ-महाराजांनीं १९१८ सालीं लोकमान्यांना परत केले. तेव्हां लोकमान्यांनीं आपल्या औदार्यानें त्यांना – नव्हे सर्वांनाच–चकित केलें. 'तीस हजारांचीं तुमची जमीन न्यू पूना कॉलेजला द्या व बाकीचे तीस हजार रुपये मुलाला खाऊ देतात तसे मी तुम्हांला देतों, ते घ्या' असें त्यांनीं सांगितलें. हरिश्चंद्राच्या सत्यनिष्ठेला कर्णाच्या औदार्याची जोड मिळाली ! शेवटीं जय लोकमान्यांचा झाला. त्या प्रकरणांतील शेवटचें काम पार पाडण्यासाठीं ता. १२ जुलै रोजीं लोकमान्य मुंबईस गेले.

त्या वेळीं त्यांच्या अंगांत ताप होता. वृद्धावस्थेमुळें त्यांच्या सर्व शक्ति क्षीण झालेल्या होत्या. चालतांना पाय लटपटत. मुंबईत सरदार-गृहांत ते उतरले. ताप हटला – पण ता. २० जुलैनंतर पुनः उलटला. लोकांना चिंता वाटूं लागली. देशांत प्रार्थना होऊं लागल्या–जपअनुष्ठानें चालू झालीं. नामांकित डॉक्टरांचे उपचार सुरू होते, पण–

'जातस्य हि ध्रुवो मृत्युः।' गीता बोलून गेली. गीतेचा हा भाष्यकार, स्वराज्याचा हा शिल्पकार, शनिवार ता. ३१ जुलै रोजीं रात्रीं १२ वाजून ४० मिनिटांनीं आपला नश्वर देह टाकून, हा मृत्युलोक सोडून, स्वर्गीं गेला. लोकमान्य देवमान्य झाले !

दुसरे दिवशीं, रविवारीं त्यांची स्मशान-यात्रा निघाली. तिला लाखों लोक लोटले–त्यांत म. गांधी होते, पं. जवाहरलाल होते आणि सर्व जातींचे व सर्व पक्षांचे पुढारी होते. देवांनींहि पावसाच्या रूपानें दुःखाश्रु ढाळले. चौपाटीवर चंदनाची चिता रचण्यांत आली, आणि तिच्यावर सतत चाळीस वर्षें, देशसेवेसाठीं चंदनाप्रमाणें झिजलेला देह ठेवण्यांत आला. तो देह कोणाचा होता ?

एका राष्ट्रीय वृत्तीच्या शिक्षकाचा.
एका ध्येयवादी संपादकाचा.
एका संशोधक विद्वानाचा.
एका शिवाजी-गणेशोत्सवाच्या संस्थापकाचा.

एका स्वराज्यासाठीं झिजणाऱ्या देशभक्ताचा.

एका गीता-रहस्य सांगणाऱ्या निष्काम कर्मयोग्याचा.

प्लेग असो कीं दुष्काळ असो, पैसाफंड असो कीं पंचांगशोधन असो, कोल्हापूर-बडोद्यावर संकट असो कीं क्रॉफर्डच्या कैचींत सांपडलेले मामलेदार असोत,– लोकांच्या सर्व संकटांत हात देणारा, हात धरून पुढें नेणारा असा हा लोकोत्तर, लोकमान्य पुरुष होता.

त्याचे गुण काय वर्णावे ?
त्याचे पराक्रम किती गावे ?
त्याचे उपकार कोणीं सांगावे ?
आकाशांत असंख्य नक्षत्रें चमकत असतात,
समुद्रांत अगणित रत्नें लोळत असतात; तशीच
लोकमान्यांच्या जीवनांत अपार गुणसंपदा ओतप्रोत भरलेली होती.

❋

त्यांचेंच नांव घेऊन म. गांधींनीं एक कोटि रुपयांचा 'स्वराज्य-फंड' काढला. त्यांच्या स्वदेशीची तार खादीपर्यंत लांबविली, त्यांच्या बहिष्काराचें क्षेत्र असहकारितेपर्यंत वाढविलें आणि आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून दिलें. या स्वातंत्र्याचे थोर उद्गाते व महान् विधाते लोकमान्य टिळक यांना–

'नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वा पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते'।

# गौरवाञ्जलि :

क्रमांक ....... १२८९ ....... नोंद दि. २-१-१

**म. गांधी** : " टिळकांच्या अंगीं दुर्दम्य इच्छाशक्ति होती, त्यांची विद्वत्ता अगाध होती व त्यांची देशभक्ति अतुल होती. विशेषतः त्यांचा स्वार्थत्याग अलोट होता, धैर्य अढळ होतें व आशावाद अजिंक्य होता. त्यांचें खासगी वर्तन अत्यंत शुद्ध होतें. आधुनिक काळीं झालेल्या सर्व लोकांत, स्वकीयांचीं अंतःकरणें जिंकून हस्तगत करणारा टिळकांएवढा पराक्रमी पुरुष दुसरा कोणीहि झाला नाहीं. "

**पं. जवाहरलाल नेहरू** : " सिंहाची छाती असलेल्या टिळकांनींच प्रथम स्वातंत्र्य-भावनेची मशाल बहुजनसमाजासाठीं पेटविली आणि परकीयांच्या जुलूम-जबरदस्तीविरुद्ध बंडाचा झेंडा फडकविला. त्यांच्यासारखा शूर देशभक्त देशांत फिरून निर्माण होण्यास कदाचित् कांहीं शतकेंहि लागतील. "

**पं. मदनमोहन मालवीय** : " लोकमान्यांच्या कालीं लोकमान्यांइतका जनतेवर प्रेम करणारा, जनतेची सेवा करणारा व जनतेसाठीं त्याग करणारा दुसरा कोणीहि नव्हता. त्यांची बुद्धि सूक्ष्म, विद्वत्ता सखोल, चारित्र्य निष्कलंक, धैर्य अचल व स्वभाव बाणेदार होता. "

**महर्षि अरविंद घोष** : " टिळकांचें जीवित म्हणजे लखलखीत समशेर. त्यांच्याइतका राष्ट्रासाठीं हाल भोगलेला व त्याबद्दल ब्रहि न काढणारा पुढारी सांपडणें कठीण. जोंपर्यंत आपल्या राष्ट्राला भूतकाळाचा अभिमान आहे आणि भविष्यकाळाची आशा आहे, तोंवर लोकमान्यांचें स्मरण होत राहील. "

**डॉ. ॲनि बेझंट** : " लोकमान्यांचें मस्तक मुत्सद्द्याचें होतें व छाती सिंहाची होती. ते चतुर होते तसेच शूरहि होते. भारताला ज्यांनीं स्वातंत्र्य मिळवून दिलें, त्यांच्या मालिकेंत लोकमान्यांचें नांव इतिहास गुंफल्याशिवाय राहणार नाहीं. "

**श्री. न. चिं. केळकर** : " टिळक सद्वर्तनी होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें. ते विद्वान् होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला व स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या उद्योगाचें चीज झालें. उद्योगी होते म्हणून पराक्रमाचें चीज झालें. पराक्रमामुळें धैर्याचें चीज झालें व स्वतः धैर्यवान् होते म्हणून ते लोकांना उपदेश करूं शकले. "

**श्री. अ. ब. कोल्हटकर** : " लोकमान्य हे आमच्या पित्याच्या ठिकाणीं होते. मातेची वत्सलता त्यांच्या अंगीं होती. भावाचा पाठीराखेपणा ते करीत असत. ते आमचे गुरु होते. "

**रँ. र. पु. परांजपे** : " त्याग, चारित्र्य व मातृभूमीची भक्ति यांचा कित्ताच टिळकांनीं देशापुढें ठेवला. "

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय
१००४५२

## अधिक वाचन

१. लो. टिळक यांचें चरित्र (खंड १ ते ३)
—न. चिं. केळकर

२. लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका
(भाग १ ते ३)—स. वि. बापट

३. लो. टिळकांचे लेख (भाग १ ते ४)
—केसरी प्रकाशन

४. स्वराज्याची मोहीम (भाग १ ते ४)
—अ. ह. गद्रे

५. गीता-रहस्य
—लो. बा. गं. टिळक

६. गेलीं आठ वर्षें
—आ. वि. कुलकर्णी

७. बाळ गंगाधर टिळक
—कृ. आ. गुरुजी

८. लोकमान्यांचा जयजयकार
—ल. रा. पांगारकर

९. स्वराज्य-मार्ग-दर्शक टिळक
—आपटे गुरुजी

१०. राष्ट्रजनक टिळक
—दा. न. शिखरे

☆ ☆ ☆

REFBK-0014452